१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | शनिवार | दि. ३१ ऑक्टोबर २०२६ | अंक १४५ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

सरपंच, उपसरपंच यांच्यातील वाद चव्हाट्यावर

श्रीवर्धन : पर्यटननगरी दिवेआगर येथील ग्रामपंचायतीत अंतर्गत वादाने गंभीर वळण घेतले असून, सरपंच आणि उपसरपंच यांच्यातील संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. रिसॉर्टच्या वीजजोडणीचा प्रश्न आणि घराच्या असेसमेंट उताऱ्यातील कथित अनियमिततेवरून सुरू झालेला वाद थेट आरोप-प्रत्यारोपांपर्यंत पोहोचला. ग्रामपंचायत कार्यालयातील वाढत्या गोंधळामुळे पोलिसांना पाचारण करण्याची वेळ आली. या प्रकरणात दोन्ही बाजूंनी तक्रारी दाखल झाल्याने दिवेआगर परिसरात एकच खळबळ उडाली आहे मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि.२७) रिसॉर्टच्या वीजजोडणीचा प्रश्न तसेच घराच्या असेसमेंट उताऱ्यात नियमबाह्य बदल झाल्याच्या कथित •➤पान २ वर

हेलिकॉप्टर दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू

चमोली : उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात बद्रीनाथ धामाहून परतणारे हेलिकॉप्टर बेपत्ता झाल्याची घटना समोर आली. ट्रान्स भारत एव्हिएशन कंपनीचे हे हेलिकॉप्टर शुक्रवारी (दि.३०) डेहराडूनच्या दिशेने जात होते. त्यावेळी जोशीमठ परिसरात उड्डाणादरम्यान त्याचा संपर्क तुटला. या हेलिकॉप्टरमध्ये पायलटसह सहा जण प्रवास करत होते. प्राथमिक माहितीनुसार, हेलिकॉप्टरने दुपारी १ वाजून १२ मिनिटांनी बद्रीनाथ येथून उड्डाण केले होते. त्यानंतर ते जोशीमठ परिसरात बेपत्ता झाले. मात्र, हेलिकॉप्टरमधून प्रवास करणाऱ्या सर्व सहा जणांचा मृत्यू झाल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

वेधक

सपकाळांचा वाढवण बंदराला विरोध

मुंबई : पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर हे महाराष्ट्राच्या हिताचे नाही. हा प्रकल्प स्थानिक लोक, शेतकरी, आणि मच्छिमार यांच्या मुळावर उठलेला आहे. दिल्लीतील रंगा बिल्ला यांना पालघरचा विकास करायचा नाही, तर अदानीचा विकास करायचा आहे, त्यासाठी हा प्रकल्प आणला जात आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या मुळावर उठलेला व स्थानिकांचे संसार उद्ध्वस्त करणारा विनाशकारी वाढवण बंदर प्रकल्प रद्द झाल्याशिवाय स्थानिकांनी सुरु केलेला हा लढा थांबणार नाही. या लढ्यात काँग्रेस पक्ष तुमच्यासोबत सर्वशक्तीनिशी सहभागी आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. पालघर जिल्ह्यातील वरोर वाढवण येथील उलगुलान वाढवण बंदर विरोधी जनआक्रोश सभेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष बोलत होते.

अरविंद म्हात्रेंच्या दौऱ्याची दखल

पनवेल : दरवर्षी मार्च-एप्रिल महिन्यात पाणीटंचाईला सुरूवात होते. मात्र, यावर्षी पाणी कमी असल्याने लवकरच पाणी टंचाई सुरू होणार असल्याचे दिसत आहे. त्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी पालिका हद्दीतील नागरिकांना पुरेसे पाणी मिळावे यासाठी कंबर कसली आहे. त्यानुसार त्यांनी परिसरातील अनेक धरणांची पाहणी सुरू केली आहे. नुकतीच त्यांनी खैरवाडी-मोर्बे तसेच जांभिवली येथील धरणांची पाहणी केली होती. त्यानंतर तांत्रिक आढावा घेऊन तेथील उपलब्ध जलसाठ्याचा पनवेल पालिका क्षेत्राच्या पाणीपुरवठ्यासाठी उपयोग करून त्यानुसार धरणाची दुरुस्ती करून •➤पान २ वर

'राफेल मरीन'चे यशस्वी लँडिंग

नवी दिल्ली : भारतीय नौदलाच्या सागरी सामर्थ्यात भर घालणारी महत्त्वपूर्ण घडामोड घडली आहे. स्वदेशी बनावटीच्या विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांतवर फ्रान्सनिर्मित 'राफेल मरीन' या लढाऊ विमानाने पहिल्याच प्रयत्नात यशस्वी लँडिंग केली. गुरुवारी (दि.२९) ही चाचणी पार पडली. या यशामुळे भारतीय नौदलात राफेल मरीनच्या प्रत्यक्ष वापराच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. विमानवाहू युद्धनौकेवरील मर्यादित जागेत लढाऊ विमानाचे सुरक्षित अवतरण करण्याची क्षमता तपासण्याच्या दृष्टीने ही चाचणी महत्त्वपूर्ण ठरली आहे. राफेल मरीनच्या भारतीय नौदलातील समावेशापूर्वी विविध चाचण्या सुरू आहेत.

परकीय चलन साठ्यात घसरण

नवी दिल्ली : भारताच्या परकीय चलन साठ्यात पुन्हा घसरण झाली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने शुक्रवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, दि.० ऑक्टोबर रोजी संपलेल्या आठवड्यात देशाचा परकीय चलन साठा १.२६९ अब्ज डॉलरने कमी होऊन ७१९.७४८ अब्ज डॉलरवर आला आहे. याआधीच्या अहवालातील आठवड्यातही परकीय चलन साठ्यात ५.०११ अब्ज डॉलरची घट झाली होती. त्यावेळी एकूण साठा ७२१.०१६ अब्ज डॉलरवर पोहोचला होता. दि.४ सप्टेंबर रोजी संपलेल्या आठवड्यात भारताचा परकीय चलन साठा, ७८५.७०६ अब्ज डॉलर या ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचला होता.

महसूल कर्मचाऱ्यांचे लेखणी बंद आंदोलन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील महसूल सहाय्यक आणि सहाय्यक महसूल अधिकारी अशा एकूण साडेचारशे कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांसाठी लेखणी बंद आंदोलनाची भूमिका घेतली आहे. या आंदोलनात अलिबागसह रायगड जिल्ह्यातील तहसील आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी सहभागी झाले आहेत. दरम्यान, लेखणी बंद आंदोलनामुळे जिल्ह्यातील नागरिकांची अनेक कामे रखडली असल्याचे सांगण्यात आले असून, सर्वसामान्यांना शासन आणि महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या वादामध्ये त्रास झाल्याचे देखील बोलले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रायगड जिल्ह्यातील महसूल सहाय्यक संवर्गातून सहाय्यक महसूल अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्याबाबत यापुर्वी शासनाला निवेदन दिले आहे. या निवेदनातून महसूल कर्मचाऱ्यांनी त्यांची भावना मांडण्यात आली. मात्र, जिल्हाधिकारी कार्यालयासह इतर कार्यालयांमध्ये सहाय्यक महसूल अधिकारी या संवर्गासाठी २२ पदांची नवनिर्माती आहे. मात्र, आजपर्यंत महसूल सहाय्यक, संवर्गातून सहाय्यक महसूल अधिकारी या संवर्गात आदेश झाले नाहीत. त्यामुळे नवनिर्मित पदांना मान्यता देण्यात आली नाही. जिल्ह्यातील प्रत्येक तहसील, उपविभागीय अधिकारी कार्यालय, भूसंपादन कार्याल आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील •➤पान २ वर



- साडेचारशे महसूल कर्मचाऱ्यांचा सहभाग
- जिल्ह्यातील नागरिकांची कामे रखडली

सर्वसामान्यांना त्रास

या आंदोलनात अलिबागसह रायगड जिल्ह्यातील तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी सहभागी झाले आहेत. त्यामुळे लेखणी बंद आंदोलनामुळे जिल्ह्यातील नागरिकांची लेखणीद्वारे होणारी अनेक कामे रखडली असल्याचे सांगण्यात आले. तसेच, शासन आणि महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या वादामध्ये सर्वसामान्यांना त्रास झाल्याचे देखील बोलले जात आहे.

> महसूल कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी लेखणीबंद आंदोलन सुरु केले आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे. महसूल सहाय्यक, सहाय्यक महसूल अधिकारी संवर्गातील कर्मचारी आंदोलनात सामील झाले आहेत. सरकारसह जिल्हा प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर येत्या दोन दिवसांत काम बंद आंदोलन करण्याच्या पावित्र्यात संघटना आहे. – भुषण पाटील, जिल्हाध्यक्ष, रायगड जिल्हा महसूल कर्मचारी संघटना

फसवणुकीविरोधात शेकापचा मोर्चा

शेतकऱ्याच्या न्याय्य हक्कासाठी पदाधिकारी रस्त्यावर



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।

पळस्पे येथील शेतकऱ्याची मिळकतीमधील १३ गुंठे जमीन बळकावण्यात आली असून, अनेक वर्षांपासून शेतकरी पीकांपासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे चूकीच्या पद्धतीने सातबारा उताऱ्यावर नोंद करून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली, या विरोधात शेकापचे नेते माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकापचे जिल्हा शेतकरी सभा अध्यक्ष अनिल ढवळे यांनी आवाज उठविला आहे. शेतकऱ्याच्या न्यायासाठी शेकापच्यावतीने शुक्रवारी (दि.३०) पनवेलमधील तहसील कार्यालयासमोर मोर्चा काढण्यात आला. यावेळी सातबाऱ्यावरील चुकीची नोंद रद्द करून शेतकऱ्याला पुर्ववत जमीन करून देण्यात यावी, अशा अनेक मागण्यांसाठी शेकापचे पदाधिकारी व कार्यकर्ते रस्त्यावर उतरले, असून याबाबत त्यांनी पनवेल तहसीलदारांना निवेदन दिले.

मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल तालुक्यातील पळस्पे येथील पांडूरंग बाळू पाटील उर्फ घोरपडे या शेतकऱ्याची सर्व्हे नंबर ७९/१ मध्ये १८३ गुंठे जमीन आहे. याच गटामध्ये बेडेकर यांचे ४०.५ आर एवढी मिळकत होती. बेडेकर यांनी पळस्पे येथील शेतकरी नाना भगत यांना १९८३ मध्ये ही मिळकत विकत दिली. त्यानंतर भगत यांनी मोजणी न करता, २६ जूलै १९९४ मध्ये पनवेल येथील दुय्यम निबंधक कार्यालयात पंधरा पानी खरेदीखत बनवून शकुंतला सामंत यांना ४०.५ आर क्षेत्राची मिळकत विकली. त्यानंतर सामंत यांनी १७ जून २००६ रोजी विनामोबदला बक्षीस पत्राने मनिषा व सुहास सामंत •➤पान २ वर

तहसील कार्यालयाने घेतला एसीबीचा धसका

अधिकारी, कर्मचाऱ्यांना रेड अलर्ट?

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मागील ६ महिन्यांपासून कारवाई मोहिम हाती घेतली आहे. यादरम्यान, लाच घेणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर ठोस कारवाई केली जात आहे. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून जनजागृती अभियान देखील सुरु आहे. या अभियानामुळे जिल्ह्यातील सरकारी यंत्रणेचे धाबे दणाणले आहेत. दरम्यान, अलिबागमधील तहसील कार्यालयाने एसीबीचा धसका घेतल्याची चर्चा जोर धरत आहे. तसेच, काही अधिकारी व कर्मचाऱ्यांना वरिष्ठांकडून रेड अलर्टचा इशारा दिल्याची देखील चर्चा होत आहे.

रायगड जिल्ह्यातील महसूल विभागासह जिल्हा परिषदेतील वेगवेगळ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना लाच घेतल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत दक्षता जनजागृती अभियान सुरु केले आहे. रायगडसह नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या रडारडवर काही लाचखोर अधिकारी व कर्मचारी असल्याची माहिती समोर आली आहे. त्याचाच धसका अलिबागमधील तहसील कार्यालयाने घेतला आहे. मागील महिन्याभरापूर्वी कार्यालयातील एकही अधिकारी कार्यालयात थांबतच नव्हते. मात्र, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाचा स्वीय सहाय्यक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकल्यानंतर महसूल विभागातील काही लाचखोर अधिकारी व कर्मचारी भितीच्या छायेत वावरत असल्याची चर्चा जोर धरत आहे. दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईपासून वाचण्यासाठी महसूल विभागातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांना कार्यालयातच वेगळ्या कामाच्या नावाखाली बोलावण्यात आल्याची चर्चा तहसील कार्यालयात सुरु होती. त्यांच्यावर लाचलुचपत विभागाचे अधिकारी व कर्मचारी नजर ठेवून आहेत. त्यामुळे लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात कोण लाचखोर सापडणार, याकडे आता लक्ष लागून राहिले आहे.

टेम्पोच्या धडकेत दोघांचा मृत्यू

पनवेल : कळंबोली येथे भरधाव टेम्पोने खासगी ट्रॅव्हल्स बसमधून उतरून सामान काढत असलेल्या दाम्पत्यासह बसच्या क्लिनरला जोरदार धडक दिली. या धडकेत संगीता मोटे आणि बस क्लिनर बाळू सरताते यांचा मृत्यू झाला, तर संगीता यांचे पती पोपट मोटे गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पोपट मोटे (५०) हे कळंबोली सेक्टर-१ ई मधील रहिवासी असून, ते आपल्या पत्नीसह सातारा येथून माणदेश ट्रॅव्हल्सच्या खासगी बसने कळंबोलीकडे परतत होते. यावेळी कळंबोली सर्कलच्या पुढे मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरील सीएनजी पंपाजवळ बस थांबविण्यात •➤पान २ वर

रोहा एमआयडीसीकडून पाणीपुरवठा बंद

ग्रामीण भागाला फटका

। रोहा । प्रतिनिधी ।

मुख्य जल वाहिनी तपासणी, देखभाल व दुरुस्ती तसेच इतर आवश्यक तांत्रिक कामासाठी रोहा एमआयडीसी प्रशासनाने येथील सर्व कारखान्यांचा पाणीपुरवठा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी म्हणून शुक्रवार दि.३० ऑक्टोबरपासून सलग दोन दिवस संपूर्ण एमआयडीसी परिसरात पाणीपुरवठा खंडित करण्यात आला आहे. त्यामुळे सर्व कंपनीतील उत्पादन प्रक्रियेवर त्याचा गंभीर परिणाम झाल्याचे चित्र दिसून येत आहे. त्याचप्रमाणे या शट डाऊनचा फटका एमआयडीसीच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या जवळपास असंख्य ग्रामपंचायत हद्दीतील ३२ गाव, वाड्या आणि वस्त्यांना देखील बसणार आहे. ऐन सणासुदीच्या तोंडावर पाणीपुरवठा खंडित झाल्याने ग्रामस्थांना विशेषतः महिला वर्गाला पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

अल-निनोच्या संभाव्य परिणामामुळे उपलब्ध जल साठ्याचे काट कसरीने व नियोजनबद्ध पद्धतीने करण्याबाबत कोलाड पाटबंधारे व रोहा एमआयडीसी प्रशासनाकडून लेखी पत्राद्वारे सूचना प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास •➤पान २ वर

माथेरानच्या राणीचा प्रवास सुरू

अखेर १५ दिवसांच्या प्रतिक्षेनंतर रूळावर



> नेहमी १५ ऑक्टोबर दरम्यान मिनीट्रेनची सेवा उपलब्ध होते. परंतु, यावेळी आवडत्या ट्रेनमध्ये प्रवास करण्यासाठी आम्हाला पंधरा दिवस उशिरा संधी मिळाली. मुलांची हौस यानिमित्ताने पूर्ण झाली. सध्या या ट्रेनच्या दोनच फेऱ्या होत आहेत. त्यामध्ये वाढ झाल्यास सर्वांनाच या ट्रेनच्या प्रवासाचा आनंद घेता येईल. – चंद्रशेखर शिंदे, पर्यटक, मुंबई

। नेरळ/माथेरान । प्रतिनिधी ।

पर्यटकांची लाडकी समजली जाणारी माथेरानची राणी म्हणजेच नेरळ-माथेरान मार्गावर धावणारी मिनीट्रेन अखेर शुक्रवार, दि.३० ऑक्टोबर पासून रूळावर आली. यावेळी तिच्या स्वागतासाठी स्थानिक तसेच पर्यटकांनी माथेरान स्थानकात गर्दी केली होती. पहिल्या ०फेरीच्या वाहतुकीला अत्यल्प प्रतिसाद मिळाला असला तरी पर्यटकांनी पहिल्या गाडीच्या प्रवासाचा आनंद घेतला. यादरम्यान, फुलांनी सजविलेल्या या गाडीचे फोटो काढण्यासाठी तर कुणी सेल्फी घेण्यासाठी गर्दी करताना दिसत होते.

ब्रिटिश काळात सुरू झालेली नेरळ-माथेरान मार्गावर चालविली जाणारी मिनीट्रेन शुक्रवारी पुन्हा एकदा प्रवासी सेवेत आली. •➤पान २ वर

अलिबागमध्ये दिवाळी महोत्सवाचा शुभारंभ

चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते उद्घाटन



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने दिवाळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचा उद्घाटन सोहळा अलिबाग नगरपरिषदेच्या पटांगणात शुक्रवारी (दि.३०) शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी अलिबाग नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, माजी नगरसेविका वृषाली ठोसर, महिला व बालकल्याण विभागाच्या सभापती डॉ. साक्षी पाटील, उपसभापती ॲड. अश्वीनी ठोसर, निवेदिता वाघमारे, संध्या पालवणकर, योजना पाटील, वृषाली भगत, पाणी सभापती अनिल चोपडा, जमाल सय्यद, •➤पान २ वर

दिवाळी महोत्सवाची चळवळ वेगळ्या उंचीवर: चित्रलेखा पाटील

महिला सक्षमीकरणाचा ध्यास घेत माजी नगराध्यक्षा स्व. नमिता नाईक यांनी दिवाळी फेस्टीवलची सुरुवात केली. या फेस्टीवलमधून त्यांनी अलिबागकरांना विविध वस्तू व खाद्य पदार्थ खरेदी करण्याची संधी एका छताखाली देण्याचे काम केले. हाच वारसा विद्यमान नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बालकल्याण सभापती आणि त्यांची टीम जपण्याचे कार्य करत आहे. तसेच, या उपक्रमासाठी अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, बांधकाम सभापती प्रशांत नाईक आणि माजी नगरसेविका वृषाली ठोसर यांची मोलाची साथ मिळत आहे. स्थानिक महिला उद्योजक, व्यावसायिकांना रोजगाराचे दालन खुले व्हावे, चुल व मुल या पलिकडे जाऊन महिला पुढे याव्यात, यासाठी सुरू केलेली दिवाळी फेस्टीवलची चळवळ आज वेगळ्या उंचीवर असल्याचे दिसून येत आहे. असे गौरवोद्गार चित्रलेखा पाटील यांनी काढले. यावेळी त्यांनी शुभेच्छा देत महिलांच्या कार्याचेही कौतुक केले.

रामफेडच्या दोन दिवसीय प्रशिक्षणाला सुरुवात | जयंत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

सहकार क्षेत्रात कौशल्यविकासाचे नवे पर्व

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सहकार्याने आणि रायगड जिल्हा ईएम-पॅक्स सहकारी संस्थांचा महासंघ मर्यादित (रामफेड), अलिबाग यांच्यावतीने सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी कौशल्यविकासाचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. याअंतर्गत रामफेडच्या प्रशिक्षण कार्यालयाचे आणि जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांसाठी आयोजित दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन आरडीसीसी बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते नागाव येथे करण्यात आले.





यावेळी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग अँड फायनान्सच्या पश्चिम विभागीय व्यावसायिक विकास केंद्राचे प्रमुख कुलदीप जिंदाल, प्राध्यापक अरुण मिश्रा, अतिथी प्राध्यापक आर. कांचनमाला, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, रामफेडचे अध्यक्ष निनाद पाटील, उपाध्यक्ष तुकाराम पाटील, विशेष कर्तव्य अधिकारी श्रीकांत पाटील यांच्यासह विविध सहकारी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जयंत पाटील यांनी, हा दिवस रायगडच्या सहकार क्षेत्रासाठी ऐतिहासिक असल्याचे सांगितले. आयआयबीएफ आणि रामफेड यांच्यात झालेला सामंजस्य करार देशातील सहकार क्षेत्रातील पहिला करार असल्याचे नमूद केले. तसेच, यामुळे सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय स्तरावरील दर्जेदार प्रशिक्षण मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बदलत्या बँकिंग •➤पान २ वर

माथेरानमध्ये पाणी चोरीवरून खळबळ

हॉटेल मालकांसाठी पालिकेच्या पायघड्या



। नेरळ। प्रतिनिधी ।

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेकडून शहरात हॉटेल लॉबीसाठी पायघड्या घातल्या जात असल्याचे चित्र समोर आले आहे. शहरातील एका हॉटेलसाठी स्वतंत्र जलवाहिनी टाकून पाणी पोहचवले जात असल्याचा प्रकार विरोधी पक्षाने उधळवून लावला आहे. दरम्यान, माथेरान पालिका आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून पाणी वाटपाचे सर्व नियम धाब्यावर बसवून पाणी चोरी सुरू असल्याचे बोलले जात आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात पाणीटंचाईचे सावट असताना माथेरानमध्येही पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. वॉटर सप्लायच्या फिल्टर हाउस येथून थेट अंदाजे २ किलोमीटर अंतरावर असलेल्या अलेक्झांडर हॉटेलला दोन इंची पाण्याची लाईन देण्याचे काम सुरू •➤पान २ वर

नडवली आदिवासीवाडी अद्याप तहानलेलीच

■ योजनेसाठी ९९ लाखाचा निधी मंजूर; तीन वर्षे झाली तरी काम रखडलेले

| रोहा | प्रतिनिधी |

देश स्वातंत्र्य होऊन तब्बल ७५ वर्षे उलटून गेली तरीही रोहे तालुक्यातील नडवली आदिवासीवाडीतील ग्रामस्थ पिण्याच्या पाण्यापासून वंचित असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे २०२२ साली या आदिवासी वाडीसाठी जल जीवन मिशन योजने अंतर्गत पाणी योजना मंजूर करण्यात आली होती. मात्र, गेली तीन वर्षे या योजनेचे काम रखडलेले आहे. त्यामुळे ही पाणी योजना तातडीने मार्गी लावावी, अशी मागणी आदिवासी समाज कार्यकर्ते संजय पवार यांच्यासह इतर आदिवासी बांधवांनी केली आहे.



खांब ग्रामपंचायत अंतर्गत खांब, वैजनाथ, नडवली, घेरासुरगड अशी गावे येतात. त्यातील नडवली आदिवासीवाडी सोडली तरी इतर भागांत शासनाच्या पाणी योजना पूर्णत्वास गेल्या आहेत. नडवली आदिवासीवाडीतील जलजीवन योजनेच्या कामासाठी ९९ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला असून, डिसेंबर २०२२ रोजी पाणी योजनेच्या कामाचे आदेश देखील देण्यात आले होते. तर, ही योजना डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश संबधित ठेकेदाराला देण्यात आले होते. या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्रत्येकी ५४ टक्के निधी तर ५ टक्के निधी लोक वर्गणीतून गोळा करून या योजनेचे काम पूर्ण होणार असल्याचा मोठा गाजावाजा करण्यात आला होता. त्यावेळी स्थानिक पुढाऱ्यांच्या हस्ते या योजनेच्या कामाचे डझनभर श्रीफळ वाढवून भूमिपूजन देखील करण्यात आले होते. मात्र, ३ वर्षे झाली तरी या योजनेच्या कामाला मुहूर्त सापडला नाही. असे असताना स्थानिक पुढाऱ्यांनी रखडलेल्या पाणी योजनेच्या कामात लक्ष घालने गरजेचे आहे. परंतु, तसे चित्र दिसून येत नसल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

> **“आमच्या वाडीवर पाणी पुरवठा योजनेचा काम अद्याप सुरू झालेले नाही. लोकांना पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती करावी लागत आहे. वाडी लगत असलेल्या एका फार्म हाऊस मालकाने स्वःखर्चाने बोरिंगचे पाणी दिले आहे. सध्या या पाण्यावर अवलंबून आहोत. तरी शासनाने व लोकप्रतिनिधी मंडळींनी या विषयात जातीने लक्ष घालून प्रलंबित योजनेचे काम सुरू करावे.**
> **– संजय पवार, नडवली आदिवासीवाडी”**

> **“आदिवासी बांधवांच्या मागणीनुसार आम्ही संबंधित ठेकेदाराला नोटीस बजावणार असून, लवकरच काम पूर्णत्वास नेण्याचा आमचा प्रयत्न राहील.**
> **– संदीप कल्लम, पाणीपुरवठा अभियंता, पंचायत समिती, रोहा”**

बाधित शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

एमआयडीसीमार्फत नव्याने करण्यात येणाऱ्या भूसंपादनाच्या पार्श्वभूमीवर बाधित शेतकऱ्यांच्या मागण्या आणि समस्यांवर चर्चा करण्यासाठी पनवेल येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत चिंद्रण, महालुंगी आणि कानपोली परिसरातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी नव्या भूसंपादनामुळे या परिसरातील अनेक शेतकरी बाधित होण्याची शक्यता असून, त्यांच्या जमिनी, मोबदला आणि इतर मागण्यांबाबत बैठकीत मुद्दे मांडण्यात आले. भूसंपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण व्हावे, त्यांच्या रास्त मागण्यांचा शासनाने सकारात्मक विचार करावा आणि त्यांना योग्य न्याय मिळावा, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

जाहिर नोटीस

सर्व लोकांस प्रस्तुत जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मुशेत तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ४५/२ सर्व ऋणबोजेमुक्त अशी अकृषिक मिळकतीचे एकूण क्षेत्र ३०८० चौरस मिटर, जिल्हा परिषद अलिबाग, ग्राम पंचायत मुशेत सर्व ऋणबोजेमुक्त अशी खालील परिशिष्टात नमुद केलेली अकृषीक मिळकत (इथून पुढे 'सदर संपुर्ण मिळकत' असा उल्लेख केला आहे.) सदर संपूर्ण मिळकती पैकी १०७० चौरस मिटर क्षेत्र श्री संजय धर्मा हडकर यांच्या मालकीचे आहे (इथून पुढे 'सदर मिळकत' असा उल्लेख केला आहे.) सदर मिळकतीबाबत माझे आशिलांनी श्री संजय हडकर यांचेसोबत व्यवहार करणेचे निश्चीत केले आहे. सदर मिळकतीचे भागाबाबत मालकी हक्क बयाणा, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, लीन, जामीन, कुळ, भाडेकरू, वारसा हक्क देखभाल, लिव्ह अॅन्ड लायसेन्स, साठेकरार वा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास वा तसा दावा करणाऱ्या व्यक्तींनी, संस्था व संबंधितांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ कार्यालयीन दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंध विषद करून खालील नमुद पत्यावर लेखी कळवावे, वरील नमुद मुदतीत कोणतीही हरकत, दावा, तक्रार वा लेखी म्हणणे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून योग्य तो दस्त नोंदवून हक्क दाखला देण्यात येईल, मुदतीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही व मुदतीनंतर घेतलेली हरकत आमचेवर व आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, कळावे ही जाहिर नोटीस.

परिशिष्ट

जमिनीचे वर्णन : मौजे मुशेत तालुका अलिबाग जिल्हा रायगड जिल्हा परिषद अलिबाग, ग्राम पंचायत मुशेत. येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ४५/२ सर्व ऋणबोजेमुक्त अशी अकृषिक मिळकतीचे एकूण क्षेत्र ३०८० चौरस मिटर सदर संपुर्ण मिळकतीपैकी श्री संजय धर्मा हडकर यांच्या मालकीचे १०७० चौरस मिटर क्षेत्राकरीता.

दिनांक : ३०.१०.२०२६

कविता संदीप भोसले (वकील)
केशव हाईटस्, बी विंग, ९० फीट रोड,
पारसिक नगर, कळवा, ठाणे ४००६०५
Email shreekrupabuilders@yahoo.com
मोबाईल नं. ९९८७८०६०२२

पान १ वरुन

सरपंच, उपसरपंच यांच्यातील वाद चव्हाट्यावर

प्रकारावरून उपसरपंच वसीम फकजी आणि अन्य सदस्यांनी सरपंच विजय तोडणकर यांना जाब विचारला. याच मुद्द्यावरून दोन्ही बाजूंमध्ये वाद वाढत गेल्याचे समजते. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असताना ग्रामपंचायत कार्यालयातील वातावरण तणावपूर्ण बनले. या वादादरम्यान सरपंच विजय तोडणकर यांनी आपल्याला अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप उपसरपंच वसीम फकजी यांच्याकडून करण्यात आला आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने दिघी सागरी पोलीस ठाण्यात सरपंचांविरोधात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तसेच, सरपंच विजय तोडणकर यांनी ग्रामपंचायत कार्यालयात बेकायदेशीर जमाव जमवून शासकीय कामात अडथळा आणल्याचा व शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या तक्रारीवरून उपसरपंच वसीम फकजी यांच्यासह एकूण १२ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

फसवणूकीविरोधात शेकापचा मोर्चा

यांना ती जमीन दिली. मात्र, सुहास सामंत यांनी या जमीनीचा सर्व्हे करून सातबारा उताऱ्यामध्ये बदल घडवून आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. शेतकरी पांडूरंग पाटील यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेत सर्व्हे अधिकारी आणि सामंत यांनी कोऱ्या कागदावर शेतकऱ्यांच्या सह्या घेऊन मिळकत लाटण्याचा प्रयत्न केला, असा आरोपही करण्यात आला आहे. त्यांनी ४०.५ ऐवजी ५३.१० आर इतकी मिळकत घेऊन शेतकऱ्याची मोठी फसवणूक केली आहे. पांडूरंग पाटील या शेतकऱ्याने सामंत यांच्या सोबत जमीनीचा कोणत्याही प्रकारे व्यवहार केला नसतानाही त्यांच्या मिळकतीमधील १३ गुंठे जमीन लुटण्याचा प्रयत्न केला. ही बाब महसूल विभागाच्या निदर्शनास अनेक वेळा आणून दिली. मात्र, पनवेलच्या तहसीलदारांकडून दुर्लक्ष करण्यात आले. अखेर पनवेलमधील शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी याबाबत आवाज उठविला. आणि शेकापचे नेते माजी आ. बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकापचे जिल्हा शेतकरी सभा अध्यक्ष अनिल ढवळे यांच्यासह शेकापच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत अन्यायग्रस्त शेतकऱ्यांच्या हक्कासाठी शुक्रवारी पनवेल तहसील कार्यालयासमोर मोर्चा काढला. यावेळी सातबारा उताऱ्यावरील कमी झालेली जमीन पुर्ववत करून शेतकऱ्याचा सातबारा बनविण्यात यावा. तसेच, तत्कालीन मंडळ अधिकारी, तलाठी, यांनी चुकीच्या पद्धतीने बनविलेला सातबारा रद्द करावा. तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या दुर्लक्षपणामुळे पांडूरंग पाटील हे शेतकरी गेली तीस वर्षे पिकांपासून वंचित राहिले आहेत. त्यांच्यावर झालेला अन्याय तात्काळ दुर करावा. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ढवळे यांनी दिला.

रोहा एमआयडीसीकडून पाणीपुरवठा बंद

महामंडळ रोहा अंतर्गत शुक्रवारपासून दोन दिवसीय शट डाऊन घोषित करण्यात आला आहे. यादरम्यान पाणीपुरवठा करणारी जलवाहिनीची तपासणी, देखभाल व दुरुस्ती तसेच इतर आवश्यक तांत्रिक कामे पूर्ण करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात पाणीपुरवठा खंडित करण्यात आला आहे. या अनुषंगाने रोहे एमआयडीसीकडून दि.३०ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून शनिवार दि.३१ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजेपर्यंत एकूण ३६ तास पाणी पुरवठा खंडित करण्यात येणार आहे. तरी सर्व कारखानदार व ग्राम पंचायतींनी या सूचनेची नोंद घ्यावी, असे आवाहन एमआयडीसी महामंडळाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, या पाणी टंचाईमुळे बहुतांश गावकऱ्यांवर खाजगी टँकरदने पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे.

टेम्पोच्या धडकेत दोघांचा मृत्यू

आली. बस थांबताच मोटे दाम्पत्य आणि बसचा क्लिनर सामान काढण्यासाठी खाली उतरले होते. ते बस आणि फुटपाथ यांच्यामधील जागेत सामान काढत असताना कोंबडी वाहतूक करणारा टेम्पो थेट बस आणि फुटपाथमधील जागेत घुसला आणि तिघांना जोरदार धडक बसली. या अपघातात तिघेही गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने पनवेल उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी संगीता मोटे आणि बाळू सरताते यांना दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले. तर, पोपट मोटे यांना पुढील उपचारासाठी सुश्रुत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी कळंबोली पोलिसांनी टेम्पो चालक इफतेखार अहमद अब्दुल रेहमान याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

अलिबागमध्ये दिवाळी महोत्सवाचा शुभारंभ

मुख्याधिकारी सागर साळुंखे, पुजा साळुंखे, नगरपरिषदेच्या विविध विभागातील सभापती, नगरसेवक, नगरसेविका व कर्मचारी उपस्थित होते.

दिवाळीनिमित्त नागरिकांना एका छताखाली खरेदी करण्याची संधी मिळावी, यासाठी अलिबाग नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने दिवाळी फेस्टीवलचे आयोजन केले आहे. या फेस्टीवलमध्ये खाद्य पदार्थांसह सुगंधीत पदार्थ, पिशव्या, फराळ, वेगवेगळ्या रंगाचे कपडे, अलंकरा, घरगूती उत्पादने, रांगोळीसह रांगोळीचे साहित्य अशा विविध वस्तूंचे २० स्टॉल आहेत. हा उपक्रम महिला बचत गटातील महिलांना आर्थिक बळ मिळावे तसेच रोजगाराचे साधन खुले व्हावे, यासाठी राबविण्यात आला आहे.

दोन दिवस फेस्टीवलची धुम

अलिबाग नगर परिषदेच्यावतीने अलिबाग शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी म्हणजेच परिषदेच्या मोकळ्या पटांगणात दिवाळी फेस्टीवल सुरू केले आहे. या फेस्टीवलचा शुभारंभ शुक्रवारी मोठ्या उत्साहात पार पडला असून, हा महोत्सव १ नोव्हेंबरपर्यंत असा दोन दिवस भरणार आहे. त्यामुळे या महोत्सवाच्या माध्यमातून दिवाळीनिमित्त खरेदीची संधी नागरिकांना मिळणार आहे.

माथेरानमध्ये पाणी चोरीवरून खळबळ

करण्यात आले होते. माथेरान नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याला कपात केली जात आहे. शहरात ऐन पावसाळ्यात पाणी नव्हते आणि आता हॉटेल व्यावसायिक यांच्यासाठी तीन इंचाची जलवाहिनी टाकून पाणी देण्याचा घाट सुरू आहे. दरम्यान, माथेरान नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली आणि हे काम बंद ठेवण्यास भाग पाडले. यावेळी त्यांनी माथेरानचा पर्यटन हंगाम सुरळीत चालण्यासाठी सर्व हॉटेल्ससोबत सामान्य नागरिक, लॉज धारक, स्टॉल धारक यांना देखील पुरेसे पाणी मिळणे आवश्यक आहे. नगरपरिषद प्रशासन आणि पाणीपुरवठा विभागाने याचे स्पष्ट उत्तर द्यावे. तसेच, प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

महसूल कर्मचाऱ्यांचे लेखणी बंद आंदोलन

अनेक पदे रिक्त आहेत. ज्येष्ठता यादीमधील कर्मचाऱ्यांना संधी दिली नाही. त्यामुळे सहाय्यक महसूल अधिकारी यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे अशा विविध मागण्यांकडे जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महसूल कर्मचाऱ्यांनी लेखणी बंद आंदोलन सुरु केले आहे. शुक्रवारपासून सुरु केलेल्या या आंदोलनाला जिल्ह्यातील साडेचारशे कर्मचाऱ्यांकडून प्रतिसाद मिळाला. या कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे लेखणीद्वारे होणारी अनेक कामे रखडली असून, दाखले व इतर कागदपत्र लेखणीद्वारे मिळणे कठीण होऊन बसले आहे.

प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन

जिल्ह्यामध्ये ५२ पदांपैकी १४ पदे रिक्त असून २२ पदे नवनिर्माण आहेत. नायब तहसीलदार पदस्थापनेनंतर ११ पदे रिक्त होणार आहेत. सप्टेंबर २०२७ पर्यंत ५ पदे रिक्त होणार आहेत. पदोन्नती आदेश मिळावे, यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून रायगड जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयात हेलपाटे घालत आहेत. अनेक वेळा निवेदनही दिले आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महसूल कर्मचाऱ्यांनी लेखणी बंद आंदोलन सुरु केले आहे.

माथेरानच्या राणीचा प्रवास सुरू

ब्रिटिश काळापासून घाट सेक्शनमधील धोका टाळण्यासाठी पावसाळ्यात माथेरानची राणी म्हणजेच मिनीट्रेन बंद ठेवली जाते. त्यानंतर दि.१५ ऑक्टोबर रोजी मिनीट्रेन सुरू होत असते. मात्र, यंदा तब्बल १५ दिवस उशिराने नेरळ-माथेरान प्रवासी सेवा सुरू करण्यात आली. तत्पुर्वी मिनीट्रेनची गुरूवारी (दि.२९) नेरळ-माथेरान मार्गावर चाचणी घेण्यात आली. ती चाचणी यशस्वी ठरल्यानंतर शुक्रवारी लगेच नेरळ येथून माथेरानसाठी मिनीट्रेन सुरू करण्यात आली. त्याआधी येथील रेल्वे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मिनीट्रेनसमोर भंडारा उधळला. त्यानंतर स्टेशन मास्टर गुरुनाथ पाटील यांनी मिनीट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी मध्य रेल्वे वाहतूक निरीक्षक अरुण प्रीतम, सेक्शन इंजिनियर अनिल कुमार आणि शाखा अभियंता शरद सानप आदी उपस्थित होते. तसेच, या हंगामातील सकाळी ८:५० वाजता निघालेल्या पहिल्या गाडीचे सारथ्य मोटरमन नरेश भोईर आणि सहायक म्हणून जगदीश कराळे यांनी केले. तर, या पहिल्या गाडीचे गार्ड म्हणून रंजीत कुमार यादव, तर तिकीट तपासनीस म्हणून एस.जे. भगत यांनी जबाबदारी पार पाडली.

नेरळ स्थानकातून सकाळी ८:५० वाजता निघालेली मिनीट्रेन २१ किलोमीटर लांबीच्या पर्वतीय मार्गावरील ज्यूम्मापट्टी, वॉटर पाईप आणि अमन लॉज या तीन स्थानकांसह तब्बल २१९ वेडीवाकडी वळणे आणि दोन लहान बोगदे पार करत माथेरान येथे सकाळी साडेअकरा वाजता पोहचली. परंतु, सध्या सुरू असलेल्या परीक्षांचा हंगाम लक्षात घेता मिनीट्रेनच्या पहिल्या फेरीला प्रवाशांनी अत्यंत अल्प प्रतिसाद दिल्याचे दिसून आले. यावेळी केवळ २८ प्रवाशांनी पहिल्या गाडीचे तिकीट मिळवले असून, प्रथम श्रेणीचे तिकीट कोणीही काढले नाही.त्यानंतर नेरळ स्थानकातून सकाळी १०.२५ वाजता निघालेली मिनीट्रेन दुपारी साडेबारा वाजता माथेरान स्थानकात पोहचली. यावेळी माथेरान स्थानकात उपस्थित असलेले प्रवासी, स्थानिक आणि व्यावसायिक यांनी माथेरानच्या राणीचे जल्लोषात स्वागत केले.

पारेख कुटुंबिय ठरले पहिले प्रवासी

हिवाळी पर्यटन हंगामाची सुरुवात नेरळ येथून मिनीट्रेनच्या प्रवासी वाहतुकीने झाली. यावेळी माथेरान येथे पहिल्यांदाच पर्यटनासाठी आलेले विनय पारेख हे सहकुटुंब नेरळ स्थानकात पोहचले. तेंव्हा मिनीट्रेन जाणार असल्याची उद्घोषणा ऐकली. तात्काळ ते मिनीट्रेनचे तिकीट मिळवण्यासाठी तिकीट खिडकीवर पोहचले. त्यावेळी तेथील बुकिंग कार्यालयातील प्रमुख के.जी. विनोद आणि बुकिंग क्लार्क संतोष महाले यांनी या पहिल्या प्रवाशाचे स्वागत केले. त्यावेळी तिकीट मिळवल्यानंतर आपण पहिले प्रवासी आहोत याचा आनंद या कुटुंबाने व्यक्त केला.

सहकार क्षेत्रात कौशल्यविकासाचे नवे पर्व

पद्धती, नवीन तंत्रज्ञान आणि आर्थिक व्यवहारांचे ज्ञान कर्मचाऱ्यांना असणे आवश्यक असून, पुढील दोन वर्षांत रामफेडच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

आयआयबीएफचे कुलदीप जिंदाल यांनी संस्थेच्या कार्याची माहिती देताना १९२८ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेची २०२८ मध्ये शंभर वर्षांची वाटचाल पूर्ण होणार असल्याचे सांगितले. बँकिंग क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ज्ञान आणि कौशल्य विकसित करण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. बदलत्या बँकिंग क्षेत्रात नवीन नियम, कर्जविषयक कामकाज, आर्थिक व्यवहार, जोखीम व्यवस्थापन, ग्राहकसेवा आणि तंत्रज्ञानाचे ज्ञान आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रामफेडसोबतच्या सामंजस्य करारामुळे ग्रामीण व जिल्हास्तरावरील सहकारी संस्थांमधील कर्मचाऱ्यांनाही राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. दोन दिवसीय प्रशिक्षणामध्ये कर्ज प्रकरणे हाताळणे, कर्जवसुली, आर्थिक व्यवहार, लेखा व्यवस्थापन, ग्राहकसेवा, बँकिंगमधील नवीन बदल आणि संस्थांचे दैनंदिन कामकाज यांसारख्या विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. रामफेडच्या प्रशिक्षण कार्यालयामुळे जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांना सातत्याने प्रशिक्षण घेण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सहकार्य, रामफेडचा पुढाकार आणि आयआयबीएफचे मार्गदर्शन यामुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्राला कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळ मिळण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

अरविंद म्हात्रेंच्या दौऱ्याची दखल

धरणाचे पाणी पनवेल महानगरपालिकेत वर्ग करण्याची मागणी केली होती. या पाणी दौऱ्याची दखल घेत पनवेल पालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी रायगड पाटबंधारे विभागातील कार्यकारी अभियंता यांच्याशी पत्रव्यवहार केला. त्यात त्यांनी जांभिवली आणि मोर्बे येथील धरणाची सद्यस्थितीदर्शक तांत्रिक माहिती व उपलब्ध पाणी साठ्याच्या आरक्षणाबाबत सविस्तर तपशील उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून पाणी आरक्षणाचा सविस्तर प्रस्ताव कार्यालयात सादर करण्यात येईल, असे म्हटले आहे.

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

(हक्कसोड पत्राबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **वाटपपत्र/करारनामा** प्रस्तावित आहे.

अ. क्र.	गाव व संचिका क्र.	निवाडा क्र.	सर्व्हे क्र.	संपादित क्षेत्र	मंजूर पात्रता	करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती
							जि.रायगड	
१	उलवे १९४	गव्हाण ४४३	९१/३ २४४/१ २४३/४ २४३/२ ९०/७ब २३३/३ २२५/२ २२३/३ २२३/१ १००/२ ९२/१ ९५/१ ९५/३ ९५/४ ९६/५ब ९७/८अ+६ब ९७/८ड ९८/० ९९/२(२) २३५/७ ८४/०	०-०३-८ ०-१५-७ ०-०८-० ०-३५-० ०-३७-० ०-०६-३ ०-४१-० ०-२२-० ०-२४-० ०-६९-० १-७२-० ०-०२-३ ०-०४-३ ०-०२-० ०-४६-२ ०-३२-१ ०-०४-८ ०-५३-० १-०८-१ ०-०७-० ०-३०-०	६३०० चौ.मी.	उलवे नोड येथील भूखंड क्र. १६५, सेक्टर-९, क्षेत्र-६३०० चौ.मी.	**कै. बाळकृष्ण परशुराम देशमुख (मयत), कै. सुमित्राबाई बाळकृष्ण देशमुख (मयत), कै. दिपक बाळकृष्ण परशुराम देशमुख (मयत) व कै. अलका विलास देशमुख उर्फ चौधरी (मयत) यांचे वारस** श्री. जयवंत बाळकृष्ण देशमुख, २) श्री. अनंता बाळकृष्ण देशमुख, ३) श्री. प्रमोद बाळकृष्ण देशमुख, ४) श्रीमती लता प्रमोद देशमुख, ५) श्रीमती रोहिनी रमेश देशमुख ६) कु. निकेत रमेश देशमुख ७) कु. संकेत रमेश देशमुख ८) कु. कल्याणी रमेश देशमुख ९) श्री. अनंता बाळकृष्ण देशमुख १०) श्री. प्रमोद बाळकृष्ण देशमुख, ११) श्रीमती लता प्रमोद देशमुख, १२) श्रीमती कल्पना दिपक देशमुख १३) श्री. अक्षय दिपक देशमुख, १४) श्री राहुल विलास देशमुख १५) श्रीमती संध्या सचिन झुंजारराव, १६) श्रीमती हर्षदा राकेश देशमुख १७) श्रीमती दिव्या राकेश देशमुख	एस.सी.एस. १६१/१९९५ स्पेशल दरखास्त क्र. ८/२००१ एस.सी.एस. १०३/१९९६ एस.सी.एस. ५४२/२०११ एस.सी.एस. ६२४८/२०२१ एस.सी.एस. २९६/२०२२ एस.सी.एस. ३९१/२०२४ सिव्हिल अपिल क्र. ११३/२००० रिट पिटीशन क्र. ८०७/२०१० रिट पिटीशन क्र. १८९७/२०१० रिट पिटीशन क्र. १३६७/२०१९
२	कामोठे -२ ४८३	४४४	२८०/२	०-२९-८	२५० चौ.मी.	भूखंड क्र. सी-५८, सेक्टर-४७, क्षेत्र- २५० चौ.मी. **कामोठे नोड**	**बाळक्या गणू शेळके**	निरंक
३	कामोठे -२ २०४	वळवली १६१	११६/५	०-१५-०	१५० चौ.मी.	भूखंड क्र. १२, सेक्टर-२३, क्षेत्र- १५० चौ.मी. कामोठे नोड	**कै. नागुबाई तुकाराम पालेकर (मयत) यांचे वारस –** १) श्री. जाना तुकाराम पालेकर	निरंक
४	२५० तळोजा	तळोजा २६९अ/ ४३४	६/५, ५/५ब, ५अ/२पै	०-१०-८ ०-१०-० ०-०५-१	३२०० चौ.मी. पैकी ४५० चौ.मी.	दि. ०९.०४.२०२६ रोजीच्या संगणकीय सोडतीमध्ये भूखंड क्र. ३७C, सेक्टर-१६, क्षेत्र- ४५० चौ.मी.	**मुळ भुधारक** **कै. सलमाबिबी गुलाम नम्रे, कै. गुलाम महमद हुसेन नम्रे (मयत) आणि कै. सुफियान गुलाम महमद नम्रे (मयत) यांचे वारस** १) श्रीमती फतिमा गुलाब महमद नम्रे २) शारबानु गुलाम महमद नम्रे ३) मुजम्मील गुलाम महमद नम्रे	मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांच्या न्यायालयातील दावा क्र. S.C.S. ९९/२०११
		तळोजा २६९अ/ ३४२	६/१/१ ६/६ १६/२ ९८अ/५ ८१/४ २२९/१ २२९/२/१	०-३३-० ०-०१-० ०-४५-० ०-११-४ ०-३३-७ १-३२-० ०-५०-१				
			एकूण	**३-६२-६**				
४	तळोजा ३९६	तळोजा पाचानंद १३८A/ ८४	१८७/४	०-३२-९	३०० चौ.मी. पैकी २०६ चौ.मी.	तळोजा येथे भूखंड क्र. ९४+९५, सेक्टर-२, क्षेत्र- २०६ चौ.मी.	श्री. जयराम गोमा केणी	--
			एकूण क्षेत्र	०-३२-९				
५	पागोटे ९२३	२५८ (१)/ ८५-८६	७/२ २१/५ ३०/३ ६८/४ १००/१० १०३/६ ११२/५ १३२/१	०-०६-३ ०-१६-२ ०-०५-० ०-११-४ ०-१५-४ ०-१३-७ ०-१५-९ ०-११-९	पात्रता ८३८.२५ पुर्णांकात ८५० चौ.मी.	नोड द्रोणागिरी, भूखंड क्र. २९, सेक्टर-५६, क्षेत्र- ८५० चौ.मी. दि. प्रस्तावित	श्री. दत्तात्रेय काळ्या पाटील	निरंक
			एकूण संपादित क्षेत्र	०-९५-८				
६	तळोजा २५०	तळोजा पाचानंद १४३A	१३०/२ +३+४ +६	०-३६-२	३०० चौ.मी.	तळोजा येथे भूखंड क्र. ३२D, सेक्टर-१९, क्षेत्र- २९९.५५ चौ.मी.	**कै.हमीदाबीबी शेख अब्दुल रहेमान (मयत), कै.अब्दुल गफुर अब्दुल रहेमान (मयत), कै.अब्दुल रजाक अब्दुल रहेमान (मयत), कै.अब्दुल सत्तार अब्दुल रहेमान (मयत), कै.युनुस अब्दुल गफूर शेख (मयत) यांचे वारस** १) हमीद युनुस शेख २) हनीफा अलीसाहेब शेख ३) राशीदा हनीफ नार्लेकर **आणि कै. हनिफा अलीसाहेब शेख (मयत) यांचे वारस** १) अलीसाहेब बाबुअली शेख २) मन्सूर अहमद अलीसाहेब शेख ३) अमजद अलीसाहेब शेख ४) शबनम सलीम शेख	--
			एकूण क्षेत्र	०-३६-२				
७	नावडे ९४	२१	११२/४अ ११६/२ **एकूण क्षेत्र**	०-२३-० ०-०१-० **०-२४-०**	२०० चौ.मी.	भूखंड क्र. २७, सेक्टर-४४, क्षेत्र- २०० चौ.मी.	**कै.चिमाबाई सिताराम खानावकर (मयत), कै.धर्मा सिताराम खानावकर (मयत), कै.विजय धर्मा खानावकर (मयत) यांचे वारस** १. श्री. काशिनाथ सिताराम खानावकर, २. श्रीमती मंजुबाई रामा भगत, ३. श्रीमती सेवूबाई विजय खानावकर, ४. श्री. वरज विजय खानावकर	निरंक

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड),
मुख्य भूमी व भूमापन विभाग (१२.५ टक्के), सिडको भवन,
तळ मजळा, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२७८/२०२६-२७

महानगर गॅस पाईपलाईनचे काम रोखले

| खोपोली | प्रतिनिधी |

- **साजगाव-आडोशी रस्त्यावर तणाव**
- **ठेकेदाराच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह**



खालापूर तालुक्यातील साजगाव-आडोशी रस्त्यालगत महानगर गॅस कंपनीकडून सुरू असलेल्या पाईपलाईन टाकण्याच्या कामावरून ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. खासगी जागामालकाची पूर्वपरवानगी न घेता त्याच्या जागेसमोरून पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू केल्याचा आरोप करत रामचंद्र देशमुख यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत काम बंद पाडले. या प्रकारामुळे संबंधित ठेकेदाराच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, महानगर गॅस कंपनीने स्थानिकांना विश्वासात घेतले आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

साजगाव-आडोशी रस्त्यालगत महानगर गॅस कंपनीच्या पाईपलाईनचे काम सध्या सुरू आहे. मात्र, हे काम करताना सार्वजनिक बांधकाम विभागाने घालून दिलेल्या अटी व नियमांचे पालन होत आहे का, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. साजगाव येथील रामचंद्र देशमुख यांच्या जागेसमोरून पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू असताना त्यांची कोणतीही परवानगी घेतली नसल्याचा आरोप आहे. जागामालकाला विश्वासात न घेता काम सुरू केल्याने देशमुख यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

पाईपलाईन टाकण्याच्या कामाचा परिणाम केवळ आजच्या कामापुरता मर्यादित नसून भविष्यातील जागेच्या वापरावरही होऊ शकतो, अशी चिंता देशमुख यांनी व्यक्त केली आहे. भविष्यात या जागेवर बांधकाम किंवा अन्य विकासकाम करायचे झाल्यास पाईपलाईनमुळे अडचणी निर्माण होण्याची शक्यता असून, जागेच्या वापरावर मर्यादा येण्याबरोबरच आर्थिक नुकसानही सहन करावे लागू शकते, अशी त्यांची भूमिका आहे.

विकासकाम करताना संबंधित जागामालकाचे हक्क आणि आवश्यक परवानग्यांची पूर्तता करणे अपेक्षित असते. मग पाइपलाइनचा मार्ग निश्चित करताना जागामालकाला पूर्वकल्पना देण्यात आली होती का? सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी नेमक्या कोणत्या अटींवर मिळाली? त्या अटींचे पालन ठेकेदाराकडून केले जात आहे का? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

या प्रकरणी संतप्त झालेल्या देशमुख यांनी सहकाऱ्यांसह कामाच्या ठिकाणी जाऊन पाईपलाइनचे काम थांबवले. त्यानंतर परिसरातील ग्रामस्थांनीही या प्रकाराबाबत नाराजी व्यक्त केली. संबंधित ठेकेदार मनमानी पद्धतीने काम करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत असून, संपूर्ण कामाची चौकशी करण्याची मागणी पुढे आली आहे.

महानगर गॅस कंपनीसारख्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पाचे काम करताना स्थानिक नागरिकांचे प्रश्न आणि जागामालकांचे हक्क दुर्लक्षित करून चालणार नाही. परवानग्या, पाईपलाईनचा निश्चित मार्ग आणि तांत्रिक बाबींची पूर्तता याबाबत पारदर्शकता असणे आवश्यक आहे. केवळ काम पूर्ण करण्याच्या घाईत स्थानिकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष होत असेल, तर त्यातून संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे.

विकासकामांना विरोध नाही

विकासकामांना ग्रामस्थांचा विरोध नाही; मात्र नागरिकांच्या हक्कांकडे दुर्लक्ष करून काम रेटले जाणार असेल, तर ते सहन केले जाणार नाही, अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. त्यामुळे साजगाव-आडोशी येथील हा वाद आगामी काळात कोणते वळण घेतो, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

निवडक

प्रवाशांची पाण्यासाठी वणवण

पनवेल : राज्यभरातून ये-जा करणाऱ्या हजारो प्रवाशांची वर्दळ असलेल्या पनवेल एसटी बसस्थानकात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याची तक्रार समोर आली आहे. बसची वाट पाहणाऱ्या प्रवाशांना साधे पिण्याचे पाणीही उपलब्ध होत नसल्याने विकतच्या बाटल्या घेऊन तहान भागवावी लागत आहे. प्रवाशांच्या या मूलभूत गरजेकडे एसटी प्रशासनाचे अधिकारी लक्ष देत नसल्याने संताप व्यक्त होत आहे. पनवेल हे महत्त्वाचे वाहतूक केंद्र असून, येथील बसस्थानकातून दररोज मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. बसची प्रतीक्षा करताना



पिण्याचे पाणी मिळत नसल्याने प्रवाशांना नाईलाजाने पैसे खर्च करून पाण्याच्या बाटल्या खरेदी कराव्या लागत आहेत. प्रवाशांकडून तिकीटाचे पैसे घेणाऱ्या एसटी प्रशासनाला बसस्थानकात पिण्याच्या पाण्यासारखी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देता येत नाही का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. प्रवाशांना स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असताना, त्यासाठीही प्रवाशांना खिशाला कात्री लावावी लागत असेल, तर ही बाब गंभीर आहे. बसस्थानकातील पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करत असल्याची तक्रार प्रवाशांकडून केली जात आहे. या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याऐवजी प्रशासनाने डोळेझाक केल्यास प्रवाशांच्या अडचणी कायम राहणार आहेत. त्यामुळे एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करून स्वच्छ पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

उघड्या डीपींमुळे जीविताला धोका

पनवेल : कामोठे सेक्टर १७ मधील जय गुरुदेव कॉम्प्लेक्सजवळ तसेच परिसरातील अनेक ठिकाणी महावितरणच्या विद्युत वितरण पेट्या (डीपी) उघड्या अवस्थेत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. डीपीमधील उघड्या वायरींमुळे लहान मुले, पादचारी आणि शाळकरी विद्यार्थ्यांना विजेचा धक्का लागण्याचा धोका असून, दुर्घटना घडण्यापूर्वी महावितरणने उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. जय गुरुदेव कॉम्प्लेक्सजवळील डीपी रस्त्याच्याकडेला असल्याने या मार्गावरून नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते.

परिसरात इंडो स्कूल असल्यामुळे विद्यार्थ्यांचाही वावर असतो. त्यामुळे उघड्या डीपींचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. या समस्येबाबत खा. बारणे यांच्या उपस्थितीत महानगरपालिकेत झालेल्या बैठकीत चर्चा झाल्याचे सांगण्यात येते. मात्र, वारंवार लक्ष वेधूनही आवश्यक उपाययोजना झाल्या नसल्याची तक्रार नागरिक करीत आहेत. वीजबिल भरण्यास विलंब झाल्यास ग्राहकांना तत्काळ नोटिसा देणाऱ्या महावितरणने नागरिकांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नाकडेही तितक्याच गांभीर्याने लक्ष द्यावे. तसेच पनवेल परिसरातील सर्व उघड्या डीपींची तपासणी करून असुरक्षित वायरी बदलाव्यात अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

सुधागडमध्ये लेखणी बंद आंदोलन

सुधागड-पाली : रायगड जिल्ह्यातील महसूल विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पदोन्नतीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. २०२१ पासून महसूल सहाय्यक संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळालेली नसल्याच्या निषेधार्थ जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेने शुक्रवार, ३० ऑक्टोबर रोजी पुकारलेले एकदिवसीय लेखणी बंद आंदोलन सुधागड तालुक्यात यशस्वी झाले. या आंदोलनामुळे सुधागड-पाली तहसील कार्यालयातील नियमित कामकाज पूर्णपणे ठप्प झाले होते. कर्मचाऱ्यांनी लेखणी बंद ठेवत आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी एकजूट दाखवली. जिल्ह्यातील महसूल विभागात अव्वल कारकून संवर्गातील पदोन्नतीचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश तातडीने देण्यात यावेत, या मागणीसाठी संघटनेने यापूर्वी सुधागड-पाली तहसीलदारांना निवेदन सादर केले होते. मागण्या मान्य न झाल्यास (दि.३०) ऑक्टोबर रोजी लेखणी बंद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार शुक्रवारी हे आंदोलन करण्यात आले होते.



टोरेंट विरोधात कर्जत बंदची हाक

कर्जत : साई डोंगर परिसरात टोरेंट वीज प्रकल्प येत आहे. या प्रकल्पासाठी लाखो झाडांची कत्तल होणार आहे. या प्रकाराला पर्यावरणप्रेमी बरोबरच सर्वांचाच विरोध होत असल्याने सोमवार (दि.२) नोव्हेंबर रोजी कर्जत तालुका बंदची हाक देण्यात आली आहे. यासाठी सर्व राजकीय पक्षांनी, सामाजिक संघटनांनी, व्यापारी संघटनांनी, नागरिकांनी पाठिंबा द्यावा असे आवाहन उबठाचे नितीन सावंत यांनी आवाहन केले आहे. याप्रसंगी बाजीराव दळवी, चित्रा ठाकरे,नमिता श्रीखंडे, रामदास घरत, राजेश जाधव, कृष्णा घाडगे, प्रमिला बोराडे, जगदीश ठाकरे, सुरेश बोराडे आदी उपस्थित होते.

रोहा तालुक्यात चाऱ्यांचा प्रश्न गंभीर

| कोलाड | प्रतिनिधी |



परतीचा पाऊस गायब झाल्यामुळे याचा मोठा फटका रोहा तालुक्यातील भातशेतीला बसला असून हातोंडांशी आलेला घास हिरावून नेला आहे. त्यामुळे गुरांच्या चाऱ्यांचा प्रश्न गंभीर बनला असून बळीराजा मेटाकुटीला आला आहे. प्रशासनाने भातशेतीची पाहणी करून पंचनामे करावे व शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत दयावी अशी मागणी शेतकरी वर्गातून व्यक्त करण्यात आली आहे.

शासनाने जिल्ह्यातील फक्त श्रीवर्धन तालुका दुष्काळग्रस्त तालुका म्हणून घोषित केला आहे. परंतु संपूर्ण जिल्ह्यातून परतीचा पाऊस गायब झाला आहे. यामुळे संपूर्ण भातपीक नष्ट झाला आहे. ज्या भातशेतीमध्ये पाणी साचून राहिला आहे आशा ठिकाणी भातशेती तयार झाल्याचे दिसून येत आहे.परंतु साठ टक्के भातशेती पाण्याअभावी सुकून गेली आहे.

दरवर्षी हस्त नक्षताच्या परतीच्या पावसामुळे भातशेतीला पूरक पाऊस पडून भातशेती पूर्णपणे तयार होते. परंतु हस्त, चित्रा, स्वाती, तिन्ही नक्षत्र पाऊस पडला नाही. त्यामुळे लोंबी निसावल्या नाही. तर काही लोंबी निसावल्या पण दाणा भरला नसल्यामुळे येथील शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून दिवाळी पूर्वी शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी अशी मागणी शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे.

लाच लुचपत कायद्याबाबत जनजागृती

| पोलादपूर | प्रतिनिधी |

लाच देणे व घेणे दोन्हीही कायद्याने गुन्हा आहे, कुठलेही सरकारी काम लाच न देता झाले पाहिजे हा नागरिकांचा अधिकार आहे, या भूमिकेतून लाच लुचपत प्रतिबंधक विभाग रायगडच्या पोलीस उप अधीक्षक सरिता भोसले यांनी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे विशेष अभियान सोमवारी (दि.२६) ऑक्टोबरपासून सुरू केले आहे. याअंतर्गत पोलादपूर शहरात लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या जुन्या तक्रारदारांसह परिसरातील समाजसेवक, अशासकीय संस्थांचे पदाधिकारी तसेच नागरिकांच्या भेटी घेऊन अँटी करप्शन कायद्याबाबतीत जनजागृती करण्यात येणार आहे. लाच लुचपत प्रतिबंधक विभाग रायगडच्या पोलीस उप अधीक्षक भोसले, पोलीस निरीक्षक निशांत धनवडे, निरीक्षक नारायण सरोदे यांच्या उपस्थितीत जनजागृती केली.

जिल्ह्यात नागरिकांची या कायद्याबाबतीत जनजागृती करण्यासाठी सुरू असलेल्या विशेष अभियानात सहभागी होऊन भ्रष्टाचारमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन सरिता भोसले यांनी केले आहे.

दुर्मिळ मांडूळ सापाची सुटका

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |



पनवेल ग्रामपंचायत दुदरे हद्दीतील शिवणसई गावात मांडूळ साप आढळून आल्याने नागरिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले होते. याबाबत माहिती मिळताच सेव्ह वाइल्ड लाईफ टीम पनवेलच्या सदस्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत सापाची सुटका केली. मांडूळ सापाबाबत समाजात अनेक गैरसमज आणि अंधश्रद्धा प्रचलित आहेत. पैशाचा पाऊस, तांत्रिक गोष्टीसाठी वापरला जातो ही सर्व अंधश्रद्धा आहे. या सापाला विनाकारण मारू नये किंवा त्रास देऊ नये. वन्यजीवांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. साप आढळल्यास त्याला स्वतः पकडण्याचा प्रयत्न न करता प्रशिक्षित सर्पमित्रांशी संपर्क साधावा, असे आवाहन सेव्ह वाइल्ड लाईफ टीम पनवेलच्या वतीने करण्यात आले. यावेळी विश्वास पाटील, ग्रुप ग्रामपंचायत सदस्य दुदरे, संभाजी पोळे, वृषाली कोळी, तेजस अविनाश उलवेकर, सतीश म्हात्रे, कल्पेश मोहकर, सेव्ह वाइल्ड लाईफ टीम, पनवेल उपस्थित होते.

करंजाडेतून एर्टिगा कारची चोरी

पनवेल : करंजाडे येथील सेक्टर २ ए परिसरातून घराबाहेर पार्क केलेली मारुती सुझुकी एर्टिगा कार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. रामदास बोस्कर यांची पांढऱ्या रंगाची कार चोरीला गेली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोस्कर यांनी २०२१ मध्ये मारुती सुझुकी कंपनीची एर्टिगा कार (एमएच १४ जीआर १८७६) खरेदी केली होती. याबाबत पुढील तपास पोहवा अरुण चव्हाण करीत आहेत.

माणगावात अन्नत्याग आंदोलन सुरु

| माणगाव | प्रतिनिधी |



केवळ श्रीवर्धन नव्हे तर रायगड जिल्ह्यातील उर्वरित सर्वच १४ तालुक्यांतील शेतकरी राजा पुरता हवालदिल झाला असून या कष्टकरी गोरगरीब शेतकऱ्यांवर आज घडीला आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. शासनाने याकडे लक्ष देऊन संपूर्ण रायगड जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा. या प्रमुख मागणी संदर्भात माणगाव तहसील कार्यालयासमोर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातर्फे बुधवारी (दि.२८) ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वा.अन्नत्याग आंदोलन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आले आहे. या अन्नत्याग आंदोलनासाठी पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष सज्जाद डावरे, श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष संताजी पवार, माणगाव तालुकाध्यक्ष राजू रोडेकर, महाड तालुकाध्यक्ष संदीप सकपाळ, तळा तालुकाध्यक्ष अजहर कुरुक्कर, अलिबाग तालुकाध्यक्ष साईनाथ म्हात्रे, अश्विनी ठाकूर, स्नेहा पाटील, सचिन पाटील, अबूबकर गोडमे, मकसूद हरगे, प्रवीण जाधव, रामदास कदम यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.



तळा तालुक्यात भातशेती संकटात

| तळा | प्रतिनिधी |

तळा तालुक्यात यंदा निसर्गाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घासच हिरावून घेतला आहे. वेळेवर पाऊस न पडणे, मधल्या काळात पडलेला प्रदीर्घ खंड यामुळे भात पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे.

तळा तालुका हा संपूर्णपणे भातशेतीवर अवलंबून आहे. यंदा पेरणीच्या सुरुवातीलाच पावसाने ओढ दिल्याने अनेक भागात दुबार पेरणी करावी लागली. त्यानंतर पावसाने दडी मारल्याने भाताची वाढ खुंटली.

भाताचे कणीस भरण्याच्या महत्त्वाच्या काळात पाण्याअभावी पिके करपून गेली. परिणामी उत्पादनात ४० ते ५० टक्क्यांपर्यंत घट होण्याची भीती व्यक्त होत आहे. ज्या शेतकऱ्यांच्या शेतात थोडे-फार पीक हातात येण्याची अपेक्षा होती तीही पावसाअभावी धुळीस मिळाली आहे. हातात आलेले पीक डोळ्यादेखत वाया जात असल्याने बळीराजा पूर्णपणे हवालदिल झाला आहे. शासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी मदत जाहीर करावी आणि पीक विम्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

बेशिस्त वाहनचालकांना वाहतूक शाखेचा दणका

| पनवेल | प्रतिनिधी |

- **रस्ते अडवून पार्किंग करणाऱ्यांवर कारवाई**

पनवेल शहरातील मोहल्ला परिसरात बेशिस्त पार्किंग करून वाहतुकीचा खोळंबा करणाऱ्या वाहनचालकांविरोधात अखेर पनवेल शहर वाहतूक शाखेने कारवाईचा बडगा उगारला आहे. दुचाकी, चारचाकी, रिक्षा कुठेही उभ्या करून रस्ते अडविण्याच्या प्रकारांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. याबाबत वारंवार तक्रारी प्राप्त झाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी संबंधित वाहनचालकांवर कारवाई केली.

वाहनचालकांनी मनमानी पार्किंग बंद करून वाहने निर्धारित जागेतच उभी करावीत, रिक्षाचालकांनी अधिकृत रिक्षा थांब्यांचाच वापर करावा आणि रस्त्याच्या मध्यभागी हातगाड्या उभ्या करून वाहतुकीला अडथळा निर्माण करू नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. परिसरातील अनेक जुनी व बेवारस वाहने रस्त्यावर असल्याने वाहतुकीची समस्या अधिक गंभीर बनली आहे. या कारवाईदरम्यान लतीफ शेख, मुकीत काझी, जवाद काझी यांनी पुजारी यांची भेट घेऊन वाहतूक कोंडी, बेशिस्त पार्किंग आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर चर्चा केली.



काळानुसार रंगांत, आकारांत बदल | स्थानिक विक्रेत्यांच्या कलेला हातभार

मातीच्या पणत्यांचा पारंपरिक उजेड कायम

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |



बाजारात कितीही रंगीबेरंगी आणि आकर्षक पणत्या दाखल झाल्या, तरी लाल मातीच्या पणत्यांचे महत्त्व आजही कायम आहे. आधुनिक सजावटीच्या झगमगाटातही पारंपरिक मातीच्या पणत्यांबद्दल नागरिकांच्या मनात असलेले प्रेम कमी झालेले नाही. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पनवेलमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात लाल मातीच्या लहान-मोठ्या पणत्यांसह विविध आकारांच्या पणत्या आणि छोट्या कंदिलांची विक्री सुरू झाली आहे.

दिवाळी म्हणजे अंधारावर प्रकाशाचा विजय. या सणात घराच्या उंबरठ्यावर, तुळशीवृंदावनाजवळ आणि देवघरात पणत्या लावण्याची परंपरा अनेक वर्षांपासून जपली जात आहे. काळानुसार पणत्यांच्या रंगांत, आकारांत आणि सजावटीत बदल झाला असला, तरी साध्या लाल मातीच्या पणतीची जागा मात्र आजही कायम आहे. मातीचा नैसर्गिक रंग आणि त्यात तेवणारी तेलाची ज्योतीमुळे पारंपरिक पणत्यांना वेगळीच शोभा प्राप्त होते.

लाल मातीची साधीशी पणती तयार करण्यामागे कुंभार आणि मातीच्या वस्तू बनवणाऱ्या कारागिरांचे कष्ट असतात. मातीला आकार देण्यापासून ती वाळवणे आणि भाजून तयार करण्यापर्यंत अनेक टप्प्यांतून पणती तयार होते. दिवाळीत या पणत्यांची खरेदी केल्याने पारंपरिक हस्तकलेला आणि स्थानिक विक्रेत्यांनाही हातभार लागतो.

अनेक वर्षांपासून जपली परंपरा

छत्रपती शिवाजी महाराज चौकात दिवाळीसाठी विविध आकारांच्या लाल मातीच्या पणत्या विक्रीसाठी आल्या आहेत. घराच्या दारात लावण्यासाठी मोठ्या पणत्या, देवघरासाठी छोट्या पणत्या, तर रांगोळीच्या सजावटीसाठी वेगवेगळ्या आकारांच्या पणत्या उपलब्ध आहेत. आधुनिक काळात इलेक्ट्रिक दिव्यांचा वापर वाढला असला, तरी तेल-वातीची पणती लावण्याचा आनंद काही वेगळाच असल्याची भावना नागरिकांमध्ये दिसून येते. प्रतिकृतींमुळे शिवरायांच्या दूरदृष्टीची ओळख नव्या पिढीला होते.

आज बाजारात विविध रंगांच्या पणत्या उपलब्ध असल्या, तरी लाल मातीच्या पणतीतून मिळणारा पारंपरिक प्रकाश मनाला वेगळे समाधान देतो. विजेच्या दिव्यांची कितीही रोषणाई असली, तरी तेलाच्या पणतीची छोटीशी ज्योत घरात प्रसन्नता निर्माण करते. त्यामुळे यंदाच्या दिवाळीतही पनवेलकरांच्या खरेदीत लाल मातीच्या पणत्यांना महत्त्वाचे स्थान मिळत आहे.

पनवेलमधून तरुणीचे अपहरण

| पनवेल | प्रतिनिधी |



पनवेल तालुक्यातील घोटगाव येथून २२ वर्षीय तरुणीचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना समोर आली आहे. काजल प्रल्हाद चौधरी असे बेपत्ता तरुणीचे नाव असून, याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काजल ही घोटगाव येथील प्रकाश मेडिकलच्या पाठीमागे असलेल्या बाळाराम पाटील यांच्या इमारतीतील खोली क्रमांक ३ येथे कुटुंबासह राहत होती. अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी तिचे अपहरण केल्याची तक्रार तिचा भाऊ हिरण चौधरी यांनी पोलिसांकडे केली आहे.

बेपत्ता काजल चौधरी हिचे वय २२ वर्षे, उंची अंदाजे पाच फूट, रंग गोरा, चेहरा गोल, नाक सरळ आणि बांधा मध्यम आहे. ती बेपत्ता झाली त्यावेळी हिरव्या व पांढऱ्या रंगाचा डिझाइन असलेला सलवार-कमीज परिधान केला होता. तिच्या पायात गुलाबी रंगाची चप्पल होती. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश शिंदे करीत असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांकडून तरुणीचा शोध घेण्यात येत आहे.

तलवारी निघाल्या

विधानपरिषद निवडणुकीनंतर महायुतीतील भाऊबंदकी जगासमोर आली. भाजप आणि शिंदे गटाच्या नेत्या-प्रवक्त्यांनी तलवारी बाहेर काढल्या. हे होणारच होते. विधानसभा निवडणुकांपासूनची ही खदखद आहे. आता जनता विसरली असेल. पण तेव्हा मुख्यमंत्रिपद मिळावे म्हणून शिंदे अडून बसले होते. त्यामुळे प्रचंड बहुमत मिळूनही युतीने बराच काळ सरकार स्थापन केले नव्हते. नंतरही जनतेचे लाडके भाऊ आपणच आहोत असे शिंदे वेळोवेळी सांगत असत. लोकसभेला भाजपला खासदार कमी पडत असल्याने मोदी व शहा यांना शिंदे गटाचे महत्व आहे. त्यामुळे दिल्लीत त्यांना या नेत्यांच्या भेटी लगेच मिळतात. अशा भेटी होऊ द्यायच्या पण प्रत्यक्षात राज्यात शिंदे गटाला खच्ची करायचे हेच भाजपचे धोरण राहिले आहे. दिल्लीतल्या नेत्यांचा त्यासाठी पूर्ण पाठिंबा आहे. हे धोरण लक्षात आल्यापासून शिंदे गटातील चीडचीड वाढली आहे. शिंदे गट यांचा जो काही शिवसेना पक्ष आहे त्याला स्वतः चा कसलाही आकार, उकार, ध्येय, धोरण नाही. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेतात, पण पहिलीपासून हिंदी सक्तीची करण्याच्या प्रश्नावर हे ठाम विरोधाची भूमिका घेऊ शकले नव्हते. उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करून दिल्लीवाल्यांना खूष करणे हाच यांचा एककलमी कार्यक्रम आहे. मोदींचे नाव तर फडणवीस जेवढ्या वेळा घेत नसतील तेवढे शिंदे घेत असतात. या शिंद्यांचे जागोजागीचे स्थानिक जमादार भाजप आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीला डोळे वटारून दाखवू लागले आहेत. दुसरीकडे २०२९ मध्ये स्वबळावर लढायचे असा थेट अमित शहा यांचा आदेश असल्याने भाजपवाले शिंदे गटाला ठिकठिकाणी चेपत आहेत. दादा गटाला तर ते जमेसही धरत नाहीत. विधानपरिषद पदवीधरच्या निवडणुकीत पुण्याची जागा गेल्या वेळी राष्ट्रवादीच्या अरुण लाड यांनी जिंकली होती. पण उमेदवारी ठरवताना भाजपने दादा गटाला विचारलेही नाही. त्यांची संमती गृहित धरली गेली. मुंढवा जमीन प्रकरणात धाकल्या पवारांचे नाव असल्याने आणि अजून त्यांच्याविरुध्द गुन्हा का दाखल नाही असा सवाल खुद्द उच्च न्यायालयाने केल्याने दादा गटाचा हात दगडाखाली आहे. त्याचा फायदा घेऊन भाजपने खेळी केली.

थेट फडणवीसांवर हल्ला

पण पुण्यात शिंदे गटाचे दोन दोन उमेदवार इच्छुक होते. मंगेश चिवटे यांनी उमेदवारी जाहीर केल्याचे खुद्द एकनाथ शिंदे यांनी आनंदाने जाहीर केले होते. सचिन सानप यांना उदय सामंत वगैरेंचे बळ होते. अखेर चिवटे यांनी माघार घेतली. पण सानप रिंगणात राहिलेच. हिला मैत्रीपूर्ण लढत असे गोंडस नाव दिले गेले. पण प्रत्यक्षात तिच्यात तमाम सर्व प्रकारचे शत्रुत्व होते. तेच आता निकालांनंतर बाहेर आले आहे. रवींद्र धंगेकर यांनी हे निकाल म्हणजे जनमत भाजपच्या विरोधात गेल्याचे लक्षण आहे असे जाहीर केले. शिवाय देवेंद्रांना बदलून पुन्हा शिंदे यांना मुख्यमंत्री करा अशी थेट मागणी त्यांनी केली. शिंदे गटाच्या तमाम मंडळींच्या मनाला गुदगुल्या करणारी ही मागणी असल्याने त्याबाबत तात्काळ कोणाचा खुलासा वगैरे आला नाही. आता दोन दिवसांनी एकनाथ शिंदे धंगेकर यांना रागावल्यासारखे करतील. फडणवीस वगैरेंची एकत्र बैठक झाल्याचे दाखवले जाईल. पण त्यातून आतली खुन्नस फार काळ लपून राहणार नाही. याच धंगेकरांनी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या वेळीही भाजपच्या आणि दादा गटाच्या विरोधात अनेक वक्तव्ये केली होती. हे धंगेकर एकेकाळी कसब्यातून काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आले होते. तेव्हा त्यांनी भाजपची गिरीश बापटांची (निधन झाल्यानंतरची) जागा खेचून आणली म्हणून महाविकास आघाडीमध्ये मोठा जल्लोष झाला होता. भाजपच्या लोकांचा तेव्हापासून त्यांच्यावर दात आहे. नंतर धंगेकरांना शिंदे गटाने आपल्याकडे घेतले. त्यांनाच शिंदे गटातर्फे नेमके खुन्नस काढण्यासाठी पुढे केले जाते हे सूचक आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीतही शिंदे गटाने भाजपपेक्षा आपली वेगळी चूल मांडली होती. तिकडे औरंगाबादमध्ये शिंदे गटाच्या अब्दुल सत्तार यांनी दादा गटाचे सतीश चव्हाण यांचे काम करण्याचे नाकारले. उघडपणे शरद पवार गटाच्या प्रतापसिंग पाटील यांना पाठिंबा दिला. हे सत्तारही जुनी शिवसेना, काँग्रेस असा प्रवास करून आता शिंदे गटात आलेले आहेत हे उल्लेखनीय आहे.

पुढची तीन वर्षे हेच

एकूण भाजपला कितीही स्वबळाची आस असली तरी आपण त्यात ठिकठिकाणी खोडे घालू शकतो हे दाखवण्याचा चंग शिंदे सेनेने बांधला आहे. विधानपरिषदेचे निकाल तेच दर्शवतात. काल याच स्तंभात म्हटल्याप्रमाणे भाजपचा सत्तेचा माज कळसाला पोचलेला आहे. त्यांना हा विरोध सहन करणे शक्य नाही. यातूनच मग गुरुवारी झाले तसे आरोप प्रत्यारोप होत आहेत. यासाठी खालच्या स्तरावरच्या नेत्यांना व प्रवक्त्यांना पुढे केले जात असले तरी ही खरी शिंदे व फडणवीस यांच्यातलीच लढाई आहे. इथून पुढच्या काळात ही तलवारबाजी वाढतच जाणार आहे. युतीधर्म पाळला नाही हा आरोप करणे ही युती तोडण्याची पहिली पायरी आहे. मूळ शिवसेना आणि भाजप युती २०१४ मध्ये पहिल्यांदा तुटली तेव्हा त्यावेळचे प्रदेशाध्यक्ष एकनाथ खडसे यांनी हाच आरोप केला होता. निवडणुकीनंतर ठाकरे पुन्हा भाजपसोबत गेले तरी प्रत्यक्षात ते विरोधकांचीच भूमिका बजावत होते. युतीमध्ये आपली २५ वर्षे सडली हे त्यांचे उद्गार युतीत असतानाचे आहेत. त्यानंतर तेव्हाचे मंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या विरोधात आपला राजीनामा ठाकरे यांच्याकडे सादर केला होता. तेव्हा भाजपचा धोका काय आहे हे शिंदे यांना तेव्हापासून ठाऊक आहे. भाजप हादेखील शिंदे यांना त्या राजीनाम्याच्या काळापासून ओळखून आहे. बाहेरून मैत्रीचे कितीही नाटक चालू असले तरी प्रत्यक्षात आपणच एकमेकांचे खरे शत्रू आहोत हे या दोघांनाही चांगले ठाऊक आहे. अलिकडे भीमाशंकर आणि कर्जतच्या टोरेंट वीज प्रकल्पावरुन जे नाराजीचे सूर उमटले त्यात शिंदे गटाचे लोकही सहभागी झाले आहेत. ठाण्यात पूर्णेकर हत्या प्रकरणात सध्या संशयाची सुई शिंदे गटाच्या नेत्यांकडे वळली आहे. खुद्द ठाण्यात शिंदे यांना घेरण्यासाठी एक चांगले प्रकरण मिळाले म्हणून भाजपवाले याकडे पाहत आहेत. गृह खाते भाजपकडे आहे. कालपर्यंत शिंदे गटाच्या जिल्हा महिला प्रमुख असलेल्या मीनाक्षी शिंदे यांचे पती राजेंद्र शिंदे यांची या प्रकरणात पोलिसांनी अनेकदा चौकशी करून झालेली आहे. इतक्या वेळा चौकशी झाल्यानंतर पुढचा टप्पा बहुतेकदा अटकेचा असतो. ती झाली की मोठा गदारोळ होणार आहे. ते लक्षात घेऊनच मीनाक्षी शिंदे यांनी राजीनामा दिला आहे. किंवा त्यांना द्यायला लावला गेला आहे. एकदम कारवाई न करता चारी बाजूंनी घेरायचे आणि शिंदे गटाची भरपूर बदनामी होईल असे पाहायचे हे यातले तंत्र दिसते. एकूण अशी एकमेकांची प्रकरणे बाहेर काढणे, निवडणुकीत एकमेकांचे उमेदवार पाडणे अशाच रीतीने हे राजकारण पुढची तीन वर्षे पुढे जाणार आहे.

विचार

कचऱ्याचा निचरा बनतेय मोठे आव्हान

शहरांना पूरमुक्त करण्याची सुरुवात मोठ्या प्रकल्पांपासून नव्हे, तर कचरा नाल्यात जाणार नाही, याची हमी देणाऱ्या एका साध्या तत्त्वापासून झाली पाहिजे. यामागील कारण म्हणजे कचरा व्यवस्थापन ही केवळ स्वच्छतेची जबाबदारी राहिलेली नाही, तर ती शहरांच्या सुरक्षिततेची, सार्वजनिक आरोग्याची आणि हवामानबदलाशी जुळवून घेण्याची अत्यावश्यक पायाभूत व्यवस्था बनली आहे. समाज याकडे गांभिर्याने लक्ष दईल का?



मिलिंद बेंडाळे

भारतीय शहरांमध्ये एक दृश्य पावसाळ्यामध्ये नेहमी पहायला मिळते. ते म्हणजे रस्त्यांवर साचलेले पाणी, तुंबलेली गटारे, वाहतुकीची कोंडी, घरांमध्ये शिरलेले पाणी आणि प्रशासनाची धावपळ. अतिवृष्टी झाली, की थेट हवामानबदलावर खापर फोडले जाते. हवामानबदलामुळे कमी वेळेत अधिक तीव्र पाऊस पडण्याच्या घटना वाढत आहेत, हे निर्विवाद; मात्र प्रत्येक वेळी केवळ पावसाला दोष देऊन प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. शहरांमध्ये पाणी साचण्यामागे एक तितकेच गंभीर आणि दुर्लक्षित कारण आहे, ते म्हणजे कचरा व्यवस्थापनाचा अभाव. शहरातील नाले, गटारे आणि पावसाच्या पाण्याचा निचरा करणाऱ्या वाहिन्यांमध्ये प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या, थर्माकोल, घरगुती कचरा आणि बांधकामाचा मलबा मोठ्या प्रमाणात अडकतो. परिणामी, पावसाचे पाणी वाहून जाण्याचा नैसर्गिक मार्गच बंद होतो. काही तासांचा मुसळधार पाऊस पुरेसा ठरतो आणि शहरातील रस्ते नाल्यांमध्ये रूपांतरित होतात. त्यामुळे शहरी पूर ही केवळ पावसाची समस्या नसून नियोजन, कचरा व्यवस्थापन आणि प्रशासनिक समन्वयाच्या अपयशाची संयुक्त परिणती आहे. देशात दररोज निर्माण होणाऱ्या शहरी घनकचऱ्याचे प्रमाण प्रचंड आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार भारतात दररोज सुमारे एक लाख ७० हजार ९०० टन शहरी घनकचरा निर्माण होतो. त्यापैकी केवळ ६१ टक्के कचऱ्यावर प्रक्रिया होते. सुमारे २२ टक्के कचरा लँडफिलमध्ये जातो, तर १७ टक्के कचऱ्याचा व्यवस्थित मागोवा उपलब्ध नाही. या 'मागोवा नसलेल्या' कचऱ्याचे काय होते, हा खरा प्रश्न आहे.

सर्वसाधारणपणे कचऱ्याचा मोठा हिस्सा रस्त्याच्या कडेला, मोकळ्या जागांमध्ये, नाल्यांच्या परिसरात किंवा जलस्रोतांमध्ये पोहोचतो. पावसाळ्यात हाच कचरा वाहून जाऊन नाल्यांमध्ये अडकतो. प्लास्टिक आणि विघटन न होणाऱ्या इतर वस्तू नाल्यांच्या अरुंद भागात जाळ्यासारख्या अडकतात आणि त्यावर माती, पाने, चिखल आणि इतर कचरा साचत जातो. परिणामी, नाल्याची पाणी वाहून नेण्याची क्षमता झपाट्याने कमी होते. हैदराबादमध्ये पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याच्या नाल्यामधून तब्बल १३ ट्रक कचरा काढावा लागल्याचे उदाहरण या समस्येची व्याप्ती दाखवते. म्हणजे नाले बांधले आहेत, त्यांची सफाई करण्यासाठी यंत्रणा आहे; पण कचरा पुन्हा पुन्हा त्याच नाल्यांमध्ये जात असेल तर या सर्व यंत्रणेचा उपयोग किती? आज हवामानबदलामुळे पावसाचे स्वरूप बदलत आहे. पूर्वी अनेक तास किंवा दिवसांमध्ये पडणारा पाऊस आता काही मिनिटे किंवा तासांमध्ये मोठ्या प्रमाणात पडतो. अशा परिस्थितीत जुन्या पावसाच्या सरासरीवर आधारित जलनिचरा व्यवस्था अपुरी पडणारच. शहरी जलनिचरा व्यवस्था अनेकदा ताशी १२ ते २० मिलिमीटर पावसाची तीव्रता हाताळण्याच्या क्षमतेवर आधारित असते. प्रत्यक्षात काही शहरांमध्ये त्यापेक्षा किती तरी अधिक तीव्रतेचा पाऊस पडत आहे. महाराष्ट्रातील ठाणे आणि गुजरातमधील नवसारीसारख्या शहरांमध्ये दोन वर्षांच्या पुनरावृत्ती कालावधीच्या पावसाच्या घटनांमध्ये ताशी ५५ ते ६० मिलिमीटरपर्यंत पावसाची तीव्रता नोंदली गेली आहे. ज्या नाल्यांची क्षमता आधीच मर्यादित आहे, त्यात कचरा भरला तर ते अतिवृष्टीचा सामना कसा करणार हा प्रश्न उरतोच.

या पार्श्वभूमीवर शहरी पूर रोखण्याची रणनीती 'अधिक मोठे नाले' या एका उपायाभोवती न फिरता 'पाऊस + कचरा + जलनिचरा + शहर नियोजन' या सर्व घटकांचा एकत्रित विचार करणारी असली पाहिजे. दर वर्षी पावसाळा जवळ आला, की नालेसफाईची मोहीम सुरू होते. काही दिवस मोठ्या प्रमाणात गाळ आणि कचरा काढला जातो. त्याची छायाचित्रे प्रसिद्ध होतात. अहवाल तयार होतात. त्यानंतर पुन्हा परिस्थिती पूर्वपदावर येते. नालेसफाई ही वार्षिक मोहीम न राहता सतत चालणारी व्यवस्थापन प्रक्रिया झाली पाहिजे. कोणत्या नाल्यात दर वर्षी जास्त कचरा साचतो, कोणत्या परिसरातून प्लास्टिक जास्त वाहून येते, कुठे अनधिकृत कचरा टाकला जातो आणि कोणत्या भागात पाणी साचण्याची शक्यता जास्त आहे, याची डिजिटल नोंद ठेवली पाहिजे. प्रत्येक प्रभागासाठी 'कचरा नकाशा' आणि 'पूरजोखीम नकाशा' तयार करता येऊ शकतो. या दोन्ही नकाशांचा एकत्रित वापर करून नालेसफाईचे वेळापत्रक ठरवल्यास मर्यादित मनुष्यबळ आणि निधीचा परिणामकारक वापर करता येईल. शहरांमध्ये घनकचरा व्यवस्थापन एका विभागाकडे, नाले दुसऱ्या विभागाकडे, पाणीपुरवठा तिसऱ्याकडे आणि मलनिसा:रण चौथ्या यंत्रणेकडे असते; मात्र पावसाचे पाणी या प्रशासकीय सीमांचा विचार करत नाही. कचरा नाल्यात गेला, तर जलनिचरा विभागाची समस्या बनतो. नाल्यात मिसळले, तर आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. रस्त्यावर कचरा पडला, तर स्वच्छता विभागाची जबाबदारी येते; पण प्रत्यक्षात या समस्या परस्परांशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्ये एकात्मिक शहरी जलव्यवस्थापन कक्ष उभारण्याची गरज आहे.

हवामानाचा अंदाज, पावसाचे प्रमाण, नाल्यांची क्षमता, कचऱ्याचे संकलन, सीवरेज व्यवस्था आणि पूरस्थिती यांचा एकत्रित डेटा या कक्षाकडे असावा. आपत्कालीन परिस्थितीमध्ये वेगवेगळ्या विभागांच्या बैठका घेण्यापेक्षा वर्षभर समन्वयाने काम करणारी व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. प्रशासनाला दोष देणे सोपे आहे; पण रस्त्यावर कचरा टाकणारा नागरिक, दुकानाबाहेर प्लास्टिक फेकणारा व्यापारी आणि बांधकामाचा राडारोडा नाल्याच्या कडेला टाकणारा कंत्राटदार यांचीही जबाबदारी आहे. नागरिकांनी कचरा योग्य पद्धतीने दिला नाही, तर जगातील कोणतीही महानगरपालिका शंभर टक्के स्वच्छता राखू शकत नाही. म्हणूनच दंडाची व्यवस्था कठोर करण्याबरोबरच तिची अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची आहे. 'कचरा टाकू नका' अशी घोषणा भिंतीवर लिहिण्यापेक्षा कचरा टाकणाऱ्यावर प्रत्यक्ष कारवाई झाली पाहिजे. व्यावसायिक आस्थापनांसाठी स्वतंत्र नियम, बांधकाम कचऱ्यासाठी स्वतंत्र संकलन व्यवस्था आणि प्लास्टिक कचऱ्यासाठी स्वतंत्र प्रणाली आवश्यक आहे. नागरिक सहभागाशिवाय शहरी पूर नियंत्रणाचे कोणतेही धोरण दीर्घकाळ यशस्वी होणार नाही. आपल्या शहरांच्या अनेक भागांमध्ये नाले हे कचरा टाकण्याची सोयीची ठिकाणे बनले आहेत. ही मानसिकता बदलण्याचे आव्हान प्रशासनापुढे आहे. यासाठी कचरा संकलनाची सुविधा वेळेवर आणि नियमित असणे आवश्यक आहे. घराघरातून कचरा नीट उचलला न गेल्यास नागरिक रस्त्यात किंवा नाल्यात टाकण्याची शक्यता वाढते. त्यामुळे स्रोतावर कचरा वर्गीकरण, नियमित संकलन, प्रक्रिया आणि पुनर्वापर या चारही बाबी प्रभावीपणे राबवाव्या लागतील.

केवळ कचरा उचलणे म्हणजे कचरा व्यवस्थापन नव्हे. कचऱ्याचा पुढील प्रवास कुठे होतो, याचीही जबाबदारी प्रशासनाने स्वीकारली पाहिजे. शहरी पूर रोखण्यासाठी प्रत्येक उपाय कोट्यवधी रुपयांचा असावा असे नाही. नाल्यांच्या प्रवेशद्वारांवर डेब्रिस ट्रॅप्स, स्क्रीन आणि ट्रॅश रॅकसारखी साधने बसवून मोठ्या प्रमाणातील घनकचरा नाल्यात जाण्यापासून रोखता येतो. केरळमधील अलाप्पुझा येथील 'कॅनालपी'सारख्या उपक्रमांमधून स्थानिक पातळीवर कचरा अडवण्याचे आणि विकेंद्रित कचरा व्यवस्थापनाचे प्रयोग झाले आहेत. अशा प्रयोगांचा अभ्यास करून महाराष्ट्रातील शहरांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार अंमलबजावणी करता येईल. प्लास्टिक कचरा हा नाल्यांसाठी सर्वात मोठा धोका ठरतो. त्यामुळे एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकवरील निर्बंधांची अंमलबजावणी कागदावर न राहता प्रत्यक्षात दिसली पाहिजे. कचरा व्यवस्थापन सुधारले तरी शहरी पूर पूर्णपणे थांबणार नाही. कारण अनेक शहरांमध्ये नैसर्गिक नाले, ओढे, तलाव आणि पाणथळ जागांवर अतिक्रमण झाले आहे. काँक्रीटीकरणामुळे जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे पावसाचे पाणी वेगाने वाहून जाते आणि विद्यमान निचरा व्यवस्था त्याला सामावून घेऊ शकत नाही. शहरांच्या विकास आराखड्यात जलस्रोत आणि नैसर्गिक निचरा मार्गांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. तलाव बुजवून, नाले अरुंद करून किंवा नैसर्गिक पाण्याचे मार्ग बंद करून उभारलेली बांधकामे भविष्यात शहरांसाठी मोठी आपत्ती ठरू शकतात.

चर्चा आजची

फटाक्यांची आतिषबाजी म्हणजेच दिवाळी का?

अंतरा पारंगे

दिवाळी सण काही दिवसांवर आला असून लोकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. दिवाळीत प्रत्येकाच्या घरी फराळ बनवला जातो, घराची सजावट केली जाते, एकमेकांना गिफ्ट्स दिले जातात. तसेच दिवाळी साजरी करण्याच्या सर्वात प्रसिद्ध पद्धतींपैकी एक म्हणजे फटाके फोडणे. बहुतेक लोक दिवाळीमध्ये मोठ्या प्रमाणात फटाके फोडून हा सण साजरा करतात. फटाक्यांमुळे मोठ्या प्रमाणात वायू आणि ध्वनी प्रदूषण होते, जे मानवांसोबतच प्राण्यांसाठीही हानिकारक आहे. फटाक्यांमुळे निर्माण होणारा कचराही विल्हेवाटीसाठी हानिकारक आहे, हेदेखील आपण लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यामुळे नागरिकांनी फटाक्यांशिवाय दिवाळी साजरी करून जागरूकतेची भूमिका बजावणे गरजेचे आहे.

देशभरात दिवाळीचा उत्साह दिसून येतो. महाराष्ट्रातही मोठ्या उत्साहात दिवाळी साजरी केली जाते. दिवाळीच्या तोंडावर दरवर्षी प्रशासनाकडून फटाके फोडण्यासंदर्भातील नियमावली जाहीर केली जाते. ज्यामध्ये आवाजाच्या मर्यादा, फटाके फोडण्यासाठीची क्षेत्र त्याचबरोबर वेळही नमूद केलेली असते. नियमांचे उल्लंघन करण्याऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देशही दिले जातात. मात्र ग्रामीण भागासह मोठमोठ्या शहरातही या नियमावलीला सर्रासपणे हरताळ फासला जात असल्याचे दरवर्षी दिसून येते.

पूर्वी दीपावली म्हटली की रांगोळी, नवीन कपडे, दिव्यांची रोषणाई, कंदिलांची सजावट, घरोघरी पसरणारा फराळाचा सुगंध अशा गोष्टी डोळ्यासमोर यायच्या. मात्र आता दिवाळी म्हटले तर सर्वात आधी आठवते ती फटाक्यांची आतषबाजी. भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणामागे काहीतरी शास्त्रीय कारण असते. दिवाळी हा मूळतः प्रकाशाचा सण आहे. पूर्वीच्या काळी लोक मातीचे दिवे लावून आणि अंधार कमी करून दिवाळी साजरी करत असत.



फटाके फोडण्याची परंपरा नंतर सुरू झाली. त्यामुळे दिवाळी साजरी करण्यासाठी फटाके फोडणं आवश्यक नाही. फटाक्यांशिवाय दिवाळी साजरी होऊ शकत नाही, असाच काहीसा ट्रेंड अलिकडे निर्माण झाला आहे. मात्र या फटाक्यांमुळे प्रदूषणाचा प्रश्न देखील तितकाच गंभीर होत चालला आहे. या फटाक्यांमुळे दिवसेंदिवस प्रदूषणामध्ये प्रचंड वाढ होते, दिवाळीत फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे प्रदूषणाचा स्तर हा नेहमीच्या होणाऱ्या प्रदूषणाच्या कित्येक पटीने वाढतो, असा निष्कर्ष देखील समोर आला आहे. प्रदूषणमुक्त दिवाळी, फटाकेमुक्त दिवाळी असं दरवर्षी बोललं जात असलं, तरी प्रत्यक्षात मात्र तसं होताना दिसत नाही. दरवर्षी मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी होते आणि तितकंच प्रदूषणही होतं. सामाजिक संघटना, सरकारकडूनही वारंवार प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करा, असे आवाहन केले जाते. मात्र दर दिवाळीमध्ये या आवाहनाला सर्रास केराची टोपली दाखवली जाते.

फटाके न फोडताही आपण दिवाळी अगदी उत्साहात साजरी करू शकतो. फटाके फोडल्याने केवळ ध्वनी प्रदूषणच होत नाही, तर हानिकारक रसायने आणि प्रदूषक हवेत सोडले जातात. यामुळे प्रत्येक वयोगटातील व्यक्तींना न्यूमोनिया, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी), दमा आणि ब्राँकायटिस यासारख्या श्वसनाच्या समस्या निर्माण होतात. दिवाळीच्या फटाक्यांमुळे पर्यावरणावरदेखील दुष्परिणाम होतो. या साऱ्या समस्या टाळण्यासाठी प्रदूषणमुक्त म्हणजेच फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणे गरजेचे आहे.

दिवाळी हा सण साऱ्यांचाच आहे. या सणाचा उत्साह श्रीमंतांपासून सामान्य कुटुंबांमधून दिसून येतो. त्यामुळे साहजिकच फटाके फोडण्याचा उत्साह सामान्य कुटुंबातील मुलांनादेखील असतो. मात्र आजच्या वाढत्या महागाईच्या काळात महागडे फटाके आपल्या मुलांना पुरविणे गरीब परिस्थिती असलेल्या पालकांना कठीणच जाते. आधीच फराळाचे साहित्य, रोषणाईसाठी, कपडे या गोष्टींसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च होतो. अशातच महागडे फटाके खरेदी करताना सामान्यांची तारांबळ उडते.

या घातक फटाक्यांमुळे तणाव, थकवा येणे, एकाग्रता भंग पावणे, मळमळ आदी दुष्परिणाम मानवी आरोग्यावर होतात. काही वर्षांत रंगीत फटाक्यांचे प्रमाण वाढले आहे. फटाक्यांमुळे हवेत जड धातू, नायट्रोजन डायऑक्साईड, सल्फरडाय ऑक्साईड तसेच तरंगत्या धूलीकणांचे प्रमाण वाढते. त्याचा श्वसनावर परिणाम होतो. दमेकऱ्यांचा विकार बळावतो. इतरांच्या फुप्फुसाच्या क्षमतेवर परिणाम होतो. तर फटाक्यांमुळे कायमचा अथवा काही काळ टिकणारा दृष्टिदोष निर्माण होऊ शकतो. आपल्या आणि आपल्या मुलांच्या स्वास्थ्यासाठी तरी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणे गरजेचे आहे.

दिवाळीतील फटाक्याच्या वाजवण्याने प्रदुषण होत असल्याने सर्वोच्च न्यायालयाने फटाक्यांवर सरसकट बंदी घातली नसली तरी प्रदूषण रोखण्यासाठी विद्यमान नियमांची कडक अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र या सर्व नियमांची अंमलबजावणी कितपत होईल हे दिवाळी सुरु झाल्यावरच कळेल.

लोकसंसद

शंभराव्या मराठी साहित्य संमेलनाला वादाचे ग्रहण

पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या प्रांगणात २८ ते ३१ जानेवारी २०२७ या दरम्यान भरविण्यात येणाऱ्या ऐतिहासिक शंभराव्या मराठी साहित्य संमेलनाला जेमतेम तीन महिन्याचा कालावधी उरला असताना आतापासूनच वादाचे ग्रहण लागले आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या (मसाप) १२० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच कार्यकारी मंडळाने प्रमुख पदाधिकाऱ्यांविरोधात अविश्वास ठराव दाखल केल्याने संमेलनाच्या आयोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शंभराव्या साहित्य संमेलनाच्या पूर्वतयारीसाठी राज्यभरात आयोजित करण्यात येणाऱ्या 'नांदी संमेलनांच्या' नियोजनात मसापने स्थानिक शाखांना आणि जिल्हा प्रतिनिधींना विश्वासात घेतले नसल्याचे कारण या अविश्वास ठरावामागे असल्याचे सांगण्यात येते. कारण काहीही असो, मात्र गेली काही वर्षे साहित्य संमेलनाच्या निमित्ताने येनकेन प्रकारेण अनेक वादांना तोंड फुटतेच. गेल्या ९९ वर्षांत न्या. महादेव गोविंद रानडे, ह. ना. आपटे, वि. दा. सावरकर, लक्ष्मणशास्त्री जोशी, वि.स.खांडेकर, कुसुमाग्रज, आचार्य अत्रे, पु.ल.देशपांडे, दुर्गा भागवत, मारुती चितमपल्ली अशा अनेक थोर आणि महान साहित्यिकांनी मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले असल्याने मराठी साहित्य संमेलन म्हणजे पावित्र्याने भारलेला साहित्याचा आणि सारस्वतांचा मेळावा आणि साहित्यिक व साहित्यप्रेमी रसिकांना वैचारिक खाद्य देणारी एक वार्षिक पर्वणी असते. अशावेळी अंतर्गत वादविवाद टळून ऐतिहासिक शंभरावे मराठी साहित्य संमेलन मराठी सारस्वतांच्या आणि साहित्यप्रेमी रसिकांच्या इतिहासातील एक सुवर्णक्षण ठरेल अशी अपेक्षा करूया!

-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

आज ३१ ऑक्टोबर, भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज १५१ वी जयंती. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. वकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना जातीदिनी विनम्र अभिवादन!

– श्याम ठाणेदार

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३१ ऑक्टोबर
१) श्रीम.विजया नारायण पाटील
अलिबाग दि.३१-१०-१९३५

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३०००/- असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते



अनिता अनिल मगर,
अलिबाग

मच्छिमारांच्या नशिबी उपेक्षाच



- जीवनाबंदर येथील जेट्टीचे काम पूर्णत्वाकडे
- ओहोटीच्यावेळी बोटी लावण्याची गैरसोय

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन येथील जीवनाबंदर या ठिकाणी असलेली जुनी जेट्टी ही ब्रिटिश कालीन होती. मच्छिमारी बोटी उभ्या करण्यासाठी असलेली जेट्टी ही अतिशय लहान असल्याने मच्छिमार बांधवांना पकडलेली मासळी आपल्या बोटीमधून उतरवण्यासाठी त्या ठिकाणी बो टी लावताना अनेक अडचणी निर्माण होत होत्या. यासाठी जीवनाबंदर विभागातील मच्छिमार बांधवांनी रायगडचे खासदार सुनील तटकरे यांना जेट्टी नवीन बनवावी, यासाठी आग्रह धरला होता.

२०२४ सालची निवडणूक झाल्यानंतर जीवनाबंदर जेट्टीसाठी प्रथम २०० कोटी रुपये मंजूर झाले होते. परंतु ते देखील कमी पडत होते, यासाठी अतिरिक्त ५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले. सद्यस्थितीत जेट्टीचे बांधकाम जवळजवळ पूर्णत्वाकडे गेले असून काही बारीकसारीक कामे बाकी आहेत. परंतु, आतापर्यंत २५० कोटी रुपये खर्च करून बांधलेल्या नवीन जेट्टीचा उपयोग देखील मच्छिमार बांधवांना करता येत नाही. जुनी असलेली ब्रिटिशकालीन जेट्टी पूर्णपणे वाळूने भरल्यामुळे त्या ठिकाणी भराव करून लेवल करण्यात येत आहे.

आर्थिक नुकसान

मागील चार महिन्यांपासून महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने या ठिकाणी जमलेली वाळू ड्रेझिंग करून काढण्यासाठी मशीनरी आणून ठेवली आहे. परंतु, चार महिन्यांपासून ही मशीनरी जीवनाबंदर जेट्टी या ठिकाणी नांगरून ठेवलेली आहे. या मशीनमधून कोणत्याही प्रकारचे काम केले जात नाही. पर्यायाने ओहोटीच्यावेळी मच्छीमार बांधवांना आपले सर्व व्यवहार बंद ठेवावे लागत असून प्रचंड आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे.

...अन्यथा संघर्षाची भूमिका घेणार

जुन्या असलेल्या जेट्टीवर लहानमोठ्या २०० बोटी चांगल्या पद्धतीने काम करत होत्या. मात्र नवीन जेट्टी झाल्यानंतर सुध्दा मच्छिमार बांधवांच्या पदरी उपेक्षाच आल्याचे पहायला मिळत आहे. तरी या ठिकाणी भरलेली वाळू महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने तातडीने काढण्यासाठी प्रक्रिया सुरू करावी. अन्यथा श्रीवर्धन जीवनाबंदर येथील मच्छिमार बांधवांना संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल, अशी माहिती मच्छिमार बांधवांनी दिली आहे.

तर श्रीवर्धन जीवनाबंदर येथील मच्छिमार बांधवांसाठी जवळजवळ ५०० मीटरची नवीन जेट्टी बांधून तयार आहे. मात्र प्रत्यक्षात जवळजवळ ४०
ते ५० मीटर जेट्टीचाच उपयोग मच्छिमार बांधवांना आपल्या बोटी उभ्या करण्यासाठी होत आहे. कारण नवीन बांधलेल्या जेट्टीचा परिसर देखील वाळूने पूर्णपणे भरून गेला आहे. आज केवळ ४० ते ५० मीटर एवढ्याच भागामध्ये मोठ्या बोटी उभ्या करता येतील एवढी जागा शिल्लक आहे.

साड्या, फराळाचे वाटप



रसायनी : समाजातील वंचित घटकांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण फुलविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे लेखक तथा सामाजिक कार्यकर्ते संदीप राक्षे यांचा सेवाभावी उपक्रम गेली १९ वर्षे अविरत सुरू आहे. सन २००७ पासून ते दुर्गम आदिवासी पाड्यांवर जाऊन दिवाळी साजरी करतात. यावर्षीही त्यांनी आदिवासी महिला भगिनींना नवीन साड्या आणि दिवाळी फराळाचे वाटप करून त्यांच्या आनंदात सहभाग घेतला.

या उपक्रमात उद्योजक प्रकाश चव्हाण आणि मारुती तायनाथ यांनीही सहकार्य केले. तोरणमाळ परिसरातील अनेक आदिवासी पाडे मुख्य रस्त्यापासून चार ते सात किलोमीटर अंतरावर आहेत. डोंगरदऱ्यांतील खडतर पायवाटा पार करून या वस्त्यांपर्यंत पोहोचावे लागते. प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगणाऱ्या या बांधवांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचविण्याचा संदीप राक्षे यांचा प्रयत्न त्यांच्या सामाजिक संवेदनशीलतेची साक्ष देतो. कधी मुलांना नवीन कपडे, कधी दिवाळीचा फराळ, तर कधी महिला भगिनींसाठी साड्या अशा स्वरूपात हा उपक्रम राबविला जातो. त्यांचा हा उपक्रम समाजातील इतरांनाही प्रेरणा देणारा आहे.

आदर्श शिक्षक समितीची कार्यकारिणी सभा



। कोलाड । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील पी.एम. श्री कोलाड येथे गुरुवारी (दि.२९) महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समिती रायगड जिल्ह्याची कार्यकारिणी सभा उत्साहात पार पडली. यावेळी जिल्हा संघटनेचे जिल्हाअध्यक्ष अजय कापसे यांनी संघटनेची ध्येय धोरणे, आजपर्यंत केलेली कामे, संघटना वाढीसाठी केलेले प्रयत्न, गुरू गौरव पुरस्कार, जिल्हा शिक्षण समिती सदस्य पुन्हा एकदा आपल्या संघटनेला मिळाले याबद्दल आनंद व्यक्त केला. भविष्यात कुठलेही प्रलंबित प्रश्न राहणार नाही, याबाबत संघटना स्तरावरती कसोशीने प्रयत्न करण्यात येतील, याबाबत मार्गदर्शन केले.

प्रसाद म्हात्रे राज्याध्यक्ष यांनी जिल्हा अंतर्गत बदल्या, टीईटी परीक्षा रद्द होणे, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख प्रमोशन होणे, विषय शिक्षक फरक बिल, सेवापुस्तके, विविध आंदोलने याबाबत सखोल मार्गदर्शन केले. तर भालचंद्र पाटील कार्याध्यक्ष यांनी २००५ पूर्वी लागलेले शिक्षक, वरिष्ठ वेतन श्रेनी, याबाबत मार्गदर्शन केले. संतोष यादव जिल्हा शिक्षण समिती सदस्य यांनी आयकर, एफडीए, वरीष्ठ वेतन श्रेनी याबाबत मार्गदर्शन केले. संघटनेचा वर्षभरातील जमा खर्च आढावा सरचिटणीस सुरेंद्र मनवे यांनी सादर केला. त्यावर चर्चा होऊन मंजुरी देण्यात आली. तर संघटनेच्या वतीने यावर्षी २९ नोव्हेंबर रोजी पनवेल येथे गुरुगौरव पुरस्कार वितरण कार्यक्रम घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सानिका पांगारेची गगनभरारी

। पाली । प्रतिनिधी ।



सुधागड तालुक्यातील शिलोशी गावची सुकन्या सानिका अश्विनी सुहास पांगारे हिने यशाचे नवे शिखर सर केले आहे. स्वदेस फाउंडेशनच्या एक्सलन्स स्कॉलरशिपच्या आर्थिक सहकार्यामुळे तिचे एअरक्राफ्ट मेंटेनन्स इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण झाले. आता तिला थेट एअर इंडियामध्ये ज्युनियर सर्व्हिस इंजिनिअर म्हणून महत्त्वाची संधी मिळाली आहे. सानिकाच्या या प्रेरणादायी प्रवासात स्वदेस फाउंडेशनचे शैक्षणिक सहकार्य, शिलोशी ग्रामविकास समितीचे मार्गदर्शन, कुटुंबीयांचे प्रोत्साहन, स्वतःचे अथक परिश्रम व जिद्द या घटकांचा मोलाचा वाटा आहे.

विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप



। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा नवघर सुधागड येथे रोटरी क्लब ऑफ पनवेल सिम्फनी यांच्या वतीने किशोरवयीन मुलींना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत मुलींच्या मासिक पाळीच्या काळातील स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

किशोरवयीन मुलींनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे, वैयक्तिक स्वच्छता राखणे आणि मासिक पाळीविषयी कोणताही संकोच न बाळगता योग्य माहिती जाणून घेणे आवश्यक असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ पनवेल सिम्फनीचे अध्यक्ष रोटेरियन राममोहन शिंदे, सचिव रोटेरियन गणेश देवळे, क्लब सल्लागार रोटेरियन शिवाजीराव पाटील, प्रशासकीय संचालिका रोटेरियन मीनल धुमाळ आणि ॲन रुपाली लाड उपस्थित होते. तसेच पेडली केंद्राचे केंद्रप्रमुख अनिल राणे, शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता बैकर व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थिनींच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे शाळेच्या वतीने स्वागत व आभार व्यक्त करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल.

कचरा टाकताच स्वच्छतेचा संदेश



मुंबई : मोठ्या प्रमाणात कचरा साचण्याच्या संभाव्य ठिकाणांचे निर्मूलन करण्यासाठी मुंबई महापालिकेने हायटेक पाऊल उचलेले आहे. गार्बेज वल्नरेबल पॉइंट्सवर कचरा टाकणाऱ्यांना आता एआय आधारित कॅमेऱ्यांच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश दिला जात आहे. महापालिकेच्या 'जी उत्तर' प्रशासकीय विभागाकडून माहीम येथील गजानन वाटिका परिसरात असलेल्या मोठ्या प्रमाणात कचरा साचण्याच्या संभाव्य ठिकाणी एआय कॅमेरा बसवण्यात आला आहे. या कॅमेऱ्यासोबत ध्वनिक्षेपक जोडण्यात आले आहेत. कचरा टाकण्यासाठी येथे येणाऱ्या व्यक्तीची हालचाल कॅमेऱ्यात टिपली जाते. त्यानंतर तत्काळ ध्वनिक्षेपकाद्वारे परिसर स्वच्छ ठेवण्याचे तसेच उघड्यावर कचरा न टाकण्याच्या आवाहनाची उद्घोषणा होते. या प्रयोगामुळे कचरा टाकणारी व्यक्ती परावृत्त होऊन त्या संबंधित ठिकाणी कचरा टाकणार नाही आणि त्यामुळे परिसरात अस्वच्छता होणार नाही.

सानपाड्याच्या राजाला उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रमाचा पुरस्कार

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

नवी मुंबई महानगरपालिका महापौर चषक गणेशोत्सव स्पर्धा २०२६-२७ मध्ये सानपाड्याचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रम पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत, समाजप्रबोधनाचा संदेश देणारा सुंदर व प्रेरणादायी देखावा सादर केल्याबद्दल मंडळाला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या गौरवशाली सोहळ्यात नवी मुंबईचे लोकनेते आणि महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री मा. गणेश नाईक यांच्या हस्ते मंडळाला सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक आणि २२ हजार रुपये रोख पारितोषिक, प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार म्हणजे केवळ सन्मान नसून, सानपाड्याच्या राजावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक गणेशभक्ताच्या मेहनतीचा, एकजुटीचा, सेवाभावाचा आणि सामाजिक बांधिलकीचा गौरव आहे.

कामोठ्यात रस्त्यांच्या दुरूस्तीला सुरुवात

नवीन रस्त्यांची प्रतीक्षा कायम



। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

पावसाळ्यात कामोठे परिसरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात निर्माण झालेले हे खड्डे गणेशोत्सवाच्या काळातही बुजविण्यात आले नाहीत. त्यामुळे श्री गणरायाचे आगमन आणि विसर्जन याच खड्डेमय रस्त्यांवरून करावे लागले. त्यानंतर नवरात्रोत्सवात देवीच्या आगमन आणि विसर्जन मिरवणुकांनाही याच खड्ड्यांचा सामना करावा लागला.

सण-उत्सव संपल्यानंतर तरी रस्त्यांची दुरुस्ती होऊन नवीन रस्ते तयार होतील, अशी अपेक्षा कामोठेकरांना होती. मात्र, नवीन रस्ते करण्याऐवजी सध्या परिसरात खड्डे बुजविण्यासाठी पॅचवर्कचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

पावसाळ्यात पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत असून दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. अशा परिस्थितीत केवळ खड्डे बुजविण्याचे काम करून रस्त्यांचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पॅचवर्क केल्यानंतर पुन्हा पाऊस किंवा अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे रस्ते उखडले जाणार नाहीत का? केलेले काम किती दिवस टिकणार? नवीन रस्ते तयार करण्याचा निर्णय कधी होणार? असे अनेक प्रश्न कामोठेकरांकडून उपस्थित केले जात आहेत. तात्पुरत्या मलमपट्टीऐवजी दर्जेदार आणि टिकाऊ रस्ते तयार करावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

वायरलेस संपर्क यंत्रणेची सुविधा उपलब्ध | **दाट लोकवस्तीमधील आग विझविणे होणार सुलभ**

पनवेलच्या अग्निशमन दलात 'फायर बाईक' दाखल

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

पनवेल शहरातील अरुंद गल्ल्या, दाट लोकवस्ती आणि गर्दीच्या बाजारपेठांमध्ये आग लागल्यास अग्निशमन दलाची मोठी वाहने घटनास्थळी पोहोचण्यात अडचणी निर्माण होतात. ही बाब लक्षात घेऊन पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलात आता 'फायर बाईक' दाखल करण्यात आली आहे. या आधुनिक दुचाकीमुळे आगीच्या घटनांमध्ये तातडीने घटनास्थळी पोहोचून प्राथमिक स्तरावर आग नियंत्रणात आणणे शक्य होणार आहे.



महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाच्या पुढाकारातून ही महत्त्वपूर्ण यंत्रणा उपलब्ध झाली आहे. विशेषतः अरुंद रस्ते, बाजारपेठा आणि दाट लोकवस्तीच्या परिसरात ही फायर बाइक उपयुक्त ठरणार आहे. मोठ्या अग्निशमन वाहनांना घटनास्थळी पोहोचण्यास विलंब होत असताना ही दुचाकी कमी वेळेत घटनास्थळी पोहोचून आग विझविण्याच्या प्राथमिक उपाययोजना करू शकणार आहे.

या फायर बाईकवर १२ ते १२ लिटर क्षमतेची पाण्याची टाकी असून, त्याला उच्च दाबाचा पंप जोडण्यात आला आहे. याशिवाय छोट्या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशमन यंत्र, सायरन, फ्लॅशर लाईट्स आणि वायरलेस संपर्क यंत्रणेची सुविधाही उपलब्ध आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन कर्मचाऱ्यांना तातडीने घटनास्थळी पोहोचणे शक्य होणार आहे.

मोठ्या अग्निशमन वाहनांना सहज पोहोचता येत नाही, अशा ठिकाणी या बाइकचा प्रभावी वापर करता येणार आहे. विशेषतः अरुंद गल्ल्या, बाजारपेठा आणि दाट लोकवस्तीच्या भागांमध्ये आगीचा फैलाव रोखण्यासाठी ही यंत्रणा महत्त्वाची ठरणार आहे.

> **"तातडीने आग आटोक्यात आणण्यासाठी रॉयल एनफिल्ड बुलेटवर आधारित रचना दमदार आणि विश्वासार्ह सायरन, फायर एक्स्टिंग्विशर लाऊडस्पीकरसह सज्ज आहे. याचा उपयोग आपत्कालीन परिस्थिती मध्ये होणार आहे. – मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापालिका"**

निवडक



विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप

कोलाड : खांब येथील ज्ञानांकुर इंग्लिश मिडीयम स्कूल येथील १५ विद्यार्थ्यांना बुधवारी (दि.२८) सायकल व दोन जम्बो छत्र्याचे वाटप करण्यात आले. कोलाड लायन्स क्लब, एमजेएफ लायन्स मिलिंद पाटील व शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक वर्ग यांच्या सहकार्यातून हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. शिक्षणासाठी दूर कोसावरून पायपीट करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी त्यांच्या वेळ व श्रम वाचावेत जेणेकरून या विद्यार्थ्यांना अभ्यासाकडे लक्ष केंद्रीत करता यावे, हा यामागचा उद्देश आहे. कोलाड लायन्स क्लब ही सेवा भावी संस्था गेली सहा वर्ष कोलाड परिसर आणि ग्रामीण भागात सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरणसह विविध क्षेत्रात उपक्रम राबवत आहे. लायन मिलिंद पाटील यांच्या या विशेष सहकार्याबद्दल आणि लायन्स क्लब कोलाडच्या या उपक्रमाबद्दल खांब परिसरामध्ये त्यांचे भरभरून कौतुक होत आहे.



'आठवणींच्या चिंचा गाभूळ' पुस्तकाचे प्रकाशन

अलिबाग : ज्ञानसाधना महाविद्यालयाचे माजी भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा.गजानन देवधर यांच्या 'आठवणींच्या चिंचा गाभूळ' या पुस्तकाचे प्रकाशन डोंबिवली येथे रविवारी (दि.२५) ज्येष्ठ साहित्यिक, कवी प्रा.प्रवीण दवणे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अमित दांडेकर व विदुला फडणीस या गायकांनी आठवणींच्या वाटेवर ही संकल्पना घेऊन मनात दीर्घ रेंगाळणारी अवीट गोडीची गीते सादर केली. मान्यवरांचे स्वागत उज्वला देवधर यांनी केले. तर लेखक प्रा.गजानन देवधर यांनी या ललितलेख संग्रहाची संकल्पना विशद करून, मनोगत व्यक्त केले. आठवणींच्या चिंचा गाभूळ हे पुस्तक प्रकाशित करताना विशेष आनंद झाल्याचेओशनवेव्हचे प्रकाशक पराग पोतदार म्हणाले. देवधर यांच्या एक सुंदर पुस्तक प्रकाशित करण्याचे भाग्य मला मिळाले. तर प्रा.प्रवीण दवणे म्हणाले की, 'आठवणींच्या चिंचा गाभूळ' हे पुस्तक समर्पक, ओघवत्या भाषाशैलीत आणि पुस्तकातील आशयाचे मर्म उलगडून सांगणारे आहे. केवळ घटनांचा पट यात नसून अनुभव व त्यातील भावोत्कटता यामध्ये आहे.



विविध उपक्रमांनी जयंती साजरी

नेरळ : जीवनविद्या मिशनच्या माध्यमातून समाज सुधारणेचे कार्य करणारे सद्गुरू वामनराव पै यांची १०४वी जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. जीवनविद्या मिशनचे (ग्रामसमृद्धी अभियान) आणि वाईब आऊट्रीच संस्था यांच्या संयुक्त माध्यमातून सद्गुरू वामनराव पै यांच्या जयंतीनिमित्त वैजनाथ येथे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. जीवनविद्या ज्ञानपीठ कर्जत येथील वैजनाथ गावमधील वैजनाथ मंदिर येथे आरोग्य शिबिराचे उद्घाटन स्थानिक ग्रामस्थांच्या हस्ते झाले. या शिबिरात ॲडव्हान्स मशीनद्वारे रोग तपासणी करण्यात आली. या शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्य आजार तपासणी यामध्ये नेत्ररोग, अस्थिरोग, स्त्रीरोग, मधुमेह, बालरोग, वृद्ध काळजी आरोग्य, हृदयरोग, शुगर, कान-नाक-घसा, पोट विकार, श्वसनविकार व क्षयरोग, दंतरोग इत्यादी आजारांची तज्ञ डॉक्टरांच्या निरीक्षणात तपासणी आणि औषधोपचार करण्यात आले. शिबिरात वैजनाथ गाव, भिवपुरी गाव, कराळेवाडी, गौळवाडी येथील ३५० रुग्णांची तपासणी करण्यात आली.



पतसंस्थेतर्फे सभासदांना भेटवस्तू

माणगाव : माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. उतेखोल, माणगाव या नामांकित पतसंस्थेच्या सभासदांना प्रत्येकी दोन किलो साखरेच्या रूपाने भेटवस्तू वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचा शुभारंभ गुरुवारी (दि.२९) सकाळी ११:३० वाजता संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स, निजामपूर रोड, माणगाव येथे चेअरमन आनंद यादव, जेष्ठ संचालक दिलीप जाधव, संचालक संदीप खरंगटे, संचालिका दिप्ती मोरे, पतसंस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संस्थेचे सभासद, कर्मचारीवर्ग, ठेवीदार, खातेदार, हितचिंतक, स्वल्पबचत प्रतिनिधी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संस्थेने आपल्या प्रगतीचे आणखी एक यशस्वी पाऊल टाकताना संस्थेची इंदापूर शाखा सुरु केली असून इंदापूर शाखा ही नावारूपास येत आहे. या पतसंस्थेतर्फे रौप्य महोत्सवी वर्षांपासून आपल्या संस्थेतील सभासदांची दरवर्षी दिवाळी गोड व्हावी, हा उद्देश नजरेसमोर ठेऊन भेटवस्तू देण्याचा मानस केला आहे. यावर्षीही या संस्थेच्या सभासदांची दिवाळी गोड होणार असून दीपावलीनिमित्त सभासदांना भेटवस्तू देण्यात येणार आहे. संस्थेच्या सभासदांनी पतसंस्थेच्या या कार्यालयात मंगळवार दि.३ नोव्हेंबरपर्यंत येऊन संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स,निजामपूर रोड,माणगाव येथे आपली भेटवस्तू स्वीकारावी, असे आवाहन संस्थेकडून करण्यात आले आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) सिमाब सिकंदर मस्ते २) तजीन रईस डोंगरे ३) अरशद सिकंदर मस्ते यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ (हे. आर.)	आकार (रू. पै.)
१३२	३/ब	०-७४-३० पैकी ०-४०-००	३=९४

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, ॲटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/१०/२०२६

ॲड. महेश मोतीराम घारे
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

जाहीर नोटीस

अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात

उल्लेख पांडुरंग नाखवा ... अपिलार्थी
विरुद्ध
छोटुराम बस्तीराम शर्मा .... उत्तरार्थी

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसीत वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अपिलार्थी यांनी या न्यायालयात आरटीएस अपिल क्र. ३७/२०२५ दाखल केले आहे.

गावाचे नांव	ग.क्र.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
मौजे घोटवडे, ता.अलिबाग	६४/१	०-२८-३० पो.ख. ०-०९-९० एकूण ०-३८-२०	४.०६
	६४/२	०-३५-२०	४.४५

सदर अपिलाच्या सुनावणीच्या नोटीसा अपिलार्थी व उत्तरार्थी यांना देण्यात आल्या असता, खाली नमूद केलेल्या उत्तरार्थींना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अपिलार्थी यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

उत्तरार्थींचे नाव :
१. कै. छोटुराम बस्तीराम शर्मा मयत तर्फे वारस
१/१. श्री. नारायण छोटुराम शर्मा
१/२.श्री.लक्ष्मण छोटुराम शर्मा
१/३. श्री. घनश्याम छोटुराम शर्मा
१/४. श्री. रमेश छोटुराम शर्मा
१/५. श्रीम. संगिता छोटुराम शर्मा
क्र.१/१ ते १/५ रा.मारुती आळी, मु.पो.रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड
२. मा. व्यवस्थापक
अलिबाग को.ऑप.अर्बन बँक लि., चौल शाखा, ता.अलिबाग, जि.रायगड
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी अलिबाग
को.ऑप.अर्बन बँक लि., अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
४. मा. विभागीय सह निबंधक
सहकारी संस्था, कोंकण विभाग, कोंकण भवन, बेलापूर, नवी मुंबई

सदर अपिलाची पुढील सुनावणीची तारीख दि. ०२/११/२०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे. वरील उत्तरार्थी यांनी सुनावणीकामी स्वतः किंवा प्रतिनिधी यांच्यामार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे. सुनावणी कामी आपण स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्रांच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
(मुकेश चव्हाण)
उपविभागीय अधिकारी अलिबाग
उपविभाग अलिबाग

अर्जदारांचे वकील ॲड. महेश एस.म्हात्रे

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे. प्रथम वर्ग मॅजिस्ट्रेट सो.यांचे न्यायालयात

फौजदारी चौकशी अर्ज.३४७/२०२६

श्री. दिलीप परशुराम नाईक अर्जदार
विरूद्ध
ग्रुप ग्रामपंचायत चौल, सामनेवाला

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार यांचे वडिल-कै.परशुराम जगन्नाथ नाईक यांचा मौजे चौल सागमळा, ता.अलिबाग येथे तारीख ०५/०९/१९७८ रोजी मृत्यू झालेला आहे. परंतु यांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत, चौल यांच्या कार्यालयीन दप्तरी सन १९७८ साली नोंदविण्याचे अनावधानाने व नजरचुकीने राहून गेलेले आहे. म्हणुन त्यांनी मे. मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयांत तशी नोंद होण्याचे आदेश मिळण्याकरिता अर्ज केलेला आहे.

सबब, अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि. ०२/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही, तर मे. कोर्ट कायद्याने मृत्युनोंद दाखला देणेकामी संबंधीत ग्रामपंचायत चौल कार्यालयास आदेश दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दि २९/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

सही /- सही/-
कनिष्ठ लिपीक **अधिक्षक**
मुख्य न्यायदंडाधिकारी **मुख्य न्यायदंडाधिकारी**
अलिबाग- रायगड. **अलिबाग-रायगड.**

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-अवसरे ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

मालकांचे नांव	स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे.आर.पा.	आकार रू.पै.
१) राकेश पेट्रीक कोयलो २) अजय कुमार भसीन	४	३४/अ	०-१८-० पो.ख. ०-०४-०	०.१४
	४	३४/ब	०-१२-० पो.ख. ०-०२-०	०.०६
	४	३५	०-०२-०	०.०२

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून एकवीस (२१) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील शेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन:- मौजे :- चिंध्रण, ता:- पनवेल, जि:-रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

:- मिळकतीचे वर्णन:-
मौजे:- चिंध्रण, ता:- पनवेल, जि:- रायगड

सर्व्हे नं	शेतकऱ्यांचे नांव	एकुण क्षेत्र हे.आर.	आकार रू.पैसे
१/२	श्री.दिलीप धर्मा फुलोरे श्री.सुनिल कुशाबापु गोरे	०.१८.८०	३.८१

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विघमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यारपत्र, विकसित करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण:- पनवेल
दिनांक :- ३१/१०/२०२६

ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता : शॉप नं. ९०५-९०८, शेल्टॉन क्युँबीक्स, प्लॉट नं-८७, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई. ४००६१४.

जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली जमीन मिळकत माझे अशिल, सदरील संबंधित मिळकतीचे मालक श्री.मनमोहन धुवालेवाला, रा.शॉप नं.१, महातरंग सी.एच.एस.लि., सेक्टर नं.५, बी.एस.सी.कॉलनी, आनंद नगर, ओशिवारा, जोगेश्वरी (वेस्ट), मुंबई ४००१०२ याच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याकरीता माझे अशिल व संबंधित मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या दरम्यान विक्रीबाबतची बोलणी चालू आहे. सदर खालील नमूद मिळकतीमध्ये कुणाचेही खरेदीखत, साठेकरार, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही करारद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार व हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहीत मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संबंधित मिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे
मौजे वडवली, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत

मौजे	गट क्र.व उपविभाग	भुधारणा पद्धती	क्षेत्र हे.आर	आकार रू.पै.
वडवली, ता.अलिबाग जि.रायगड	14	भोगवटादार वर्ग-1	1-13-70 पो.ख.0-07-50 एकूण 1-21-20	23-90

वरील नमूद मिळकतीमध्ये असलेली तीन घरे ग्रुपग्रामपंचायत ताडवागळे, मौजे वडवली या हद्दीतील १.तळमजल्यावरील घर क्र.146(अ), क्षेत्र 35X47 चौ.फूट, २.वरचा मजला वरील घर क्र.147 (ब), क्षेत्र 35X35 चौ.फूट, व ३.एकपाकी पत्रा पंप केबीन वरील घर क्र.147, क्षेत्र 8X7 चौ.फूट या तीन मिळकतीबाबत.

अलिबाग
दि.३०/१०/२०२६

सही/-
ॲड.दिपक स.बलकवडे,
रा.घर.क्र.१८८९, पाटीलवाडी, चेंढरे,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९७६५६२८०२५

जाहिर नोटीस

तमाम जनतेस, या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की माझे अशिल श्री. गणेश विष्णु पाटील व सौ. विणा गणेश पाटील यांनी सौ. अभिषा अशोक नाईक यांचेकडून नोंदणीकृत करारनाम्याद्वारे दिनांक १२/०७/२०१२ रोजी खालील नमूद दुकान गाळा क्र. १२, खरेदी केला असून, सदर करारनामा हा दस्त क्र. २६१५/२०१२ अन्वये नोंदणीकृत झाला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे अलिबाग, येथील सि. स. न. ९२१ अे, ९२१ के, ९२१ बी, या जमिन मिळकतीवर स्थित असलेल्या ''वैद्यबाग सहकारी गृहनिर्माण संस्था कामत लेन अलिबाग'' या इमारतीमधील तळ मजल्यावरील दुकान गाळा क्रमांक १२, क्षेत्र १०६.५० चौ. फु.

सदर मिळकती संदर्भातील खालील नमूद जुने दस्त माझे अशिल, यांचेकडून सहाण ते अलिबाग दुचाकी प्रवासादरम्यान दिनांक ०७/०९/२०२६ रोजी गहाळ झालेले आहेत. गहाळ झालेल्या नोंदणीकृत दस्तऐवजाचा तपशिल खालीलप्रमाणे

मे. सिद्धार्थ असोसिएट्स तर्फे पार्टनर श्री. अजित पुरुषोत्तम शाह व श्री. गौतम छन्नालाल लेकवा आणि सौ. सुधा उल्हास दिवेकर, यांमधे झालेले नोंदणीकृत खरेदीखत दस्त २०९१/२०००, दिनांक १३/१२/२००२.

सदर गहाळ झालेल्या नोंदणीकृत दस्ताबाबत माझे अशिल यांनी अलिबाग पोलिस ठाणे येथे ''अलिबाग पोलिस ठाणे गहाळ वस्तु नोंद वही क्रमांक ०८४८/२०२६'' दिनांक ०१/१०/२०२६, अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तरी, सदर वर नमुद वर्णन केलेला दस्त कोणास आढळून आल्यास वा सदर दस्ताचे सहाय्याने वित्तिय संस्थाकडून काही कर्ज घेतलेले असल्यास त्याची माहिती खाली सही करणार यांस १४ दिवसांचे मुदतीत कळवावी हि नम्र विनंती.

अलिबाग
दिनांक : ०५/१०/२०२६

ॲड. महेश सुहास म्हात्रे
रितुराज प्लाजा, शिवाजी चौक,
अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड
मो. ९८५००४२२३४

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विद्यमान मिळकत मालकांकडून जाणे-येणेच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेण्याची बोलणी केली आहे.

मिळकतीचे वर्णन :-
मौजे आंबेपूर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील जिरायत मिळकत.

भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र आर.हे.आर	आकार रु.पै.	मिळकत मालकांची नावे
११३	०-७५-०० पो.ख. ०-१०-०० ०-८५-००	१५-१९	राजाराम मुरलीधर जोशी

वरील मिळकती पैकी राजाराम मुरलीधर जोशी यांच्या हिश्श्याचे ०-२२-५० हे. आर जिरायत क्षेत्र या जाहिर नोटीशीचा विषय आहे.

वरील वर्णन केलेली मिळकत, खुद्द मालकीची असून निर्वेध व बोजाविरहीत असलेबाबत मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, मालकी, दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, बक्षीस, बोजा, जाणे-येणेचा मार्ग वगैरे असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपली हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही व तो असल्यास आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला आहे असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

कळावे,

अलिबाग
दिनांक ३०/१०/२०२६

सही /-
ॲड.रश्मी शिंदे
सरिता सदन, जे.एस.एम कॉलेज रोड,
ता.अलिबाग जि.रायगड
मोबाईल नं. ८३८०८०८००२

पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.१३/३७५/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २९/१०/२०२६

पनवेल महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना

प्रति,
श्री./श्रीमती.--------------------
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.

महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा क्र.१३, मंगळवार दिनांक ०३/११/२०२६ रोजी, सकाळी ११:०० वाजता, महापालिकेच्या ''आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल'' येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

विशेष सर्वसाधारण सभा क्रमांक १३, दिनांक ०३/११/२०२६ ची विषयपत्रिका

१. मा.आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :
१. पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको प्राधिकरणामार्फत हस्तांतरीत आरक्षित शाळेकरीता खेळाचे मैदान लगतच्या शाळांना भाडेतत्वावर देणेबाबत.
२. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अनाथ व निराधार किंवा दोन्ही पालक गमावलेले गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी ''अनाथ बाल शिक्षण शिष्यवृत्ती योजना'' सुरु करण्याबाबत. ३.पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-क, प्रभाग क्र.१४ मधील पनवेल रेक्लमेशन मैदानातील कब्रस्थान भोवती भिंत उभारणे.
४. पनवेल तालुक्यातील गव्हाण व वडघर हे जिल्हा परिषद गट पनवेल महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करणेबाबत.
५. पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती अ, ब, क व ड अंतर्गत रस्ते दुरुस्ती व इतर विकासकामांमध्ये वापरण्यात आलेल्या डांबर (Bitumen) दरवाढीपोटी संबंधित कंत्राटदारांना वाढीव दराचा फरक अदा करण्यास धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

(मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)

सही/-
नानासाहेब कामठे
महापालिका सचिव
पनवेल महानगरपालिका

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- २९/१०/२०२६.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

मौजे-मांडवणे, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ	आकार रू.पै.
नंदकिशोर लक्ष्मीनारायण कागलीवाल मे.आकाश एंटरप्रायझेस डायरेक्टर	२१	४	२-८४-०० पो.ख ०-४०-०० एकुण ३-२४-०० पैकी ०-४०-००	२-६२

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ३०/१०/२०२६

अधिवक्ता
शैलेश दत्तात्रेय पवार
पत्ता.घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड,
मो.९५९५२११८६७

जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत व त्यावरील बंगलो मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बिनशेती व बंगलो मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

मौजे कळंब, ता. कर्जत, जि.रायगड.

मालकाचे नाव	स. नं./हि. नं.	एकुण क्षेत्र चौ.मी.	आकार रू.पैसे.
श्री.सारंग रामसिंह पवार श्रीम.सुमित्रा रामसिंह पवार	१८९/७	२९४	२९.४०
	त्यावरील बांधलेला आर.सी.सी. बंगलो, क्षेत्र ८३० चौ.फुट बिल्टअप		

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ३०/१०/२०२६

ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

सावधान नोटीस

१.मौजे सोगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील परिशिष्ट-१ मध्ये वर्णन केलेल्या भुमापन क्रमांक १५८ या मिळकतीबाबत आमचे अशिल श्री. प्रदिप जयंत म्हात्रे यांनी दिलेल्या माहितीवरून जाहीर नोटीस देणेत येते की,
२.सदरहू गट क्रमांक १५८, ही जमीन मिळकत आमचे अशिल यांचे आजोबा व श्री. सुनिल पांडूरंग नाईक यांचे वडील कै. श्री. पांडूरंग बाळकृष्ण नाईक यांचे वडीलोपार्जीत मालकीच्या व सामाईक ताबेकब्जा वहीवाटीची आहे.
श्री. सुनिल पांडूरंग नाईक यांनी महसुल अधिकाऱ्यांची दिशाभुल करून सदर मिळकतीस त्यांचे एकट्याचे नावाची नोंद करून घेतलेली आहे. परंतु सदर मिळकत ३. श्री. सुनिल पांडूरंग नाईक यांचे एकट्याचे मालकीची नसून त्यामध्ये आमचे अशिल श्री.प्रदिप जयंत म्हात्रे यांचा व इतर वारसदारांचा सुद्धा कायदेशीर हक्क व हितसंबंध आहे. सदर मिळकती संदर्भात हक्क प्रस्थापने करीता आमचे अशिलांनी न्यायालयीन कारवाई सुरू केलेली आहे.
४.अशी वस्तुस्थिती असताना श्री.सुनिल पांडूरंग नाईक हे सदर मिळकत अन्य त्रयस्थ व्यक्तींना विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याची खात्रीलायक माहिती आमचे अशिलांना प्राप्त झालेली आहे. सदर मिळकतींमधे आमचे अशिलांचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. त्यामुळे आमचे अशिलांची प्रस्तावित विक्री व्यवहाराला सक्त हरकत आहे.
५.तरी परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये. त्यास आमचे अशिलांची कडक हरकत आहे. याउप्परही आमचे अशिलांची हरकत डावलून बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करून जर कोणी वर नमुद केलेल्या मिळकतीसंदर्भात विक्री अथवा तत्सम प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्याबाबत अलहिदा संबंधितांवर दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कायदेशीर कोर्ट कारवाई करण्यात येईल, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

परिशिष्ट - १

मौजे	गट क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार
सोगाव	१५८	०-२२-१०	४.५६

ठिकाण:- अलिबाग
दिनांक :- ३१/१०/२०२६

सही /-
ॲड.कौस्तुभ उदय पवार

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे : रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन १ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (२ जागा), इंडियन चायनीज कुक १ जागा, मोरी - १ जागा, वेटर - १ जागा. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२

● नोकरीची सुवर्णसंधी! - अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!, ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक, आकर्षक पगार, नोकरीचे ठिकाण: अलिबाग, रायगड मुलाखतीसाठी आजच संपर्क साधा! ९९२३७५०५३९/९१०५७१७०३८ इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा! चांगल्या पगारासह नोकरीची उत्तम संधी!

● कामासाठी माणसे गरजु मुले पाहिजे
१)मोबाईल डिलेव्हरीसाठी -पेण, पोयनाड, वडखळ, रेवदंडा, मुरूड, इतर मोटारसाईकलने बाईक आमची (लाईसन्स पाहिजे) २) कॉम्प्युटर ऑपरेटर लेडीज/जेन्टस, ३)पार्ट/ फुल टाईम पाहिजे. मो. ८८८८२२०२२१

● Vacancy in Office Education- Bsc/ Bcom, Salary - 15000 Per month, Location - Bamansure, Contacat- 9823585321


● Vacancy in Furniture Showroom Education- Bsc/Bcom, Experience -2 Years, Salary - 20,000 Per month, Location - Zirad, Contacat- 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

क्रमांक भूसं./ टे. ६/ जाहिरात/प्रसिद्धी/२०२६
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड,
अलिबाग, दिनांक :- ३०/१०/२०२६.

जाहिरात

(कलम ४ (नियम ३)

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम ४ अंतर्गत व नियम २०१४ च्या नियम ३ नुसार रायगड जिल्ह्यातील विविध प्रकल्पासाठी जमिनीचे भूसंपादन करण्यापूर्वी प्रकल्पबाधित क्षेत्रातील बाधित होणाऱ्या कुटुंबाचे सामाजिक परिणाम अभ्यास करण्यासाठी व सामाजिक परिणाम व्यवस्थापन योजना तयार करण्यासाठी विद्यापीठ शासकीय महाविद्यालय/सामाजिक कार्यविभाग/समाजशास्त्र शाखा अर्थशास्त्र शाखा व अशासकीय संघटना व्यावसायिक संस्था व जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज करण्यासाठी पात्रतेच्या अटी व शर्ती या कार्यालयाच्या वेब साईटवर (www.raigad.gov.in) वर पहावयास मिळतील

पात्रता पूर्ण करणाऱ्यांनी दिनांक ०४/११/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी रायगड, भूसंपादन शाखा, हिराकोट तलावाजवळ, अलिबाग, जि.रायगड येथे टपालाने/प्रत्यक्ष अथवा ई-मेल plaoraigad@gmail.com द्वारे अर्ज सादर करावे हि विनंती. तसेच सदर SIA कामी संस्थेच्या क्षमता मुल्यांकनासाठी मा.जिल्हाधिकारी रायगड यांचे कक्षात दि.०५/११/२०२६ रोजी दुपारी ०४.०० वा. मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

पात्रता :-
१. संबंधित विद्यापीठ महाविद्यालय विद्याशाखा हे शासन मान्यताप्राप्त असावी.
२. संबंधित अशासकीय संघटना/व्यावसायिक संस्था/शासकीय संस्था ही नोंदणीकृत असावी.
३. शासकीय मान्यता किंवा नोंदणी ही या जाहिरात पूर्वी ३ वर्षे पूर्ण झालेली असावी.
४. सामाजिक परिणाम अभ्यास करण्यासाठी व सामाजिक परिणाम व्यवस्थापन योजना यांच्या कामाचा कमीतकमी ३ वर्षाचा अनुभव असावा.
५. संबंधित संस्थेचे शासनमान्य लेखा परिक्षणाकडून ३ वर्षाचे लेखा परिक्षण केलेले असावे
६. या कामासाठी योग्य ते प्रशिक्षित मनुष्यबळ प्रशिक्षणासाठी इमारत, फर्निचर, कार्यालय वाहन व्यवस्था इत्यादी संस्थेच्या मालकीचे असावे व ते अद्ययावत असावे.
७. सदर कामासाठी आपला SIA करीता प्रति कुटूंब दर नमुद करणे आवश्यक आहे.

(सही/-)
(श्रीकांत गायकवाड)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
समन्वयक भूसंपादन रायगड



राशीभविष्य

- **मेष** : घाईने कोणतेही निर्णय घेऊ नयेत. उत्साहवर्धक घटना घडतील. आप्त भेटल्याने समाधान लाभेल.
- **वृषभ** : कौटुंबिक जीवनात शुभघटना घडतील. संततीच्या विद्याभ्यासाकडे लक्ष द्यावं. प्रकृती सांभाळावी.
- **मिथुन** : कामाची दगदग वाढणार आहे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. मित्रांचं चांगलं सहकार्य लाभेल.
- **कर्क** : नव्या कामांना गती मिळेल. भावंडांशी सामंजस्यानं रहावं. संसर्गजन्य आजारापासून सावध रहावं.
- **सिंह** : नव्या वाहनांची खरेदी करू शकाल. गृहसौख्य लाभेल. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल.
- **कन्या** : व्यवसायात अडचणी राहतील. मार्गही निघत जाईल. फार दगदग करू नका. स्वमताग्रह टाळावा.
- **तूळ** : यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. व्यवसायात बदल लाभदायक ठरतील. बाकी चिंता नको.
- **वृश्चिक** : प्रवास शक्यतो टाळावा. बोलण्यातून गैरसमज संभवतात. नोकरीत ताण-तणाव वाढीस लागतील.
- **धनु** : नव्या ओळखींपासून लाभ होईल. कर्ज प्रकरणात महत्त्वाचा दिलासा मिळेल. कौटुंबिक सौख्य लाभेल.
- **मकर** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. नव्या योजना मार्गी लागतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **कुंभ** : अपेक्षित ध्येयपूर्तीचं समाधान लाभेल. प्रक्रिया उद्योगात उत्कर्ष होईल. अनावश्यक ताण टाळावा.
- **मीन** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे होतील. सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घ्याल. प्रियजनांचा सहवास लाभेल.

ब्युटी टॉक

टिकवा त्वचेचा तजेला

तिशी ओलांडल्यानंतर त्वचेत बरेच बदल होऊ लागतात. चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात, त्वचा कोरडी दिसू लागते. डाग पडू लागतात. अशा वेळी काही उपायांनी आपण त्वचेचा तजेला टिकवून ठेऊ शकतो. त्वचेची काळजी घेताना या टिप्स फॉलो करा.

❊ डोळ्यांच्या आसपासची त्वचा खूप नाजूक असते. वाढत्या वयाच्या खुणा इथूनच दिसू लागतात. त्यामुळे डोळ्यांखालच्या त्वचेवर अंडर आय क्रीम लावा. एखादं दर्जेदार अंडर आय क्रीम तुमच्याकडे असायला हवं.

❊ तिशीनंतर साध्या टोनरऐवजी अँटी एजिंग टोनरचा वापर सुरू करा. वयाच्या या टप्प्यानंतर त्वचेवरची रोमछिद्र खुली होतात. मात्र अँटी एंजिंग टोनरमुळे त्वचेचा पीएच बॅलन्स राखला जाते. यामुळे त्वचा तजेलदार दिसते.

(क्रमश:)

३१ ऑक्टोबर

दिन विशेष

१८९५ : क्रिकेटपटू सी. के. नायडू यांचा जन्म.
१९७५ : ख्यातनाम संगीतकार सचिन देव बर्मन यांचं निधन.
१९८४ : पंतप्रधान इंदिरा गांधी यांची अंगरक्षकांकडून गोळ्या झाडून हत्या.
१९८६ : बालसाहित्यिका आनंदीबाई शिर्के यांचं निधन.
१९९९ : ज्येष्ठ चित्रकार डॉ. भय्यासाहेब ओंकार यांचं निधन.
२००५ : पंजाबी लेखिका आणि कवयित्री अमृता प्रीतम यांचं निधन.

टेक ज्ञान

बनवा तुमचा क्यूआर कोड

छोट्यांनो, सध्या विविध ठिकाणी क्यूआर कोडचा वापर होतो. आर्थिक व्यवहारांसाठी, ॲप डाउनलोड करण्यासाठी क्यूआर कोड डाउनलोड करावा लागतो. या छोट्याशा कोडमध्ये बरीच माहिती दिलेली असते. बऱ्याच लोकांची माहिती व्ही कार्डमध्ये सेव्ह झालेली असते. असा कोड तयार करण्याची प्रक्रिया अगदी सोपी आहे.

हा क्यूआर कोड उपलब्ध करून देणाऱ्या वेबसाईट्स आहेत. युजर्सना गूगलमध्ये जाऊन क्यूआर कोड जनरेट टाईप करावं लागेल. यानंतर तुमच्यासमोर बऱ्याच वेबसाईट्स ओपन होतील.

या वेबसाईटमध्ये गेल्यावर व्ही कार्डचा पर्याय दिसतो. यात तुमची सगळी माहिती भरावी लागेल. यानंतर क्यूआर कोड जनरेट या पर्यायावर क्लिक करा. आता तुमची सगळी माहिती क्यूआर कोडच्या रुपात सेव्ह होईल. हा कोड स्कॅन केल्याशिवाय कोणालाही ही माहिती बघता येणार नाही. फोनमधल्या कॅमेऱ्यात क्यूआर कोड स्कॅनरचा पर्याय असतो. हा पर्याय नसेल तर क्यूआर कोड स्कॅनर ॲप डाउनलोड करता येईल.

आरोग्यमंत्र

दंतसमस्यांविषयी...

शरीराला अनेक पोषणमूल्यांची आवश्यकता असते, त्यातील एक म्हणजे प्रोटीन. प्रोटीनअभावी दातांच्या आणि हिरड्यांच्या आरोग्याचं मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊ शकतं खेरीज दात किडण्याचा धोकाही वाढतो. चिकन किंवा अंडी यासारखे पदार्थ प्रोटीनचे समृद्ध स्त्रोत मानले जातात. प्रति दिन १००० मिलिग्राम प्रोटीन आणि व्हिटॅमिन्सच्या सेवनाने हिरड्यांच्या समस्यांपासून लांब राहता येतं. प्रोटीनच्या कमतरतेमुळे होणारे दातांचे काही आजार पुढीलप्रमाणे-



जिंजिवायटीस- या आजारामध्ये हिरड्या लाल होणं, हिरड्यांची मुळं कमकुवत होणं ही लक्षणं दिसून येतात. काही वेळा दातांमध्ये त्रिकोणी भाग तयार होतो ज्यामुळे वेदनांना सामोरं जावं लागतं. पांढऱ्या कोशिकांचं विशिष्ट ठिकाणी झालेलं एकत्रीकरण हे देखील जिंजिवायटीसचं कारण असू शकतं. जिंजिवायटीसवर योग्य वेळी उपचार केले गेले नाहीत तर पेरोडोंटायटीसचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता वाढते. पायोरिया- पायोरिया हा हिरड्यांशी संबंधित आजार आहे. ब्रश करताना किंवा काहीही खाताना हिरड्यातून रक्त येणं हे पायोरियाचं लक्षण समजलं जातं. पेरीओडोंटायटीस- या आजारामध्ये आतील आवरणावर परिणाम होऊन दात सुट्टे व्हायला लागतात. सुट्या झालेल्या दातांमध्ये कीड वाढीस लागून ते मुळापासून विलग होऊन पडू लागतात. योग्य आहार आणि वेळोवेळी केली जाणारी स्वच्छता दातांचं आरोग्य उत्तम ठेवण्यास उपकारक सिद्ध होते.

ग्रूमिंग

❊ केसांसाठी कोणताही शँपू वापरून चालणार नाही. नैसर्गिक घटकांनी युक्त शँपू वापरणं योग्य ठरतं. तुमचा शँपू सल्फेट आणि पॅराबेन फ्री असावा.

❊ कंडिशनरचा वापर टाळू नका. कंडिशनरमुळे केसांना ओलावा मिळतो. केस छान मुलायम होतात.

❊ आठवड्यातून एकदा केसांना तेल लावा. यामुळे केसांमधला ओलावा टिकून राहिल. कुरळे केस असणाऱ्या मुलांनी नियमित तेल लावायला हवं.

(क्रमश:)

पंचांग

शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, अश्विन कृ. ६, चंद्रराशी : मिथुन, नक्षत्र : आर्द्रा,पुनर्वसु, योग : सिद्ध, सूर्योदय ६.४०, सूर्यास्त ६.०४

फॉरवर्ड्स

बड़ी अज़ीब सी कशमकश हैं ज़िन्दग़ी में...

झूठ बोलो तो रब नाराज़ और सच बोलो तो अपनें...!

करिअरवाटा

व्हा ॲग्रीकल्चरल मार्केटर

सध्या शेतकऱ्यांचा माल थेट ग्राहकांपर्यंत नेण्यावर भर दिला जात आहे. या पद्धतीत ग्राहकांनाही माल स्वस्त मिळतो आणि शेतकऱ्यांनाही चार पैसे जास्त मिळतात. या यंत्रणेतून ॲग्रीकल्चरल मार्केटर हा नवा घटक उदयाला आला आहे. पीक काढल्यानंतर या घटकाचं काम सुरू होतं, असं सर्वसाधारणपणे मानलं जातं. परंतु प्रत्यक्षात ते त्यापूर्वीच सुरू झालेलं असतं. शेतकऱ्यांना एक सल्ला दिला जातो की, जे पिकवाल ते विकण्याचा प्रयत्न करू नका, परंतु जे विकते ते पिकवा. म्हणजेच बाजारावर नजर ठेवून शेती करा. अशी नजर ठेवणं हे मार्केटिंगचंच काम आहे. म्हणून ॲग्रीकल्चरल मार्केटर हा शेतकऱ्यांना शेतात काय पिकवावं, असा सल्ला देण्यापासून कामात गुंतलेला असतो. शेतमाल पिकवल्यापासून तो माल ग्राहकाच्या हातात पडेपर्यंत निवडणं, साठवणं, पॅकिंग, वाहतूक करणं, प्रोसेस करणं, जाहिरात करणं, वितरण करणं आणि विक्री एवढ्या क्रिया असतात. या सर्व कामात ॲग्रीकल्चरल मार्केटर उपयुक्त असतो. या कामाचं प्रशिक्षण देणाऱ्या काही संस्था कार्यरत झाल्या आहेत. पदवीनंतरचा ॲग्री बिझनेस एम.बी.ए. असा स्वतंत्र कोर्स तयार करण्यात आला आहे. इच्छुकांनी त्याचा लाभ घ्यावा.



खेचाखेची

गाढव

एकदा एका शाळेतल्या व्रात्य मुलांनी शाळेत काहीतरी मस्ती करायचं ठरवलं.
बऱ्याच विचारांती त्यांनी तीन गाढवं आणली. त्यांच्या पाठीवर १, २ आणि ४ हे क्रमांक लिहून त्यांना शाळेच्या मैदानात सोडून दिलं.
मुख्याधापकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी शाळेतले सगळे कर्मचारी गाढव क्रमांक ३ शोधायला दिवसभर राबवले.

वेगळं काही

संगीतकार स्टिफन मॉरिस यांना त्यांचं हरवलेलं व्हायोलिन परत मिळालं. मध्यंतरी लंडनच्या दक्षिण भागात रेल्वेने प्रवास करताना ते हरवलं होतं. हे व्हायोलिन ३१० वर्षांपूर्वीचं असल्यामुळे मॉरिस यांच्या जीवाची घालमेल सुरू होती. जुन्या काळातलं व्हायोलिन परत मिळू शकत नसल्याने ते खूपच अस्वस्थ झाले होते. मात्र १० दिवसांनी त्यांना व्हायोलिन मिळालं. या पुरातन व्हायोलिनची किंमत थोडीथोडकी नाही. हे वाद्य खरेदी करण्यासाठी तुम्हाला २.५ लाख पाउंड द्यावे लागतील. व्हायोलिनची ही किंमत ऐकून कोणीही उडेल. डेव्हिड टेक्लर यांनी १७०९ मध्ये हे व्हायोलिन तयार केलं होतं. स्टिफन यांनी आपलं व्हायोलिन हरवल्याची तक्रार दाखल केली होती.

संगोपन

वातावरण सकारात्मक हवं

मुलांना सतत कोणत्या ना कोणत्या परीक्षेची तयारी करावी लागते. त्यांचा हा अभ्यास हसत खेळत, तणावरहित व्हावा यासाठी काही मुद्दे लक्षात घेणं गरजेचं ठरतं.

❊ आपल्या मुलांनी भरपूर गुण मिळवावे असं वाटत असलं तरी प्रत्येक मूल वेगळं असतं हे पालकांनी लक्षात घ्यायला हवं. त्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव टाकू नका. ❊ मुलांची इतरांशी तुलना करू नका. यामुळे त्यांच्यामध्ये कमीपणाची भावना निर्माण होऊ शकते.



❊ मुलांवर सतत अभ्यास करण्याचा दबाव टाकू नका. अभ्यास करताना मुलांना येणाऱ्या अडचणींचा विचार करा. त्यांच्याशी बोला. एखादा विषय कठीण वाटत असेल तर चर्चा करून मार्ग काढा. ❊ मुलांशी प्रेमाने बोला. कमी गुण मिळाले म्हणून त्यांना ओरडू नका. कमी गुण का मिळाले यामागची कारणं जाणून घ्या. ❊ घरातलं वातावरण सकारात्मक आणि शांत ठेवा. ❊ मुलं डोकेदुखी, अंगदुखी, चक्कर येणं, विस्मरण, भीती वाटणं, अस्वस्थ वाटणं अशा तक्रारी करत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. त्यांना डॉक्टरांकडे न्या. गरज पडली तर समुपदेशकाची मदत घ्या.

सुडोकू १६८

३		२		१	८			
५			७				४	
६			२			७		८
		९		५				
	३		६	८	७		१	
				२		५		
४		३			९			६
	५				२			४
			१	४		९		२

टीप -

❊ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


❊ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

❊ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १६७ चे उत्तर

६	३	४	५	२	७	१	८	९
७	८	९	४	६	१	५	२	३
२	१	५	९	३	८	६	७	४
९	४	६	१	८	२	३	५	७
५	७	३	६	९	४	२	१	८
१	२	८	३	७	५	४	९	६
४	५	७	८	१	३	९	६	२
३	९	२	७	५	६	८	४	१
८	६	१	२	४	९	७	३	५

शब्दकोडे क्रमांक १६८



आडवे शब्द :-

१) रक्षा
२) अहोरात्र
५) संतापी
७) वारा
९) भ्रम, भ्रांती
१०) सुरुच्या झाडाचा चीक
११) माळ, सर
१२) धोड्यावरून मारलेली फेरी
१४) विल्हेवाट, निकाल
१५) तात्काळ
१८) मोठी वाटी
१९) हत्तीचा छावा
२०) सत्ता
२१) रजत, रुपे
२३) सुंदर तरुणी
२५) मुलाची किंवा मुलीची मुलगी
२७) उपकार
२८) हातात हात घेऊन अभिवादन करणे
३१) लाजणारा
३२) माल साठविण्याची जागा
३३) कच्चा लाकडी पूल
३७) नट्टापट्टा
३९) एकावर एक रचलेले
४१) रस्ता
४३) कुबेराचा सेवक
४४) माकडातील एक प्रकार
४५) वाकडा नसलेला
४७) पर्वत, वस्तू
४८) मलई
४९) एक प्रश्नार्थक शब्द
५१) न सुटणारा विळखा
५१) वयाने जास्त असलेली वधू
५३) झाडावर पिकू लागलेले फळ
५४) छोटा सुरा
५५) शोक, दु:ख
५७) दरवाजा
५९) ठोक, हाण
६१) यात्रेस जाणे
६२) दुर्दशा, दुश्चिन
६३) आश्चर्याची गोष्ट,
६४) देव
६६) कारस्थान
६७) खून, वध, हत्या
६९) अस्तावस्त पसरलेले सामान

उभे शब्द :-

१) मीठ
२) ढीग
३) पूर्ण चोवीस तास
४) नवऱ्याची दुसरी पत्नी
५) प्रफुल्लित, टवटवीत
६) कडक
७) जमीन खोदण्याचे एक हत्यार
८) नवरदेव
९) स्तुती करणारा,
१३) पोट (हिं.)
१४) एक द्विदल धान्य
१६) नवऱ्याची वा बायकोची आई
१७) खटला दाखल करणारा
२१) भला
२२) हेलकावा, चळवळ
२४) मनातील कल्पना
२६) तळे, सरोवर
२८) हेळसांड दुर्लक्ष
२९) लग्नातील वर-वधू
३०) व्रत
३४) पंकज
३५) पवित्र
३६) पुत्र, मुलगा
३८) मावा
४०) द्रवपदार्थ
४१) घोंगड्या विणणारी जमात
४२) ढाळ, उतरणे, टेकडी
४६) रक्कम, ठराविक पैसे
४८) ❊❊ बुद्धी नाठी
५०) काळजी, फिकीर
५१) माकडांना खेळविणारा
५२) मिश्रण, भेसळ
५३) बाजीप्रभुंनी लढविलेली जागा
५४) अरुंद तोंडाचे चिंचोळे पात्र
५६) शेतकऱ्यांना सरकारने दिलेले कर्ज
५८) बैलाचा सण
५९) रेलचेल विपुलता
६०) श्रीमंत
६१) घाव, प्रहार
६२) गुन्हा
६५) श्वासोच्छ्वासाची क्रिया
६६) कशा प्रकारचा
६७) शस्त्र,
६८) वाकण्याची क्रिया
६९) पडणे
७०) पुष्परस
७१) सडलेला
७३) बगळा
७५) अवस्था, स्थिती
७६) थाळी
७८) एक छोटे चर्मवाद्य

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

द	र	बा	री	का	न	डा		का	क		ज		म	रा
र	म	ल		रा	म	रा	ज्य		ल	हा	न	स	हा	न
सा		प	र	वा		डू		सी	मा		ग	र्व		व
ल	व	ण		स	म	र	स	ता		स	ण		भा	ट
द	र		सा		ग		मा		आ	रा	म	शी	र	
र	ण	बा	व	रा		ना	चा	ना	च		न	र		वि
शे		र		जा	दू	गा	र		म	ठ		द	स	रा
क	र	व	त		र			पा	न		म	ळ	व	ट
डा	स		या	द	व		क	ल		जा	स्त		ल	
	दा	द	र		र	ख	र	खी	त		वा	ह्या	त	
शा	र	दा		न		वा	त		रु	मा	ल			म
लि		त	ल	वा	र		ल	ता		ला		ध	म	क
वा	स		व	र	क	स		ड	ब	ड	ब	णे		रं
ह	त	ब	ल		बा	र	दा	न			ल		र	द
न	त		व	र्षा		डा	स		क	र	क	री	त	



मातीचा गंध जपणारी

लावणी हरपली!

लावणीला आपल्या अभिनयाचा, आवाजाचा आणि सहजसुंदर अदाकारीचा साज चढवणाऱ्या ज्येष्ठ कलाकार मधुताई कांबीकर यांच्या निधनाने मराठी लोककलेच्या आभाळातला एक लखलखता तारा निखळला. त्यांच्या जाण्यानं केवळ एक कलावंत हरपली नाही, तर तमाशाच्या फडात, लोकनाट्याच्या रंगमंचावर आणि रसिकांच्या मनात अनेक दशकं रुंजी घालणारा एक जिवंत स्वर काळाच्या पडद्याआड गेला.

महेश जोशी



मधुताईंच्या आयुष्याकडं पाहिलं, की कलेच्या वाटेवर चालणाऱ्या माणसाची जिद्द काय असते, याची जाणीव होते. त्यांनी आपल्या कलेच्या जोरावर मराठी कलाविश्वात स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं. त्यांचा प्रवास काही एका रात्रीत घडलेला नव्हता. त्यामागे मेहनत होती, रियाज होता, संघर्ष होता आणि आपल्या कलेवर असलेली अपार श्रद्धा होती. शाळेच्या चार भिंतींपेक्षा त्यांना कलेच्या खुल्या आकाशाने अधिक भुरळ घातली. तमाशाच्या फडात पायात चाळ बांधून उभं राहणं, तालावर पावलं टाकणं, गाण्याचे शब्द समजून घेणं आणि समोर बसलेल्या रसिकांच्या मनाचा ठाव घेणं, हीच त्यांच्यासाठी जगण्याची खरी शाळा होती. त्या शाळेत गुणपत्रिका नव्हती; पण प्रत्येक प्रयोगानंतर मिळणारी रसिकांची दाद हीच त्यांच्या कलेची खरी पावती होती. तमाशाच्या फडात काम करणं म्हणजे आजच्या काळातल्या चकचकीत मंचावर उभं राहण्याइतकं सोपं नव्हतं. उन्हातान्हात प्रवास, रात्री उशिरापर्यंत चालणारे प्रयोग, अपुरी साधनं, समाजाकडून मिळणारी दुय्यम वागणूक आणि कलेच्या जोरावर आपलं अस्तित्व टिकवण्याची धडपड अशा अनेक आव्हानांना कलावंतांना सामोरं जावं लागायचं. अशा वातावरणातून स्वतःला घडवत मधुताईंनी आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवला. वैशिष्ट्य असं, की त्यांनी परंपरेच्या नावाखाली स्वतःला एका चौकटीत अडकवून घेतलं नाही. लावणीच्या मुळाशी असलेला ताल, नजाकतदार शृंगार आणि तिचं लोकजीवनाशी असलेलं नातं त्यांनी जपलं. त्याचबरोबर कथ्थकचं शिक्षण घेऊन नृत्याची व्याप्तीही वाढवली. लोककलेचा अस्सल बाज कायम ठेवत शास्त्रीय नृत्याची शिस्त आत्मसात करणं, ही त्यांची कलासाधनेतील जमेची मोठी बाजू होती.

लावणीच्या बाबतीत आपल्याकडे एक मोठा गैरसमज आहे. लावणी म्हटलं, की काहीजणांना फक्त नृत्य, शृंगार आणि मनोरंजन दिसतं. त्या पलिकडे असलेलं जीवनाचं दर्शन अनेकदा नजरेआड होतं. लावणीच्या शब्दांमध्ये प्रेम आहे, विरह आहे, रुसवा-फुगवा आहे, संसारातले ताणतणाव आहेत, पुरुषी वृत्तीवरचा उपरोध आहे आणि कधी कधी व्यवस्थेवर केलेली बोचरी टीकाही आहे. गावाकडच्या बाईच्या मनातलं सुख-दुःख, तिच्या संसारातल्या तक्रारी, तिच्या प्रेमातली ओढ आणि जगण्यातली मिश्कीलता लावणी सहज व्यक्त करते. एखाद्या ओळीत ती हसवते, दुसऱ्या ओळीत मनाला चटका लावते आणि तिसऱ्या ओळीत जगण्याचं तत्त्वज्ञान सांगून जाते. म्हणूनच लावणी ही केवळ नाचण्याची कला नाही, ती जगण्याची भाषा आहे. मधुताईंनी ही भाषा केवळ ओठांवर ठेवली नाही, तर ती आपल्या देहबोलीत, नजरेत आणि अभिनयात उतरवली. त्यांच्या सादरीकरणात उगाचचा आविर्भाव नव्हता. शब्दांचा अर्थ समजून घेऊन त्याला अनुरूप भाव देणं, तालात राहूनही अभिनयाला जिवंत ठेवणं आणि प्रेक्षकांशी थेट संवाद साधणं, हे त्यांचं वैशिष्ट्य होतं. लावणीच्या फडात एखादी कलावंत रंगमंचावर येते, तेव्हा तिच्या पायातले घुंगरू बोलायला लागतात. ढोलकीचा ठेका वाढतो, तबल्याची साथ मिळते आणि प्रेक्षकांची नजर तिच्यावर स्थिरावते; पण या सगळ्यांच्या पलिकडे त्या कलावंताच्या चेहऱ्यावरून गाण्याचा अर्थ उलगडतो, तेव्हाच सादरीकरणाला खरा रंग चढतो. मधुताईंच्या कलेत हा रंग होता. त्यांच्या लोकप्रिय लावण्यांमधून त्यांच्या अदाकारीची ताकद दिसून येत होती.

'भरलं आभाळ पावसाळी पाहुणा गं बाई, श्रावणाचं ऊन मला झेपेना' किंवा 'कुटं तुमि गेला होता सांगा कारभारी' यांसारख्या लावण्यांना त्यांनी आपल्या शैलीनं एक वेगळी ओळख दिली. त्यांचं सादरीकरण पाहताना शब्द, सूर, ताल आणि अभिनय यांचा सुरेख मेळ अनुभवायला मिळत असे. मधुताईंची ओळख लावणी कलावंत म्हणून असली, तरी त्यांचं कर्तृत्व तिथेच थांबत नाही. चित्रपट, नाटक, लोकनाट्य आणि दूरदर्शन या वेगवेगळ्या माध्यमांमध्ये त्यांनी आपली अभिनयक्षमता सिद्ध केली. त्यांच्या अभिनयात ग्रामीण जीवनाची सहजता होती. गावाकडच्या माणसांच्या बोलण्यातला लहेजा, चेहऱ्यावरचे भाव, स्वभावातली ठसकेबाज सहजता त्यांना चांगली अवगत होती. राजदत्त दिग्दर्शित 'शापित' या चित्रपटातून त्यांच्या अभिनयाची वेगळी ओळख निर्माण झाली. त्यानंतर 'एक होता विदूषक', 'झपाटलेला', 'डेबू', 'राघू मैना', 'हेच माझं माहेर' अशा चित्रपटांतून त्यांनी विविध भूमिका साकारल्या. दादा कोंडके यांच्यासोबत केलेल्या चित्रपटांमध्येही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. 'झपाटलेला'मधील लक्ष्याच्या आईची भूमिका असो किंवा 'डेबू'मधील व्यक्तिरेखा, त्यांनी भूमिका केवळ निभावल्या नाहीत, तर त्यात जीव ओतला. ग्रामीण स्त्रीच्या भूमिकेत त्या दिसल्या, की त्या व्यक्तिरेखेच्या जगण्यावर विश्वास बसायचा. तिच्या बोलण्यातला रांगडेपणा, चेहऱ्यावरची काळजी, घरासाठी चाललेली धडपड आणि प्रसंगी दिसणारा खंबीरपणा त्यांच्या अभिनयातून सहज व्यक्त व्हायचा. त्यासाठी त्यांना मोठमोठे संवाद किंवा नाट्यमय हालचालींची गरज पडत नसे.मधुताई साध्या हावभावांमधूनही व्यक्तिरेखेचा स्वभाव उभा करायच्या. हीच तर खऱ्या कलावंताची ओळख असते. स्वतःचं अस्तित्व भूमिकेवर न लादता भूमिकेचं अस्तित्व स्वतःमध्ये सामावून घ्यायचं कसब त्यांनी आत्मसात केलं होतं. शास्त्रीय कला आणि लोककला यांच्यात श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद करण्याचं कारणच नाही. दोन्हींच्या साधनेच्या पद्धती वेगळ्या असतील; पण दोन्ही कलांमागं मेहनत, कौशल्य आणि अभिव्यक्तीची ताकद असते. लावणी सादर करताना केवळ तालावर पावलं टाकून चालत नाही. गाण्याचे शब्द, त्यांचा अर्थ, संगीताची लय, चेहऱ्यावरील भाव, हातवारे, देहबोली आणि प्रेक्षकांशी साधला जाणारा संवाद या सगळ्यांचा एकत्रित विचार करावा लागतो. मधुताईंच्या कलेचा गौरव करताना या व्यापक दृष्टिकोनाची आठवण ठेवली पाहिजे. त्यांच्यासारख्या कलावंतांनी लोककला हे केवळ मनोरंजनाचं साधन न ठेवता अभिनय आणि अभिव्यक्तीचं एक समर्थ माध्यम म्हणून उभं केलं. कलावंताचं आयुष्य रंगमंचावर टाळ्यांच्या गजरात फुलतं; पण त्या गजरामागे अनेकदा एकटेपणाची कहाणी दडलेली असते. प्रयोगाच्या वेळी प्रकाशझोतात असलेला कलाकार प्रयोग संपल्यानंतर पुन्हा सामान्य माणसाच्या जगात परततो. आजारपण, आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि वयामुळे येणाऱ्या मर्यादा त्यालाही चुकत नाहीत.

मधुताईंनाही आयुष्याच्या उत्तरार्धात आरोग्याच्या समस्यांना सामोरं जावं लागलं. २०१६ मध्ये लावणीच्या कार्यक्रमादरम्यान त्यांना पक्षाघाताचा झटका आला. त्यानंतर त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला आणि त्यांना सक्रिय कलाक्षेत्रापासून दूर राहावं लागलं.

एकेकाळी मंचावर ठसकेबाज अदाकारीने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या कलावंताला नंतरच्या काळात आजारपणाशी झुंज द्यावी लागणं, ही काळाची एक वेदनादायी बाजू आहे. म्हणूनच केवळ यशाच्या काळात कलावंतांचा गौरव होऊन चालत नाही, त्यांच्या अडचणीच्या काळातही समाजाने त्यांच्या पाठीशी उभं राहायला हवं. मधुताईंच्या निधनामुळे एका प्रदीर्घ कलाप्रवासाचा शेवट झाला आहे; पण त्यांच्या कलेचा प्रवास संपलेला नाही. 'शापित'मधला अभिनय, 'एक होता विदूषक'मधील लावणीचा बाज, 'झपाटलेला'मधली व्यक्तिरेखा आणि त्यांनी सादर केलेल्या लावण्यांमधली सहजसुंदर अदाकारी या सगळ्यांच्या माध्यमातून त्या रसिकांच्या स्मरणात राहतील. त्यांच्या कलेत महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा गंध होता. त्या गंधात माती होती, माणसं होती. त्यांच्या सुख-दुःखांच्या कहाण्या होत्या. त्यांच्या पावलांमध्ये ताल होता; पण त्या तालाला केवळ मनोरंजनाची मर्यादा नव्हती. त्यात लोकसंस्कृतीचा ठेवा होता. म्हणूनच त्यांचं योगदान एका अभिनेत्रीचं किंवा एका लावणी कलावंताचं योगदान म्हणून मर्यादित करून चालणार नाही. त्या मराठी लोककलेच्या एका महत्त्वाच्या परंपरेच्या प्रतिनिधी होत्या. मधुताईंच्या पायातले घुंगरू आता प्रत्यक्षात वाजणार नाहीत. त्यांच्या अदाकारीने रंगलेला मंच पुन्हा तसाच सजणार नाही. त्यांचा आवाज आणि उपस्थितीची उणिव रसिकांना कायम जाणवत राहील; पण ढोलकीचा ठेका कानावर पडला, लावणीचे बोल ओठांवर आले आणि एखाद्या कलावंताने आपल्या अदाकारीने रसिकांना मंत्रमुग्ध केलं, की मधुताईंची आठवण नक्कीच जागी होईल.

मधुताईंच्या जाण्याने पडदा पडला असेल; पण त्यांनी उभं केलेलं कलाविश्व संपलेलं नाही. महाराष्ट्राच्या मातीचा गंध घेऊन फुललेली त्यांची कला काळाच्या ओघातही दरवळत राहील. घुंगरू थांबलं, तरी त्यांचा ठेका मनामनात घुमत राहील.

'फौजी'वर वादाच्या फैरी युद्धभूमीवर



बंदुकांचा धडाका, पार्श्वभूमीला अंगावर रोमांच आणणारे संगीत आणि शत्रूला थेट आव्हान देणारा एक बंडखोर सैनिक... असा थरार पडद्यावर पाहायला कोणाला आवडणार नाही? मात्र, जेव्हा या थरारात इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांची एंट्री होते, तेव्हा प्रेक्षकांच्या अपेक्षांसोबतच त्यांच्या भावनाही पणाला लागतात. अभिनेता प्रभासच्या आगामी 'फौजी' चित्रपटाच्या टीझरने सध्या असाच काहीसा अनुभव दिला आहे. प्रभासच्या वाढदिवसानिमित्त २३ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित झालेल्या या टीझरची चर्चा केवळ त्यातील ॲक्शनमुळे होत नाही, तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या चित्रणामुळेही रंगली आहे. त्यामुळे चित्रपट प्रदर्शित होण्याआधीच मनोरंजनविश्वात कौतुक, नाराजी आणि वाद यांचे मिश्रण पाहायला मिळत आहे. या टीझरमध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर नेताजी सुभाषचंद्र बोस आणि जर्मन हुकूमशहा ॲडॉल्फ हिटलर यांच्या भेटीचा प्रसंग दाखवण्यात आला आहे. त्यानंतर प्रभास एका बंडखोर सैनिकाच्या भूमिकेत समोर येतो. देशासाठी कोणत्याही थराला जाण्याची तयारी असलेला हा सैनिक, दमदार संवाद, बंदुकांची आतषबाजी आणि भव्य दृश्यांमुळे लक्ष वेधून घेतो. मात्र, नेताजी हिटलरशी बोलताना प्रभासच्या व्यक्तिरेखेची प्रशंसा करताना दिसतात, या प्रसंगावर अनेक प्रेक्षकांनी आक्षेप घेतला आहे. ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचा वापर नायकाची प्रतिमा उंचावण्यासाठी करणे योग्य आहे का, असा प्रश्न समाजमाध्यमांवर उपस्थित केला जात आहे. काहींनी निर्मात्यांनी माफी मागावी, अशी मागणीही केली. तर काही प्रेक्षकांनी सतत रक्तरंजित नायक, मोठ्या बंदुका आणि कर्णकर्कश पार्श्वसंगीत यांचाच आधार घेणाऱ्या ॲक्शनपटांच्या साच्यावर टीका केली आहे. अर्थात, प्रभासच्या चाहत्यांनी चित्रपट काल्पनिक कथानकावर आधारित असल्याचे सांगत त्याची बाजूही मांडली आहे. दिग्दर्शक हनु राघवपुडी यांच्या 'फौजी'चा टीझर २ मिनिटे ३१ सेकंदांचा असून, त्यात प्रभासला 'भारताचा सर्वात मोठा बंडखोर सैनिक' अशा स्वरूपात सादर करण्यात आले आहे. चित्रपटाची निर्मिती मैत्री मूव्ही मेकर्सने केली असून, टी-सीरिज फिल्म्सची प्रस्तुती आहे. हा चित्रपट १९ मार्च २०२७ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. मात्र, प्रदर्शनाआधीच निर्माण झालेल्या या वादामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. अखेर 'फौजी' पडद्यावर शौर्याची नवी कहाणी सांगणार की ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या चित्रणामुळे वादाच्या भोवऱ्यात अडकणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. कारण ॲक्शनपटात बंदुकांचा आवाज मोठा असला, तरी इतिहासाशी संबंधित प्रसंगांमध्ये प्रेक्षकांच्या अपेक्षांचा आवाज त्याहून मोठा असू शकतो!

लॉलीवर माधुरी फिदा!

चेहऱ्यावर निरागस भाव, बोलण्यात भन्नाट इंग्रजीचा आत्मविश्वास आणि अतरंगी केशरचना! या सगळ्यांचा मेळ जमला की, हसू आवरणे कठीणच! 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मधील नम्रता संभेरावची 'लॉली' आता थेट माधुरी दीक्षितचीही आवडती व्यक्तिरेखा बनली आहे. माधुरीने स्वतः लॉलीची चाहती असल्याचे सांगितल्याने या आगळ्यावेगळ्या पात्राची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. 'कोण होणार करोडपती' या प्रश्नमंजूषेच्या कार्यक्रमातील विशेष भागात 'हास्यजत्रे'च्या कलाकारांशी गप्पा मारताना तिने लॉलीविषयीचे प्रेम व्यक्त केले. एवढेच नव्हे, तर दंतवैद्याशी संबंधित गाजलेला प्रसंग आठवून लॉलीचा लोकप्रिय संवादही सादर केला. त्यामुळे या भेटीत हास्याची रंगत आणखी वाढली.

लॉलीचे वैशिष्ट्य म्हणजे इंग्रजी बोलण्यात फारशी सफाई नसतानाही आपले इंग्रजी उत्तम असल्याचा तिचा ठाम विश्वास! तिची आगळी केशरचना, अतिरंजित हावभाव आणि साध्या प्रसंगांकडे पाहण्याची मजेशीर दृष्टी यांमुळे ही व्यक्तिरेखा लोकप्रिय झाली. या पात्राची प्रेरणा नम्रताला लालबागच्या चाळीतल्या बालपणातून मिळाली. तिथे वाढताना तिने विविध स्वभावांची माणसे, त्यांच्या बोलण्याच्या लकबी आणि हावभाव जवळून पाहिले. याच निरीक्षणांचा उपयोग तिने लॉली साकारताना केला. तिची केशरचनाही नम्रताने स्वतः तयार केली. आजूबाजूच्या जगातील छोट्या गोष्टींना अतिशयोक्तीची फोडणी देत तिने या पात्राला स्वतंत्र ओळख मिळवून दिली. नृत्यदिग्दर्शिका गीता कपूर आणि टेरेन्स लुईस यांनीही लॉलीची नक्कल करणारी ध्वनिचित्रफीत सादर केली आहे. माधुरीचा मराठी भाषेशी असलेला संबंध या भेटीला वेगळी किनार देतो. मराठी कुटुंबात वाढलेल्या माधुरीने २०१८मध्ये 'बकेट लिस्ट'मधून मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. तेजस प्रभा विजय देवस्कर दिग्दर्शित या चित्रपटात तिने मधुरा साने या गृहिणीची भूमिका साकारली होती. दुसऱ्या तरुणीचे हृदय प्रत्यारोपणातून मिळाल्यानंतर तिच्या अपूर्ण इच्छा पूर्ण करण्यासाठी धडपडणाऱ्या मधुराची ही कथा होती. गंभीर भावना प्रभावीपणे व्यक्त करणारी माधुरी लॉलीच्या खोडकर विश्वात रमते, तेव्हा विनोदाची ताकद अधोरेखित होते.



न्यायालयातील थरार

न्यायालय म्हणजे केवळ कायद्याची भाषा, पुराव्यांची जुळवाजुळव आणि युक्तिवादांची देवाणघेवाण नव्हे; तिथे प्रत्येक शब्दामागे एखाद्याचे आयुष्य, तर प्रत्येक निर्णयामागे सत्याचा कस लागलेला असतो. याच नाट्यमय अवकाशात प्रेक्षकांना घेऊन जाणारा 'प्रहार : द उज्ज्वल निकम स्टोरी' हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये दाखल झाला. राजकुमार रावने यात सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची भूमिका साकारली असून, १९९३ मधील मुंबई बॉम्बस्फोट आणि २००८ मधील मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यांनंतरच्या कायदेशीर लढ्यांची पार्श्वभूमी चित्रपटाला आहे. विषय गंभीर आहे, त्यातील संघर्ष नाट्यमय आहे आणि व्यक्तिरेखेच्या केंद्रस्थानी न्यायासाठीची लढाई आहे. त्यामुळे चित्रपटाकडून अपेक्षाही उंचावतात. मात्र, प्रभावी विषयाची निवड आणि प्रभावी चित्रपटाची निर्मिती या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत, याची जाणीव चित्रपट पाहताना होते. राजकुमार राव आपल्या अभिनयातून व्यक्तिरेखेला वजन देतो. संवादफेकीतील ठामपणा, प्रसंगानुरूप बदलणारी तीव्रता आणि न्यायालयातील युक्तिवादांदरम्यान दिसणारी त्याची पकड चित्रपटाला बळ देतात. पुराव्यांची मांडणी, प्रतिपक्षाला प्रश्नांनी घेरणे आणि खटल्यातील निर्णायक वळणे यांतून अपेक्षित तणाव निर्माण होतो. ललित प्रभाकरने साकारलेली अजमल कसाबची भूमिका आणि वामिका गब्बी, जयदीप अहलावत, सिकंदर खेर व आशिष विद्यार्थी यांच्यासह अन्य कलाकारांचे कामही चर्चेत राहते. दिग्दर्शक अविनाश अरुण यांची मांडणी, पार्श्वसंगीत आणि भावनिक प्रसंग न्यायालयीन संघर्षाला नाट्यमय आकार देतात. काही प्रसंगांत हा ताण जाणवतोही; मात्र तो संपूर्ण कथेत सारख्याच ताकदीने टिकून राहतो का, हा प्रश्न उरतो. चित्रपटाची खरी कसोटी पटकथेवर लागते. काही ठिकाणी कथनाची पकड सैल होते, कथानकाचा वेग मंदावतो आणि काही प्रसंगांचा मुख्य कथेशी असलेला संबंध पुरेसा स्पष्ट होत नाही, अशी टीका झाली आहे.



'थ्री इडियट्स'चा कोरियनवर इफेक्ट

भाषा वेगळी, देश वेगळा; पण एखादा चित्रपट मनापासून हसवतो, तेव्हा त्याच्याशी नाते जोडण्यासाठी भाषेची गरज उरत नाही! याचाच प्रत्यय दक्षिण कोरियाची अभिनेत्री जंग हो-योन हिच्या एका कौतुकातून आला आहे. आमिर खानच्या 'थ्री इडियट्स' या चित्रपटाने तिचे मन जिंकले असून, हिंदी चित्रपटांमधील आनंदी आणि सकारात्मक दृष्टिकोन तिला विशेष भावतो. गंभीर विषय मांडतानाही प्रेक्षकांना हसवता येते, आयुष्याकडे वेगळ्या नजरेने पाहण्याची प्रेरणा देता येते, हे भारतीय चित्रपटांचे वैशिष्ट्य असल्याचे तिला वाटते. 'व्हरायटी इंडिया'शी संवाद साधताना जंगने या चित्रपटाचा आवर्जून उल्लेख केला. प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणारी आणि त्यांना आनंद देणारी कलाकृती साकारण्याची इच्छाही तिने व्यक्त केली.२००९ मध्ये प्रदर्शित झालेल्या राजकुमार हिरानी दिग्दर्शित 'थ्री इडियट्स'ने शिक्षण आणि यशाच्या रूढ कल्पनांना विनोदाची जोड देत आव्हान दिले. आमिर खान, आर. माधवन, शर्मन जोशी आणि करीना कपूर-खान यांच्या भूमिका असलेल्या या चित्रपटात तीन मित्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवरील गुणांचा ताण, पालकांच्या अपेक्षा आणि स्वतःच्या आवडीने जगण्याची धडपड उलगडली आहे. रँचोचा बिनधास्त स्वभाव, फरहानची स्वप्नांसाठीची धडपड आणि राजूचा संघर्ष आजही प्रेक्षकांना भावतो. 'ऑल इज वेल' हा संदेशही केवळ विनोदी संवाद न राहता अडचणींमध्ये सकारात्मक राहण्याची आठवण करून देतो. म्हणूनच अनेक वर्षांनंतरही या चित्रपटाची लोकप्रियता टिकून आहे. दरम्यान, जंग हो-योन 'होप' या विज्ञानकथाप्रधान थरारपटामुळेही चर्चेत आहे.





बालांगण

जमिनीखालील नद्यांचं जग

नदी म्हटले की, डोळ्यांसमोर येतो तो जमिनीवरून वाहणारा पाण्याचा प्रवाह. मात्र, जगाच्या काही भागांत नद्या चक्क जमिनीखाली, गुहा आणि खडकांच्या अंधाऱ्या वाटांमधून प्रवास करतात. या नद्यांचे अस्तित्वच निसर्गाच्या अद्भुत रूपाची कल्पना देणारे आहे. फिलिपिन्समधील प्युर्टो प्रिन्सेसा भूमिगत नदी ही अशाच प्रसिद्ध नद्यांपैकी एक आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळांमध्ये तिचा समावेश आहे. ही नदी गुहेतून वाहत थेट समुद्राला जाऊन मिळते. बोटीने गुहेतून प्रवास करताना सभोवतालच्या नैसर्गिक रचना पाहण्याचा अनुभव वेगळाच असतो. मेक्सिकोतील रिओ सेक्रेटो नदीही गुहेच्या आतून वाहते. स्वच्छ पाणी आणि आकर्षक खडकांमुळे ही नदी पर्यटकांचे लक्ष वेधून घेते.



प्युर्टो प्रिन्सेसा



लबौइच नदी

फ्रान्समधील लबौइच नदी ही युरोपमधील दीर्घ नेव्हिगेबल भूमिगत नद्यांपैकी एक आहे. गुहेच्या आत बोटीतून प्रवास करताना तेथील नैसर्गिक रचना जवळून पाहता येतात. चेक प्रजासत्ताकातील पुंकवा नदीही गुहा आणि खोल दऱ्यांमधून प्रवास करते. येथे बोटीने केला जाणारा प्रवास विशेष आकर्षण मानला जातो. न्यूझीलंडमधील वेटोमो ग्लोवॉर्म गुहांमधील भूमिगत नदी मात्र वेगळाच अनुभव देते. नदीच्या वर हजारो ग्लोवॉर्म्स चमकत असल्याने अंधाऱ्या गुहेत आकाशातील असंख्य ताऱ्यांसारखे दृश्य दिसते. बोटीने शांतपणे पुढे जाताना तयार होणारे हे दृश्य निसर्गाच्या अनोख्या सौंदर्याची जाणीव करून देते.

अजब-गजब

अमेरिकेतील लॉस्ट रिव्हर केव्ह येथे भूमिगत नदीवर बोटीतून प्रवास करता येतो. शांत वातावरण आणि गूढ गुहा यामुळे हे ठिकाण पर्यटकांसाठी आकर्षक ठरते. व्हिएतनाममधील सोन डूंग गुहेतून वाहणारी नदी तर विशाल नैसर्गिक रचनेचा भाग आहे. जगातील सर्वांत मोठ्या गुहांपैकी एक असलेल्या या गुहेत नदी, मोठ्या खडकांची रचना आणि जंगलासारखे वातावरण एकत्र दिसते. अमेरिकेतील फ्लोरिडाची सांता फे नदी काही भागांत जमिनीखाली अदृश्य होते आणि पुढे पुन्हा जमिनीवर येते. त्यामुळे तिचा प्रवासही विशेष ठरतो. जमिनीवरून दिसणाऱ्या नद्यांपेक्षा या भूमिगत नद्यांचा प्रवास वेगळा असला, तरी त्यातून निसर्गाची विविध रूपे अनुभवायला मिळतात. गुहांच्या अंधारातून समुद्रापर्यंत किंवा पुन्हा जमिनीवर येणारा त्यांचा प्रवाह पृथ्वीच्या आत दडलेल्या अद्भुत जगाची झलक दाखवतो.

हॅलोविनची गोष्ट

आयर्लंडमध्ये खूप वर्षांपूर्वी स्टिंजी जॅक नावाचा धूर्त आणि कंजूष माणूस राहत होता. एके दिवशी तो आयरीश चहा पीत बसला होता. त्यावेळी सैतान त्याला घेऊन जाण्यासाठी आला. ठीक आहे, पण जाण्यापूर्वी शेवटचा कपभर चहा पिऊ दे. जॅक न घाबरता म्हणाला. हा शेवटचा चहा आहे. त्यामुळे या चहाचे पैसे म्हणून तूच एक रुपयाचे नाणे बन. नंतर चहावाल्याच्या ड्रावरमधून तू बाहेर ये आणि मला घेऊन जा. सैतानाने स्वत:ला एक रुपयाचे नाणे बनवले. पण स्टिंजी जॅकने ते नाणे आपल्या खिशातल्या क्रॉसजवळ घट्ट दाबून धरले. क्रॉसच्या भीतीमुळे सैतानाला नाण्याच्या रूपातून पुन्हा मूळ रूपात जाऊ येता येईना.



शेवटी सैतानाने जॅकला मुक्त करण्याची विनंती केली. आजपासून दहा वर्षे मला घेऊन जायचं नाहीस! जॅकने अट घातली. सैतानाला ती अट मान्य करावीच लागली.

दहा वर्षांनी सैतान पुन्हा आला. यावेळी जॅकने दुसरी युक्ती केली. मला नेण्याआधी झाडावरून एक सफरचंद तोडून दे. सैतान वर चढला. जॅकने झाडाच्या खोडावर मोठा क्रॉस कोरला. त्यामुळे सैतान झाडावरच अडकून बसला. शेवटी जॅकने त्याच्याकडून आणखी एक वचन घेतले. माझ्या मृत्यूनंतर मला नरकात नेऊ नकोस! पुढे जॅक मरण पावला. पण स्वर्गात त्याला जागा मिळाली नाही. वचन दिल्यामुळे सैतानाने त्याला नरकातही प्रवेश दिला नाही. मग तो बिचारा अंधारात अडकून पडला. दया येऊन सैतानाने त्याला एक लुकलुकती ठिणगी दिली. जॅकने ती भोपळ्यात ठेवून एक कंदील बनवला. लोक म्हणतात, नवीन कंदील मिळावा म्हणून हॅलोविनच्या दिवशी आजही जॅकचा आत्मा भोपळा शोधत फिरतो.



आयरीश लोककथा

सिंगल युज प्लास्टिक करा हद्दपार!

तुम्ही सिंगल यूज प्लास्टिकबद्दल ऐकलं असेल. सिंगल यूज म्हणजे एकदाच वापरता येणारं प्लास्टिक. प्लास्टिकचे डबे, बाटल्या तसंच इतर वस्तू कायम स्वरुपी किंवा काही वर्षं वापरता येतात. पण पिशव्या किंवा एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तू आपण टाकून देतो. हे प्लास्टिक नष्ट होत नाही. प्लास्टिकच्या पिशव्या जनावरांच्या पोटात जातात. प्लास्टिकमुळे पर्यावरणाचं प्रचंड नुकसान होतं. म्हणूनच या प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. एकदाच वापरलं जाणारं प्लास्टिक ङ्गफॉसिल फ्युअलङ्घपासून तयार केलं जातं. अशा प्लास्टिकमुळे कार्बन उत्सर्जनाचं प्रमाण वाढतं. आपण कचरा म्हणून टाकलेलं प्लास्टिक वातावरणात १०० वर्षांपेक्षा जास्त वेळ टिकून राहतं. या प्लास्टिकचा पुनर्वापर होत असला तरी त्याचं प्रमाण खूप कमी आहे. प्लास्टिकम धल्या घातक रसायनांचा अन्न, पाणी आणि विविध पेयांशी संपर्क येतो. त्यामुळे प्लास्टिकध्ये पदार्थ फार काळ साठवून ठेऊ नयेत. प्लास्टिकमुळे शरीरातल्या हार्मो न्सवर परिणाम होतो. यामुळे कॅन्सरही होऊ शकतो. समुद्राच्या तळाशी मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक सापडतं. या प्लास्टिकमुळे समुद्राचं प्रदूषण होत आहे. सागरी जीवांचं आरोग्य धोक्यात आलं आहे. या कारणामुळे आपण सिंगल यूज प्लास्टिक हद्दपार करणं गरजेचं आहे.



समाजभान



ऐतिहासिक वारसा जपणारं पाटणा

पाटणा ही बिहारची राजधानी. आजचं पाटणा म्हणजे पूर्वीचं पाटलीपुत्र. पाटलीपुत्र ही मौर्य साम्राज्याची राजधानी होती. म्हणूनच या शहराला ऐतिहासिक महत्त्व आहे. आर्यभट्ट पाणिनी, चाणक्य, कालिदास आणि वात्स्यायन ही महान व्यक्तिमत्त्वं मूळची पाटण्याची. इथे महात्मा गांधींचा ७० फूट उंच पुतळा आहे. हा गांधींजींचा जगातला सर्वात उंच पुतळा आहे. बोधगया हे स्थान बौद्ध धर्मियांच्या दृष्टीने खूप महत्त्वाचं मानलं जातं. गौतम बुद्ध यांनी याच ठिकाणी बोधीवृक्षाखाली बसून तपश्चर्या केली. इथेच त्यांना ज्ञानाची प्राप्ती झाली. बोधगया हे स्थान जगभरातल्या पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे. देश-विदेशातले पर्यटक इथे मोठ्या संख्येने येतात. इथे गोलघर नावाचं ठिकाण आहे. १७८६ मध्ये हे गोलघर बांधण्यात आलं.

पाटणा शहरात चार नद्या आहेत. गंगा, सोन, गंडक आणि पुनपुन अशा चार नद्या या शहरातून वाहतात. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीतही पाटण्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. चंपारण आणि 'भारत छोडो' या दोन्ही आंदोलनांमध्ये पाटण्याने मोठं योगदान दिलं होतं. असं हे पाटणा अनोखं शहर आहे.

सफर शहरांची



क्रेझ कलीनरी आर्ट्सची

कलीनरी आर्टसबद्दल तुम्ही ऐकलं असेल. तुमच्यात कल्पकता असेल, रुचकर स्वयंपाक करायची आणि पदार्थ छान सजवून सादर करण्याची कला अवगत असेल तर तुम्ही कलीनरी आर्टसकडे वळू शकता. पेस्ट्री मेकिंग आणि बेकरी प्रोडक्ट्सच्या माध्यमातून कलीनरी आर्टसमध्ये करिअर करता येईल. पेस्ट्री आणि बेकरीचं क्षेत्र प्रचंड विस्तारलं आहे. त्यामुळे या क्षेत्रात येण्याआधी सगळ्या गोष्टींचा नीट विचार करा. तुम्हाला कशात रस आहे हे जाणून घ्या. बेकरीमध्ये वेगवेगळी उत्पादनं तयार होतात. तुम्ही केक, पेस्ट्री, बिस्किटं असे काही पदार्थ बनवू शकता. बेकरी उत्पादनाच्या क्षेत्रात प्रवेश करताना दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवा. तुम्हाला केक आणि पेस्ट्री शेफ बनायचं आहे, स्वत:ची बेकरी सुरू करायची आहे का एखाद्या रेस्टॉरंटमध्ये काम करायचं आहे हे ठरवा. यासाठी थोडा वेळ घ्या. संशोधन करा. ऑनलाईन सर्च हा खूप चांगला मार्ग आहे. कलीनरी आर्टसचं प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था आहेत. तुम्ही चांगल्या संस्थेची निवड करा. यासाठी गूगल सर्च करता येईल. विविध संस्थांची, तिथल्या अभ्यासक्रमांची माहिती घेता येईल. यानंतरच प्रवेशाचा निर्णय घ्या. तुमच्या आवडीचं किंवा छंदाचं रुपांतर करिअरमध्ये करायचं असेल तर हा पर्याय अगदी चांगला आहे.

कोण होणार?

या चिमण्यांनो शाळेकडे आमुच्या!

शाळेच्या आवारात चिमण्यांचा चिवचिवाट ऐकू आला, तर वर्गाबाहेर पडून त्यांना पाहण्याचा मोह कोणाला होणार नाही? पण शहरांमध्ये वाढत्या इमारती आणि बदलत्या परिसरामुळे चिमण्यांना घरटी बांधण्यासाठी जागा, अन्न आणि पाणी मिळणे कठीण होत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी तामीळनाडूतील कुड्डुगल गणेशन यांनी शाळांमधून चिमणी संवर्धनाची मोहीम सुरू केली. २०१४ मध्ये अभियांत्रिकीचे विद्यार्थी असताना त्यांना या कामाची आवड निर्माण झाली. २०२० पासून त्यांनी विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी करून घेतले. आज तामीळनाडू, केरळ आणि कर्नाटक या तीन राज्यांतील ८०हून अधिक शैक्षणिक संस्थांम ध्ये त्यांनी चिमण्यांविषयी जागृती केली आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेली १५ हजारांहून अधिक घरटी उपलब्ध करून देण्यात आली असून, सुमारे १५ हजार कुटुंबांपर्यंत चिमणी संवर्धनाचा संदेश पोहोचला आहे.



निसर्गभान

गणेशन यांचा सल्ला मात्र थोडा वेगळा आहे. शाळेत चिमण्यांसाठी घरटी बसवण्याची घाई करण्याऐवजी आधी संपूर्ण आवाराचे निरीक्षण करा, असे ते सांगतात. परिसरात झाडे, झुडपे आणि गवत आहे का? चिमण्या कुठे दिसतात? त्यांना पाणी मिळते का? इमारतींमध्ये घरटे बांधण्यासाठी सुरक्षित जागा आहेत का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे महत्त्वाचे आहे. चिमण्यांना केवळ घरटे पुरेसे नसते. अन्न, पाणी, आसरा आणि सुरक्षितपणे फिरण्यासाठी जागाही आवश्यक असते. पिल्लांना खाऊ घालण्यासाठी कीटक महत्त्वाचे असल्याने नैसर्गिक अधिवास जपणे गरजेचे आहे. म्हणूनच शाळेतील हिरवळ टिकवणे, स्थानिक झाडे लावणे आणि स्वच्छ, उथळ भांड्यात पाणी ठेवणे असे छोटे बदल उपयोगी ठरू शकतात. चिमण्यांना धान्य घालणे हाच संवर्धनाचा मुख्य मार्ग नाही, असेही गणेशन सांगतात.

चेन्नईतील आरपीसी मॅट्रिक्युलेशन हायर सेकंडरी स्कूलमध्ये सुमारे १५० घरटी बसवण्यात आली. सहा महिन्यांच्या आसपास चिमण्यांची हालचाल वाढल्याचे दिसले. विद्यार्थ्यांनी त्यांचे निरीक्षण सुरू केले आणि कोणत्या जागा त्यांना अधिक अनुकूल आहेत, याची नोंद ठेवली. हा अनुभव नियंत्रित वैज्ञानिक अभ्यास नसून, प्रत्यक्ष निरीक्षणांवर आधारित आहे. विद्यार्थ्यांनीही घरट्यांकडे वारंवार जाऊन पक्ष्यांना त्रास देण्याऐवजी सुरक्षित अंतरावरून पाहावे. चिमण्या कधी दिसल्या, घरट्यात ये-जा करतात का आणि परिसरात कोणते बदल झाले, याची नोंद ठेवता येते. शाळेत चिमणी संवर्धन मंडळ स्थापन करून हा उपक्रम पुढेही सुरू ठेवता येईल. चिमण्यांसाठी मदत करण्याची सुरुवात मोठ्या कामातूनच व्हावी असे नाही; शाळेच्या आवारात एक फेरी मारून निसर्गाचे निरीक्षण करण्यापासूनही ती होऊ शकते.



जेन-झीची 'ऑफिस डिक्शनरी'

ऑफिस म्हणजे सकाळपासून संध्याकाळपर्यंत सतत काम आणि त्यानंतरही ई-मेल, मेसेजच्या माध्यमातून काम सुरू ठेवणे, ही कल्पना 'जेन-झी'च्या कार्यसंस्कृतीत बदलताना दिसत आहे. या पिढीने काम, वैयक्तिक आयुष्य आणि मानसिक आरोग्य यांच्यातील सम तोलासाठी काही नव्या संज्ञा वापरायला सुरुवात केली आहे. त्यातील 'बेअर मिनिमम मंडे' हा त्यापैकीच एक ट्रेंड आहे. आठवड्याच्या सुरुवातीलाच कामाचा अतिरिक्त ताण न घेता, केवळ आवश्यक कामे पूर्ण करण्याची ही पद्धत आहे. या ट्रेंडवर आळशीपणाची टीकाही झाली आहे. मात्र, जेन-झीच्या मते, कामाचा ताण कमी ठेवून आठवड्याची सुरुवात करणे मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकते. 'बर्नआऊट' हा आणखी परिचित शब्द आहे. सतत काम करत राहिल्यानंतर शरीर आणि मनाला जाणवणारा तीव्र थकवा आणि मानसिक दमणूक यासाठी या शब्दाचा वापर केला जातो.

ऑफिसमधील व्यवस्थापनाच्या पद्धतीसाठीही जेन-झीच्या डिक्शनरीत काही शब्द आहेत. 'मायक्रोमॅनेजिंग' म्हणजे कर्मचाऱ्याच्या कामाच्या प्रत्येक छोट्या टप्प्यावर व्यवस्थापकाने गरजेपेक्षा जास्त लक्ष ठेवणे आणि त्याच्या कामावर सतत नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न




करणे. याउलट 'क्वाइट क्विटिंग'मध्ये कर्मचारी नोकरी सोडत नाही, तर ठरलेल्या कामाच्या वेळेत आणि जबाबदारीनुसार काम करण्याला प्राधान्य देतो. म्हणजेच मिळणाऱ्या पगाराच्या बदल्यात ठरलेले काम करणे आणि नोकरीला संपूर्ण आयुष्य न बनवणे, असा याचा अर्थ घेतला जातो. त्यामुळे या संज्ञेचा संबंध थेट नोकरी सोडण्याशी नसून, काम आणि वैयक्तिक आयुष्य यांच्यात मर्यादा ठेवण्याशी आहे.

या डिक्शनरीतील 'प्लग ऑफ' हा शब्दही वैयक्तिक वेळेला महत्त्व देणाऱ्या कार्यपद्धतीकडे निर्देश करतो. ऑफिसची वेळ संपल्यानंतर ई-मेल किंवा मेसेजला उत्तर न देता कामापासून पूर्णपणे दूर होण्याला प्लग ऑफ म्हटले जाते. यामागे वैयक्तिक आयुष्यासाठी वेळ राखून ठेवण्याचा विचार आहे. दुसरीकडे, 'रेज अप्लाइंग' ही कामाच्या ठिकाणी नाराजी व्यक्त करण्याची वेगळी पद्धत मानली जाते. ऑफिसमधील कामाचा दबाव किंवा आपली कदर होत नसल्याची भावना निर्माण झाल्यानंतर कर्मचारी एकाच वेळी अनेक नोकऱ्यांसाठी अर्ज करू लागतो, त्याला रेज अप्लाइंग म्हटले जाते. जेन-झीने तयार केलेल्या या ऑफिस डिक्शनरीतून कामाकडे पाहण्याचा बदलता दृष्टिकोन दिसतो. पगार, पद किंवा कामगिरीसोबत मानसिक आरोग्य, वैयक्तिक वेळ आणि कामाच्या मर्यादांनाही ही पिढी महत्त्व देत आहे.

जेन-झी वर्ल्ड

दोस्त हे मस्त

'द बंगाल कॅट'



आपल्या घरात छानशी मनीमाऊ असावी, असं तुम्हाला वाटतं ना? मांजरांच्या अनेक प्रजाती आहेत. यापैकी एक म्हणजे बंगाल कॅट. या जातीची मांजरं खूप खेळकर असतात. त्यांना पळायला, झाडावर चढायला, खेळायला खूप आवडतं. या मांजरांची सारखी हालचाल सुरू असते. खूप गोंडस अशी ही मांजरं १२ ते १६ वर्षं जगतात.

खादाडी

फ्रोजन बनाना सिरिअल पॉप्स



नुसती केळी खाण्यापेक्षा थोडं ट्विस्ट देता आलं तर... मग फ्रोजन बनाना सिरिअल पॉप्स बनवून बघा. यासाठी पाऊण कप स्ट्रॉबेरी योगर्ट, दोन कप सिरिल्स, चार मध्यम आकाराची केळी, आठ लाकडी पॉप स्टिक्स हे साहित्य घ्या. दोन वाट्या घ्या. एका वाटीत दही आणि दुसऱ्या वाटीत सिरिल्स घ्या. केळ्यांचे दोन भाग करून घ्या. आता पॉप स्टिक्सना केळं अडकवा. ही केळी दह्यामध्ये बुडवा. केळ्यांना दही नीट लागायला हवं. यानंतर केळी सिरिल्समध्ये घोळवा. आता ही सर्व केळी वॅक्स पेपरमध्ये गुंडाळा. तासभर फ्रीजमध्ये ठेवा. मग ही केळी हवाबंद कंटेनरमध्ये ठेवा. काही काळ ती फ्रीझरमध्ये ठेवा. गारेगार खा.

स्टडी टिप्स

आत्मविश्वास बाळगा



तुम्हाला एखादा विषय किंवा धडा नीट समजत नसेल तर अजिबात निराश होऊ नका. एखादा विषय येत नाही म्हणून अभ्यासच करायचा नाही, असं अजिबात करू नका. गणिताची भीती वाटत असली तरी तुम्हाला विज्ञानात गती असू शकते. तुमचं मराठी, इंग्रजी चांगलं असू शकतं. त्यामुळे या विषयांचा अभ्यास करा. गणिताची भीती का वाटते, हे समजून घ्या. गणिताचा सराव करा. भरपूर सरावानेच गणितातल्या भीतीवर मात करता येते, हे कायम लक्षात ठेवा. यामुळे तुमची भीती कमी होईल आणि भरपूर गुणही मिळतील.

योगा टाईम

उंची वाढवायचीये...



तुम्हाला उंची वाढवायची आहे का? मग काही योगासनं करा. भुजंगासनामुळे उंची वाढायला मदत होते. मरूदंडासनही खूप उपयुक्त आहे. मेरूदंडासनामुळे पाठीचा कणा लवचिक होतो. यामुळे उंची वाढायला मदत होते. सर्वांगासन केल्यामुळेही उंची वाढायला मदत होते. मग काय, करणार ना ही आसनं?

दिवाळीपूर्वीच मुंबईला हॅट्ट्रिक बोनस

हरयाणाचा १० गडी राखून धुव्वा, सलग तिसऱ्या विजयाला गवसणी; तनुषचे आठ बळी

। मुंबई । प्रतिनिधी ।

ऑफस्पिनर तनुष कोटियनने (८१ धावांत ८ बळी) कारकीर्दीतील सर्वोत्तम कामगिरी नोंदवताना दुसऱ्या डावात तब्बल आठ बळी मिळवले. त्यामुळे मुंबईने रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी ड-गटातील साखळी सामन्यात हरयाणाचा १० गडी राखून धुव्वा उडवला. मुंबईने दिवाळीपूर्वी बोनस गुणासह सलग तिसरा विजय मिळवला.

बीकेसी येथील शरद पवार क्रिकेट अकादमीच्या मैदानात झालेल्या या लढतीत मुंबईने हरयाणाचा दुसरा डाव ८५.३ षटकांत २५६ धावांत गुंडाळला. त्यामुळे मुंबईपुढे उर्वरित २३ षटकांत ९७ धावांचे लक्ष्य उभे ठाकले. मात्र अंक्रिश रघुवंशी (३९ चेंडूंत नाबाद ६७ धावा) आणि दिव्यांश सक्सेना यांनी अवघ्या १०.४ षटकांतच एकही गडी न गमावता मुंबईचा विजय साकारला.

रणजी स्पर्धेत एक डाव राखून अथवा १० गडी राखून विजय मिळवल्यास सहा गुणांसह अतिरिक्त १ बोनस गुण (एकूण ७ गुण) दिला जातो. पहिल्या डावात शतक साकारण्यासह लढतीत एकूण ८ बळी मिळवणारा मुशीर खान सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. सिद्धेश लाडच्या नेतृत्वात खेळणाऱ्या मुंबईने यापूर्वी अनुक्रमे चंदीगड व हिमाचल प्रदेशला डावाने धूळ चारली होती. त्यामुळे मुंबई ३ सामन्यांतील सर्वाधिक २१ गुणांसह ड-गटात अग्रस्थानी विराजमान आहे. आता २ नोव्हेंबरपासून ब्रेबॉर्न स्टेडियमवर मुंबईची चौथ्या साखळी लढतीत रेल्वेशी गाठ पडेल.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये प्रतिष्ठेचे स्थान असलेल्या रणजी स्पर्धेच्या ९२व्या हंगामाला ११ ऑक्टोबरपासून प्रारंभ झाला. एलिट गटातील ३२ संघांत होणाऱ्या या स्पर्धेत कोण बाजी मारणार, हे पाहणे रंजक ठरेल. गतवर्षीप्रमाणे



यावेळीसुद्धा रणजी स्पर्धा दोन टप्प्यांत खेळवण्यात येईल. या स्पर्धेचा पहिला टप्पा ११ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत होईल. या काळात प्रत्येक संघ चार सामने खेळेल. दरम्यानच्या काळात विजय हजारे एकदिवसीय स्पर्धा व सय्यद मुश्ताक अली टी-२० स्पर्धा रंगेल. १७ जानेवारीपासून रणजीच्या दुसऱ्या टप्प्याला प्रारंभ होईल.

तत्पूर्वी, पहिल्या डावात मुंबईने मुशीर व अंक्रिश यांच्या शतकांच्या बळावर ४३० धावा केल्या. मग मुशीरनेच सहा बळी मिळवत हरयाणाचा पहिला डाव २७० धावांत गुंडाळला. १६० धावांची आघाडी मिळाल्याने मुंबईने हरयाणावर फॉलोऑन लादला. बुधवारी तिसऱ्या दिवसअखेर हरयाणाने दुसऱ्या डावात २ बाद ७३ धावा केल्या होत्या.

पुढे गुरुवारी चौथ्या दिवशी त्यांच्याकडून निशांत सिंधू (४४), हिमांशू राणा (४६), समंत जखार (४०) यांनी चांगली झुंज दिली. मात्र तनुषच्या फिरकीपुढे अन्य फलंदाजी ढेपाळली व हरयाणाचा संघ ८५.३ षटकांत २५६ धावांत गारद झाला.

मुंबईपुढे विजयासाठी ९७ धावांचे लक्ष्य होते. मुंबईने एकही बळी गमावला असता, तरी त्यांना बोनस गुण मिळाला नसता. मात्र अंक्रिश व दिव्यांशने आक्रमक फलंदाजी करत हरयाणाला हताश केले. २२ वर्षीय अंक्रिशने ७ चौकार व ३ षटकारांसह अर्धशतक साकारताना ३९ चेंडूंतच एकूण नाबाद ६७ धावा फटकावल्या. तर २५ वर्षीय दिव्यांशने २५ चेंडूंत २ चौकार व २ षटकारांसह नाबाद ३० धावा करून त्याला सुरेख साथ दिली. या दोघांनी ९७ धावांची सलामी नोंदवून विजयावर शिक्कामोर्तब केले.

भारतीय संघातील स्थानासाठी दावेदारी

तनुषने आणखी एका लक्षवेधी कामगिरीसह भारतीय कसोटी संघातील स्थानासाठी दावेदारी सादर केली आहे. तनुषला २०२५मध्ये अश्विनच्या निवृत्तीनंतर बॉर्डर-गावस्कर मालिकेदरम्यान अचानक भारतीय संघात बोलावण्यात आले होते. मात्र त्याला पदार्पणाची संधी लाभली नाही. प्रत्येक रणजी लढतीत दोन्ही डावांत मिळून किमान ५० धावा व गोलंदाजीतही ५ ते ६ बळी, असे योगदान तनुष सातत्याने देत आहे. 'मी योग्य टप्प्यावर गोलंदाजी करण्याचा प्रयत्न करत होतो. मला ज्या प्रकारची क्षेत्ररचना हवी होती, त्यासाठी मी खास आग्रह धरत होतो आणि त्यानुसार गोलंदाजी करत होतो. त्यामुळे फलंदाजांविरुद्ध संधी निर्माण करता आल्या. माझी लयही चांगली होती,' असे तनुष सामन्यानंतर म्हणाला. 'गेल्या चार वर्षांत आम्हा सर्वांनाच बळी मिळत होते. यावेळी मला संधी मिळाली. माझ्या हातातून चेंडू चांगल्या प्रकारे सुटत होता आणि एका बाजूने मला सातत्याने बळी मिळत गेले,' असेही तनुषने सांगितले.

निवडक

महिलांसाठी क्रिकेट निवड चाचणी

मुंबई : शिवाजी पार्क जिमखान्याच्या ऐतिहासिक मैदानांनी भारतीय देशाला गौरव मिळवून देणारे अनेक दिग्गज पुरुष क्रिकेटपटू दिले आहेत. हा गौरवशाली वारसा पुढे नेत महिला क्रिकेटसाठी शिवाजी पार्क जिमखाना, १५ वर्षांवरील महिलांसाठी एक विशेष क्रिकेट निवड चाचणी शिबिरि आयोजित करत आहे. निवड झालेल्या खेळाडूंना १६ नोव्हेंबर २०२६ पासून सुरू होणाऱ्या आगामी हंगामासाठी शिष्यवृत्ती आणि मोफत, उच्च-दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण दिले जाईल. याव्यतिरिक्त, निवड झालेल्या आणि पात्र खेळाडूंना लागू असलेल्या पात्रता निकष आणि निवड नियमांनुसार, अ डिव्हिजन क्रिकेट सामन्यांमध्ये शिवाजी पार्क जिमखान्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल. पात्र खेळाडूंना मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या नियमांनुसार, स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी देखील मिळेल.या उपक्रमाद्वारे, उदयोन्मुख प्रतिभेला प्रोत्साहन देणे, महिला क्रिकेटला बळकट करणे आणि खेळाडूंना खेळाच्या उच्च स्तरावर स्पर्धा करण्यासाठी तयार करणे, हे एसपीजीचे उद्दिष्ट आहे.

प्रसिद्ध वनडे मालिकेतून बाहेर

मुंबई : प्रसिद्ध कृष्णा न्यूझीलंडविरुद्धच्या ५ सामन्यांच्या वनडे मालिकेतून बाहेर पडले आहेत. प्रसिद्ध मांडीच्या दुखापतीतून सावरत आहेत. ३० सप्टेंबर रोजी वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या वनडेदरम्यान ते दुखापतग्रस्त झाले होते.५ सामन्यांची वनडे मालिका ४ नोव्हेंबरपासून खेळवली जाईल. सध्या टीम इंडिया ५ सामन्यांच्या टी-२० मालिकेत ३-० ने आघाडीवर आहे. आज चौथा टी-२० सामना खेळवला जाईल. प्रसिद्ध फिटनेस टेस्ट उत्तीर्ण केल्यानंतर न्यूझीलंड-अ विरुद्धच्या तिसऱ्या अनधिकृत कसोटी सामन्यासाठी इंडिया-अ संघात सामील होतील. यामुळे त्यांना कसोटी मालिकेपूर्वी सामन्याचा सराव करण्यास मदत मिळेल.मोहम्मद सिराज ३१ ऑक्टोबरपासून न्यूझीलंड-अ विरुद्ध सुरू होणाऱ्या दुसऱ्या ४ दिवसीय सामन्यासाठी इंडिया-अ संघात सामील होतील.नीतीश कुमार रेड्डी तिसऱ्या चार दिवसीय सामन्यात संघासोबत सामील होतील. हा सामना ७ नोव्हेंबरपासून लिंकन येथे खेळवला जाईल.कसोटी मालिकेसाठी प्रसिद्धच्या फिटनेसवर अधिक लक्ष मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि कर्णधार शुभमन गिल यांना न्यूझीलंडविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांसाठी प्रसिद्ध कृष्णाला उपलब्ध ठेवायचे आहे. त्यामुळे त्याच्या तंदुरुस्तीवर अधिक लक्ष दिले जात आहे.

टी-२० मध्ये राशिदचे २०० बळी

मुंबई : अफगाणिस्तान आणि झिम्बाब्वे यांच्यात गुरुवारी खेळल्या गेलेल्या सामन्यात अफगाणिस्तान संघाने इतिहास रचला आहे. अफगाणिस्तानने दुसऱ्या टी-२० सामन्यात झिम्बाब्वे संघाला १९ धावांनी पराभूत केलं आहे. याच सामन्यात अफगाणिस्तान संघाचा स्टार खेळाडू राशिद खाननेही इतिहास रचला आहे. त्याच्या गोलंदाजीने या सामन्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्याने असा विक्रम आपल्या नावावर केला आहे, जो आजपर्यंत पुरुषांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कोणत्याही गोलंदाजाला करता आलेला नाही. या सामन्यात अफगाणिस्तान संघाने प्रथम फलंदाजी करताना ७ बाद २२१ अशी धावसंख्या उभारली होती. या सामन्यात मोठी कामगिरी करत राशिदने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपलं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. विशेष म्हणजे, त्याने केवळ १२० सामन्यांत २०० विकेट घेण्याचा पराक्रम केला आहे. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर इंग्लंडचा लेगस्पिनर आदिल रशीद आहे. त्याने १५३ सामन्यांत १७१ विकेट घेतल्या आहेत. त्यामुळे राशिद खान आणि आदिल रशीद यांच्या विकेट्समध्येही मोठं अंतर पाहायला मिळत आहे.



भारताचा न्यूझीलंडकडून पराभव

ऑकलँड : ऑकलंडमधील ईडन पार्कवर खेळवण्यात आला. भारतीय संघाचा कर्णधार श्रेयस अय्यरनं या सामन्यातही नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर फलंदाजी करताना न्यूझीलंडनं भारतासमोर २६० धावांचं लक्ष्य ठेवलं. कीवी संघाने संपूर्ण २० षटकं फलंदाजी करत ७ गडी गमावून २५९ धावा केल्या. या सामन्यात न्यूझीलंडकडून ग्लेन फिलिप्सनं शानदार शतक झळकावलं. प्रत्युत्तरात भारताचा डाव १७२/९ धावांवर संपुष्टात आला. मायकल ब्रेसवेलनंही ४ चौकार आणि ६ षटकारांसह अवघ्या २५ चेंडूंमध्ये ६५ धावा करत स्फोटक खेळी केली. डावाच्या अखेरीस नॅथन स्मिथ ६ धावांवर नाबाद राहिला, तर ॲडम मिल्ने १ धावेवर नाबाद राहिला. तत्पूर्वी फिन ऍलन, टिम सेफर्ट आणि मार्क चॅपमनसारखे फलंदाज लवकर बाद झाले होते, परंतु फिलिप्स आणि ब्रेसवेल यांच्या आक्रमक खेळीमुळं न्यूझीलंडनं २६० धावांचं मोठं आव्हान उभं केलं.

राष्ट्रीय आंतरजिल्हा कनिष्ठ ॲथलेटिक्स स्पर्धा ; हैदराबाद येथे १४ ते १७ नोव्हेंबरदरम्यान आयोजन

रायगड जिल्ह्याच्या १३ खेळाडूंची निवड

। रायगड । प्रतिनिधी ।

तेलंगणा राज्यातील हैदराबाद येथे दिनांक १४ ते १७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या नॅशनल इंटर डिस्ट्रिक्ट ज्युनिअर ॲथलेटिक्स मीट या राष्ट्रीय आंतरजिल्हा कनिष्ठ ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याच्या १३ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. तसेच तीन खेळाडूंची राखीव खेळाडू म्हणून निवड करण्यात आली आहे.रायगड जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने दिनांक २५ व २६ ऑक्टोबर २०२६ रोजी एचओसी इंटरनॅशनल



स्कूल, रसायनी येथे जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निवड चाचणीतील खेळाडूंच्या कामगिरीचे परीक्षण करून निवड समितीने विविध वयोगटांतील खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड केली.

१४ वर्षांखालील मुलांमध्ये अनय पाटील ट्रायथलॉन अ, चिराग म्हात्रे ट्रायथलॉन ब, १४ वर्षांखालील मुलींमध्ये शांभवी सिंग ट्रायथलॉन अ, किया वैद्य ट्रायथलॉन ब, १६ वर्षांखालील मुलांमध्ये रितिंकुमार जेना ६० मीटर धावणे, अनस खान लांब उडी, छत्रपती कटुळे गोळाफेक, रुपेश कांबटी उंच उडी, ईशान डे ६०० मीटर धावणे, १६ वर्षांखालील मुलींमध्ये सारा घोड ६० मीटर धावणे, श्रेया बांदल ८० मीटर अडथळा धावणे, भावी राणा लांब उडी, सान्वी भोसले गोळाफेक, राखीव खेळाडूंमध्ये मिहिका सिंग ६०० मीटर धावणे, मानसी ठाकूर लांब उडी आणि प्राची खानावकर भालाफेक या खेळाडूंची निवड झाली आहे. निवड समितीचे अध्यक्ष नितीन कोळी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड प्रक्रियेत समिती सदस्य यतिराज पाटील, कादिरवहन नाडर आणि व्ही. एम. श्रीलक्ष्मी श्रीकुमारन यांनी सहभाग घेतला. निवड झालेल्या खेळाडूंची अधिकृत यादी, प्रवेश अर्ज व आवश्यक कागदपत्रे संबंधित प्राधिकरणाकडे पाठविण्याचा निर्णय समितीने घेतला आहे.या राष्ट्रीय स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे खेळाडू उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

सख्ख्या भावांची १८ किलोमीटर समुद्री भरारी



। उरण । प्रतिनिधी ।

उरणमधील पार्थ निशांत पाटील आणि आदी निशांत पाटील या दोन सख्ख्या भावांनी आपल्या असामान्य कामगिरीतून सिद्ध करून दाखवले आहे. एलिफंटा लेणी ते नागाव-पिरवाडी बीच असे सुमारे १८ किलोमीटरचे समुद्री अंतर पोहून पूर्ण करत या दोन्ही भावांनी क्रीडा क्षेत्रात अभिमानास्पद कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, डाउन सिंड्रोम असलेल्या पार्थने हे आव्हान यशस्वीरीत्या पूर्ण करून प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले, तर अवघ्या सात वर्षांच्या आदीने हा समुद्री मार्ग पूर्ण करणारा सर्वात लहान जलतरणपटू ठरण्याचा मान मिळवला आहे.

- **पार्थने ६ तास ५७ मिनिट, आदीने ५ तास ५६ मिनिटांत पूर्ण केले अंतर**
- **एलिफंटा ते नागाव-पिरवाडी बीचचे आव्हान पूर्ण**

पार्थ निशांत पाटील हा १३ वर्षांचा असून तो सीबर्ड स्पेशल स्कूल, उरण येथे शिक्षण घेत आहे. तर त्याचा लहान भाऊ आदी निशांत पाटील हा अवघ्या ७ वर्षांचा असून सेंट मेरी कॉन्व्हेंट स्कूल, उरण येथे इयत्ता तिसरीमध्ये शिक्षण घेत आहे. दोघांनाही लहानपणापासूनच पोहण्याची आवड निर्माण झाली. उरण येथील स्विमिंग पूलमध्ये त्यांनी पोहण्याचा सराव सुरू केला. नियमित सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यामुळे त्यांची पोहण्यातील आवड अधिक दृढ होत गेली.

शुक्रवारी (दि. ३० ऑक्टोबर पहाटे २:३० वाजता दोन्ही भावांनी घारापुरी (एलिफंटा लेणी) येथून समुद्रात पोहण्यास सुरुवात केली. सुमारे १८ किलोमीटरचे हे आव्हानात्मक समुद्री अंतर पार्थने ६ तास ५७ मिनिटांत, तर आदीने अवघ्या ५ तास ५६ मिनिटांत पूर्ण करून नागाव-पिरवाडी बीच येथे यशस्वीरीत्या लक्ष्य गाठले.

या संपूर्ण मोहिमेत अवघ्या सात वर्षांच्या आदी निशांत पाटील याची कामगिरी विशेष लक्षवेधी ठरली. आदीने केवळ ५ तास ५६ मिनिटांत हे अंतर पार करत आपल्या जलतरण कौशल्याची चुणूक दाखवून दिली. दुसरीकडे, डाउन सिंड्रोम असलेल्या १३ वर्षीय पार्थची कामगिरी विशेष कौतुकास्पद ठरली आहे. पार्थने तब्बल ६ तास ५७ मिनिटे समुद्रात सातत्याने पोहत १८ किलोमीटरचे अंतर पूर्ण केले.

जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत पेणच्या

नेने कन्या विद्यालयाचे यश

। पेण । प्रतिनिधी ।

जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत पेण येथील मनोरमाबाई नारायण नेने कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या स्पर्धेत विद्यालयाच्या पाच विद्यार्थिनींनी सहभाग घेत विविध गटांत यश संपादन केले. १७ वर्षांखालील गटात गार्गी मोर्वेकर हिने तृतीय क्रमांक, तर गौरी सतविडकर हिने चतुर्थ क्रमांक मिळवला. तसेच त्रिशा म्हात्रे हिने सहावा क्रमांक पटकावला. १४ वर्षांखालील गटात ईश्वरी कोरडे हिने तृतीय क्रमांक, तर स्नेहा मुंढे हिने चतुर्थ क्रमांक मिळवला. या विद्यार्थिनींच्या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत भर पडली आहे. या यशस्वी विद्यार्थिनींचे संस्थेचे पदाधिकारी अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, उपाध्यक्ष संजय कडू, प्रशांत ओक, सुधिर जोशी, निता कदम, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व्ही.व्ही.पाटील, पर्यवेक्षिका रंजना म्हात्रे, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

पिंपरी चिंचवड करंडकात लक्ष्य अकॅडमीची धमाल

। पिंपरी । प्रतिनिधी ।

पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित पिंपरी चिंचवड करंडक आंतरक्लब खुल्या गटाच्या टी-२० क्रिकेट स्पर्धेत लक्ष्य क्रिकेट अकॅडमी आणि मावळ वॉरीयर्स या संघांनी दमदार विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.हिंजवडी येथील फोर स्टार क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत लक्ष्य क्रिकेट ॲकॅडमीने प्राधिकरण जिमखाना संघाचा ५२ धावांनी पराभव केला.



- **कुंदन कुमारची अष्टपैलू कामगिरी**
- **प्रितम सूर्यवंशींची अप्रतिम गोलंदाजी**

लक्ष्यच्या विजयात कुंदन कुमारच्या अष्टपैलू कामगिरीचा महत्त्वाचा वाटा राहिला. प्रथम फलंदाजी करताना लक्ष्य क्रिकेट अकॅडमीने २० षटकांत ९ गडी गमावून १५९ धावा केल्या. कुंदन कुमारने ३९, अमेय जाधवने २२, तर जयेश राठोडने १८ धावांचे योगदान दिले. प्राधिकरण जिम खान्याकडून अरूश गुप्ताने १३ धावांत पाच गडी बाद करत भेदक गोलंदाजी केली.

विजयासाठी १६० धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या प्राधिकरण जिमखान्याचा डाव १९.५ षटकांत १०७ धावांवर आटोपला. आदित्य भोसलेने ४६ धावांची झुंजार खेळी करत प्रतिकार केला. मात्र, लक्ष्यच्या प्रितम सूर्यवंशीने २८ धावांत चार गडी बाद करत प्राधिकरणच्या फलंदाजीला खिंडार पाडले.

सुवर्णकन्या सई कारंडेचा खारघर शिवसेनेतर्फे नागरी सत्कार

। पनवेल । प्रतिनिधी ।

अखिल भारतीय सीबीएसई शालेय राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून महाराष्ट्रासह पनवेलचे नाव उज्ज्वल करणाऱ्या खारघरच्या सई सुयोग कारंडे हिचा खारघर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. हरियाणातील कैथल येथे १४ ते २० ऑक्टोबरदरम्यान झालेल्या स्पर्धेत सईने १७ वर्षांखालील मुलींच्या



५२ ते ५४ किलो वजनगटात दमदार कामगिरी करत सुवर्णपदकावर नाव कोरले.

सईच्या या उल्लेखनीय यशाबद्दल युवा सेना शहरप्रमुख जयेश संजय विसावे, डॉ. श्रीनाथ प्रकाश परब, उद्योजक स्वप्नील विष्णू नानचे आणि उद्योजक मितेश मिलिंद केदारे यांनी तिच्या निवासस्थानी भेट देत कौतुक केले.

सिंधूने सरळ गेममध्ये सामना जिंकला | मालविका आणि इशराणी बाहेर

सिंधू-लक्ष्य हायलो ओपन बॅडमिंटनच्या उपांत्यपूर्व फेरीत

। जर्मनी । वृत्तसंस्था ।

भारताच्या पी. व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन यांनी गुरुवारी जर्मनीतील सारब्रुकन येथे सुरू असलेल्या हायलो ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत सिंधूने फ्रान्सच्या रोसी ऑक्टाव्हिया पंकसारीचा २६ मिनिटांत २१-९, २१-६ असा पराभव केला.

पुरुष एकेरीत लक्ष्य सेनने आपलाच सहकारी किरण जॉर्जचा ५४ मिनिटांत २१-१५, १८-२१, २१-१२ असा पराभव केला. दुसरीकडे, मालविका बनसोड आणि इशराणी बरुआ यांना पराभव पत्करावा लागल्याने त्या स्पर्धेतून बाहेर पडल्या.

दुसऱ्या मानांकित सिंधूने फ्रान्सच्या पंकसारीविरुद्ध सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. सामन्यात खेळल्या गेलेल्या ५७ गुणांपैकी ४२ गुण तिने आपल्या नावावर केले.फ्रेंच ओपनमध्ये उपविजेती ठरलेली माजी विश्वविजेती सिंधूने पहिल्या



फेरीत प्रकृती भारतचा पराभव केला होता. आता उपांत्यपूर्व फेरीत तिचा सामना डेन्मार्कच्या अमली शुल्झशी होणार आहे. दुसऱ्या मानांकित सिंधूने सुरुवातीपासूनच सामन्यावर पकड राखली. तिने फ्रान्सच्या पंकसारीला दोन्ही गेममध्ये पुनरागमनाची संधी दिली नाही. सिंधूने सामन्यात खेळल्या गेलेल्या ५७ गुणांपैकी ४२ गुण आपल्या नावावर केले, तर तिच्या प्रतिस्पर्धीला १५ गुण मिळाले.

भारताचा सर्वोच्च क्रमांकाचा पुरुष एकेरीतील खेळाडू लक्ष्य सेनने उपउपांत्यपूर्व फेरीत सहकारी किरण जॉर्जचा पराभव केला. लक्ष्यने पहिला गेम २१-१५ असा जिंकला, मात्र दुसऱ्या गेममध्ये १८-२१ असा पराभव स्वीकारावा लागला.निर्णायक गेममध्ये लक्ष्यने दमदार पुनरागमन करत २१-१२ असा विजय मिळवला आणि अंतिम आठमध्ये स्थान निश्चित केले.

महिला एकेरीत मालविका बनसोडचा कॅनडाच्या वेन यू झांगने २१-११, २१-१७ असा पराभव केला. सामना ३१ मिनिटे चालला. मालविका पहिल्या गेममध्ये पिछाडीवर पडल्या आणि दुसऱ्या गेममध्ये चांगली कामगिरी करूनही सामना वाचवू शकल्या नाहीत.इशरानी बरुआचा डेन्मार्कच्या आठव्या मानांकित लाइन होजमार्क केजर्सफेल्डने २१-१४, २१-१९ असा पराभव केला. ३९ मिनिटांच्या सामन्यात इशरानीने दुसऱ्या गेममध्ये आव्हान दिले, मात्र डेन्मार्कच्या खेळाडूने सरळ गेममध्ये विजय मिळवला.महिला एकेरीत भारताची सहावी मानांकित उन्नती हुड्डाचा सामना डेन्मार्कच्या फ्रेडरिक ओस्टरगार्डशी होईल. तर अनमोल खरब डेन्मार्कच्या तिसऱ्या मानांकित लाइन क्रिस्टोफरसेनविरुद्ध खेळेल.

अठरावे पुण्यस्मरण



कै.सौ.चांगुणाबाई श्रीधर पाटील

स्वर्गवास :३१ ऑक्टोबर २००८

काळ्याकुट्ट आकाशात, विजेसारखी चमकलीस
सृष्टी प्रकाशमान करून अंधारात हरवलीस
कोरड्या शुष्क जीवनात लक्ष्मीसारखी आलीस
भरभरून वैभव दिलंस, पण सुखाच्या क्षणी निघून गेलीस
तुझ्या पवित्र पाऊलखुणांनी वैभवाची प्राप्ती झाली
सुखद सहवासाच्या काळात मात्र आम्हाला सोडून गेलीस

पती: श्रीधर हरी पाटील, मुलगे: मेघनाथ, मंगेश, सुना : मेघना अमृता, नातसुन : अंकिता, मुली : सुनंदा, प्रभावती, सुनीता, शैला, सुचिता, सुलभा, सुगंधा, नातवंडे: प्रणाली, प्रतिक, विहान, रोहित, दिनेश, रितेश, अपूर्वा, पियुष, स्वरूप, मानस. पणतू : अर्श

मु.हेमनगर, ता.अलिबाग, जि.रायगड.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)